BROWEN BOOK ONLY

**DAMAGE BOOK**

**TEXT PROBLEM WITHIN THE BOOK ONLY**

UNIVERSAL LIBRARY
OU_192731
UNIVERSAL LIBRARY

OSMANIA UNIVERSITY LIBRARY

Call No. M83/N8 G4 Accession No.

Author माधव.

Title सुहासिनी.

This book should be returned on or before the date last marked below

नाथ-वाङ्मयमाला-९

# सुहासिनी

लेखक,

नाथ माधव

नवभारत प्रकाशनसंस्था, मुंबई ,४

प्रकाशक—
रघुनाथ दिपाजी देसाई
नवभारत प्रकाशन संस्था,
६, केळेवाडी, मुंबई नं. ४

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन.

मार्च १९४३

किंमत २ रुपये

मुद्रक—
रघुनाथ दिपाजी देसाई
न्यू भारत प्रिंटिंग प्रेस
गिरगांव मुंबई ४.

# पहिल्या आवृत्तीची प्रस्तावना.

वीररस प्रधान असें एखादें नाटक आपण लिहावें अशी इच्छा होऊन मी प्रथम एक कल्पित संविधानक जुळविलें. अंकांची जुळवणी आणि प्रवेशवारी पाडून नाटकाचा सांगाडा तयार झाला. परंतु मनाची हूरूप मात्र कायम टिकली नाहीं. कारण नाटक लिहून तयार झाल्यावर नाटकमंडळीकडून तें जर रंगभूमीवर आलें तरच केलेल्या श्रमाची सार्थकता होणार; नाहीं तर श्रम व्यर्थ जातात. कारण नाटकमंडळीकडून रंगभूमीवर न आलेलें नाटक छापून काढल्यास त्याच्या प्रति खपत नाहींत, असें पुस्तक-प्रकाशकांचें मत आहे आणि तें मत खरें आहे, असें मलाहि वाटतें. शेवटीं मनांत जुळविलेलें संविधानक कादंबरीच्या रूपानें लिहून काढावें असे विचार मनांत येऊं लागले. आणि लवकरच ह्या विचारांना अनुकूल वेळहि आली.

माझे मित्र रा. कालेकर आणि साळवी यांनीं 'मराठा' नांवाचें मासिक सुरू करण्याचें ठरवून त्यांत चालू कादंबरी मी लिहावी म्हणून ते मजकडे आले. पुढें मी कल्पिलेलें कथानक त्यांस पसंत पडून 'मराठा' मासिकाच्या १ ल्या अंकापासून 'सुहासिनी' ह्या नांवानें तें नाटकाकरितां जुळविलेलें संविधानक कादंरीच्या रूपानें येऊं लागलें. परंतु मध्यंतरी शस्त्रप्रयोग करून घेण्याकरितां तीन महिने मला हॉस्पिटलमध्यें घालवावे लागल्यामुळें आगष्ट, सप्टेंबर आणि आक्टोबर १९१४ हे तीन महिने मजकूर लिहून पाठवितां आला नाहीं. त्यामुळें एका वर्षांत कादंबरी संपूर्ण करण्याचें ठरलें असतांहि नाइलाजास्तव दुसऱ्या वर्षांतील पहिले तीन महिने घ्यावे लागले. नाहीं तर 'मराठा' मासिकाच्या वर्गणीदारांस ह्या दुसऱ्या वर्षापासून मजपेक्षां एखाद्या चांगल्या लेखकाची नवी कादंबरी वाचावयास मिळाली असती. असो.

ही कादंबरी संपूर्ण वाचकांच्या हातीं पडत असल्यामुळें तींतील संविधानका-विषयीं येथें जास्त चर्चा न करतां, इतक्या अडचणी सोसून 'मराठा' मासिकाच्या व्यवस्थापकांनीं ही कादंबरी मजकडून संपूर्ण करून घेतली, त्याबद्दल त्यांचे आभार मानून ही प्रस्तावना पुरी करतों.

कावसजी पटेल तलाव,<br>मुंबई, सप्टेंबर १९१५

नाथ माधव.

नाथवाङ्मयमालेचें

पुढील पुस्तक

नवीन आवृत्ती

# देशमुखवाडी

किंमत २ रुपये

एप्रिलमध्यें निघेल.

# १

## दोघी मैत्रिणी

१

क्षण एक गुण तव गाया ॥ सामर्थ्य दे प्रभुराया ! धृ० ॥
त्वत्पद–सेवन–मधु–पानाला । मुनि–मन–मधुकर लुब्ध जहाला ।
साध्य तें तरि न तयां ॥ सामर्थ्य दे प्रभुराया ! ॥ १ ॥

*　　*　　*　　*

तरुणीच्या सुंदर कंठांतून कर्णमधुर आलाप निघत होते—
"दुस्तर अतितर संकट–डोहीं । पडलों आम्ही मानव–देहीं ।
ये अम्हां रक्षा या ॥ सामर्थ्य दे प्रभुराया ! ॥ २ ॥

वसतऋतूंतील ती एक आल्हादकारक संध्याकाळ होती. अखिल सृष्टीला सौभाग्य देणारा सूर्य अस्तास जाण्याच्या विचारांत होता. पश्चिम दिग्वधू आपल्या रमणाचें स्वागत करण्याकरितां आरक्त मेघमाला घेऊन तटस्थ उभी होती. त्यावेळीं तिनें रक्तवर्ण सुरम्य शालू परिधान केला होता. निशाकालींचा शीतल वायु राजोद्यानांतील फलपुष्पांच्या उपवनांत स्वैर संचार करून त्यांचा सुगंध सर्वत्र पसरीत होता. अशा वेळीं राजप्रासादाच्या समोरील उद्यानांत स्फटिक पुष्करिणीच्या तीरप्रदेशावरील कुसुमित लतिकांच्या सुगंध—पुष्पित दाट लतांत एक कुमारी हरित तृणपर्णावर पुष्पमाला गुंफित बसली होती. तिनें परिधान केलेल्या काळ्या वस्त्रामुळें तिची गौर काया विशेष खुलत होती. तिच्या शरिराच्या एकंदर अवयवाची घटना अत्यंत मोहक होती. प्रथम कांहीं वेळ ईशस्तुतिपर पद्य स्वतःशीं गुणगुणून तीं आतां विचारांत स्तब्ध होऊन हातांतील पुष्पमाला झरझर गुंफूं लागली.

" झाला बाई एकदांचा हा हार !—थोडीं राहिलीं आतां हीं फुलं ! " बाकी राहिलेल्या फुलांकडे पहात ती तरुणी स्वतःशीं म्हणाली, "हा हार घेऊन ताईमहाराजांजवळ जायला मला चांगलंच निमित्त होईल. [illegible] आज काय प्रकार आहे—नकळे ! दुपारपासून ताईमहाराजांनीं कसं [illegible]

स्वतःला कोंडून घेतलं आहे ! संध्याकाळ झाली—वास्तविक आतां ताई-महाराज उद्यानांत असायच्या !—पण ती यशोधरा देखील कशी आज कुठेंच दिसत नाहीं ? नाहींतर, पहावं तेव्हां—सदान्कदा तिचा ताईमहाराजांसभोंवतीं सारखा पिंगा चाललेला असायचा !—कुठें असेल बरं ती ? ”

क्षणभर विचारमग्न राहून ती तरुणी पुनः गुणगुणूं लागली—

अनंत रूपें तूं नटलासी । अगाध लीला–कौतुक दाविसी ।
यत्न आमुचे वायां । सामर्थ्य दे प्रभुराया ! ।। ३ ।।

त्या मधुर आलापाच्या अनुरोधानें दुसरी एक तरुणी उद्यानांत शिरली. प्रथम ती उपवनांतील राजमार्गानें येत होती. परंतु थोडे चालून येतांच तिचा विचार बदलला. कर्णलोलुप ताना घेत असलेल्या आपल्या मैत्रिणीची कांहीं तरी थट्टा करावी असें वाटून ती जवळच एका पुष्पवेलीच्या आड कांहीं वेळ उभी राहिली. ती स्वभावतः विनोदप्रिय असल्यामुळें, आपल्या मैत्रिणीचा काय विनोद करावा याचा विचार करीत क्षणभर ती उभी राहिली. एक दोन गोष्टी तिला सुचल्या परंतु त्या केल्यापासून गायनात तल्लिन झालेल्या आपल्या मैत्रिणीची चांगलीशी थट्टा केल्यासारखं होणार नाहीं असें वाटून तिन तिच्या अंगावर फेकण्याकरितां हातांत घेतलेला फुलाचा गेंद तसाच टाकून दिला आणि ती हळूच तिच्या मागें गेली. आपल्या मागें कोणी तरी उभें आहे याची त्या पहिल्या तरुणीला कल्पना देखील नव्हती. ती आपल्या गायनांत अगदीं तल्लिन झाली होती. इतक्यांत त्या दुसऱ्या तरुणीनें तिचे चटकन् डोळे झांकले.

“ यशोधरा–होय–तीच ! ” हातानें चांचपत ती तरुणी म्हणाली, “ सोड, यशोधरे ! अयाई—ई—! किती तरी जोरानें माझे डोळे आंवळलेस ! ”

“ अहाहा ! नाजुकच्च किनई ! ” तिच्या मानेला हिसका देऊन यशोधरा म्हणाली, “ कोकिळे, तूं नावाप्रमाणें खरोखरीच कोकिळा आहेस असं कां तुला वाटतं ? ”

“ मला काय वाटतं याची तुला कां उठाठेव ? ” कोकिळा डोळे चोळीत किंचित् रागानें म्हणाली.

“ झालं ! रागावलीस ना ! अगदीं कशी माशी देखील बसूं देत नाहींस हो ! थट्टा देखील नाहींना समजत तुला ! ” असें म्हणून कोकिळेच्या खांद्यावर हात ठेऊन तिची समजूत करीत यशोधरा म्हणाली, “ बरं ! झालं तें झालं ! आतां मात्र नाहीं हो कधीं डोळे मिटणार. मग तर झालं ना ? ”

" हो. तेवढं म्हटलं म्हणजे झालं ! मग दुसऱ्याचं कांहीं का होईना ! ही का थट्टा झाली ? पहा—माझे डोळे कसे लाल झाले ते ! "

" खरं कीं काय ? पण कोकिळे, तुला ग कसें दिसलें तुझे डोळे लाल झाले तें ! " असें हांसत हांसत म्हणून यशोधरा पुढें झाली आणि म्हणाली, " मोठं आश्चर्यच म्हणायचं ! पण तें असो. मी आतां तुझ्या डोळयांत फुंकर घालतें म्हणजे तुझे डोळे पुन: पांढरे होतील. "

" आलीस का पुन: पूर्वपथावर ! " यशोधरेच्या हातून सुटका करून घेत कोकिळा म्हणाली, " नको माझ्या डोळयांत फुंकर घालूंस ! "

" मग राग गेला म्हणून म्हण ! "

" राग ग कसला, पण तू करतेसच तसं ! "

दोघी मैत्रिणींची पुन: एकी झाली. त्या दोघींमध्यें असे खटके दिवसांतून कैक वेळां उडत असत, परंतु पुन: पांच मिनिटांनीं त्यांची गट्टी जमत असे. यशोधरा जरा धूड आणि अल्लड असल्यामुळें तिची थट्टा नाजुक प्रकृतीच्या कोकिळेला केव्हा केव्हां जाचक होत असे. आजचा प्रकारहि त्यांपैकींच एक होता.

" यशोधरे, तूं मघांपासून होतीस तरी कुठें बाई ? " क्षणभरानें कोकिळा म्हणाली, " ताईमहाराज नाहीं आल्या उद्यानात ? माझा हा हार—"

" आज काय झालं आहे नकळे ! लग्नाकरितां कांहीं विचारण्यासाठीं दुपारीं ताईमहाराजांजवळ महाराज आले होते. त्यांचं बराच वेळ संभाषण झालं आणि महाराज गेल्यावर ताईमहाराजांनीं आपल्या महालाचा दरवाजा बंद करून घेतला आहे. मी दोन चारदां गेलें पण त्यांनीं दरवाजा कांहीं उघडला नाहीं. "

" मी देखील दोनवेळां डोकावलं पण मला देखील नाहीं दरवाजा उघडला ! काय बरं याचं कारण असेल ? मी मघां बाबांना विचारलं, तेव्हां ते म्हणाले कीं, आज सकाळीं धुंडपाळ महाराजांकडून आज्ञापत्र घेऊन एक जासूद आला. तें पत्र वाचताच आपले महाराज दरबारांतून एकदम उठून महालांत गेले. मला वाटतं, तें धुंडपाळ महाराजांकडून आलेलें पत्रच ह्या सर्व गोष्टीच्या मुळाशीं असावं ! "

" काय सांगावं ! पण धुंडपाळ महाराजांना आपणाकडून खंडणी तर नियमितपणें जात आहे. मग ह्या आजच्या पत्रांत काय असावं ? "

इतक्यांत एक लहान हरिण धांवत धांवत येऊन त्या दोघींच्या मध्यें घुसलें. तें अगदीं भयाभीत झालेलें दिसत होतें. त्याकडे पाहून कोकिळा म्हणाली, “ कां बरं हें एवढं भ्यालं ? वृद्ध मेघावीची स्वारी येताहे वाटतं. होय—तोच !” दूरवर पहात ती पुढें म्हणाली, “ त्यानेंच मारली असेल काठी म्हणून हें एवढं भ्यालं !” असें म्हणून हरणाच्या पाठीवरून हात फिरवून ती त्याला कुरवाळूं लागली. थोड्या वेळानें वृद्ध मेघावी चारण काठी टेकीत टेकीत तेथें आला.

“ कां पोरींनो ! कसली चालली आहे तुमची कुजबुज ! तुमचा देखील लग्नाचा विचार चाललाहेसा दिसतो. पण हें पहा, माझी म्हाताऱ्याची आठवण ठेवा हो. ”

“ चारणा, तुझ्या जिभेला कांहीं हाड तरी ! तोंडाचं बोळकं झालं पण बोल कसे आहेत ? ”

“ अग तुमचं पोरींचं चुकतं तें इथंच ! तुमच्या सारख्या अल्लड तरुणींचा संसार चालवायला माझ्या सारखाच अनुभवी—पोक्त—”

“ थांव हो ! आतां ताई महाराजांना जाऊन सांगतें. ”

“ कोकिळे, तूं काय वेडी आहेस ! त्या म्हाताऱ्याची थट्टा काय मनावर घेतेस !” यशोधरा म्हणाली.

“ थट्टा !” वृद्ध मेघावी म्हणाला, “ हिला तूं थट्टा म्हणतेस ? अग, ताईमहाराज आतां महाराणी झाल्यावर विनंति करायची खोटी कीं, आतां ह्या कोकिळेचा आणि माझा विवाह—”

“ पण तूं काय म्हटलंस आतां ?” आश्चर्यानें यशोधरेनें विचारलें, “ ताईमहाराज महाराणी झाल्यावर म्हणजे ? ”

“ म्हणजे तुला नाहीं का कळलं ! वाः—धुंडपाळ महाराजांनीं आपल्या ताईमहाराजांची मागणी घातली आहे आणि तेवढ्याच करितां—”

“ काय म्हटलंस ? धुंडपाळ महाराजांनीं ताईमहाराजांची मागणी घातली आहे ! तूं शुद्धीवर तरी आहेस का चारणा ? ”

“ म्हणजे तुला शंकाच आहे वाटतं ! अग वेडे पोरी, मी चांगला शुद्धीवर आहें, इतकंच नव्हे तर माझ्या पुढें उभी असलेली ही माझी नवपरिणिता वधू, मंजुळ—रसना कोकिळा मी स्पष्ट पहात आहें. ”

“ चारणा, थेरड्या मला नाहीं असला फाजीलपणा खपायचा सांगतें ! ”

" ठीक आहे सांग—मी आनंदानें ऐकतों. "

वृद्ध मेघावीनें शांतपणें दिलेलें उत्तर ऐकून कोकिळा जास्तच चिडली. तें पाहून यशोधरा म्हणाली, " कोकिळे, तूं पण काय त्याच्या नादीं लागतेस ? अशा थट्टेखोराची खोड थट्टेनेंच मोडली पाहिजे. तूं चिडतेस म्हणून तो जास्त चिडवितो. पण चारणा तूं आतां ही काय नवीन बातमी सांगतो आहेस ? खरंच का ताईमहाराजांची धुंडपाळ महाराजानीं मागणी केली आहे ! "

" म्हणजे ! ही देखील तुला थट्टाच वाटते का ? "

" म—ग " विचार करीत यशोधरा म्हणाली, " कोकिळे, गडे आतां आलं लक्षांत आज ताईमहाराज अशा कां त्या ? मला वाटतं सर्व गोष्टीचं कारण ही धुंडपाळ महाराजांची मागणीच ! "

" खरंच मलाहि असंच वाटतं यशोधरे. "

" मग चल तर आपण ताईमहाराजांना भेटून याचा शहानिशा करून घेऊं. "

" कोकिळे ! कोकिळे ! जरा थांब—"

दोघी मैत्रिणी वृद्ध चारणाच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून तेथून निघाल्या. यशोधरेच्या डोक्यात आतां लख्ख प्रकाश पडला. धुंडपाळ महाराजांनीं मागणी घातल्यामुळें ताई महाराजांच्या वर्तनक्रमांत फरक पडला हें तिच्या आतां चागलें लक्षांत आलें. कारण चार दिवसांपूर्वी कनक अमात्यानें इतर देशाच्या ज्या दोन चार राजपुत्रांच्या तसबीरा आणल्या होत्या त्यांतील एक तसबीर ताई महाराजांच्या विचारांचें केंद्र बनली आहे हें तिला माहिती होतें. दोघीहि आपल्या विचारांत मग्न अशा उद्यानवाटिकेंतून चालल्या होत्या. राजप्रासादाच्या उजव्या बाजूला सुरम्य वृक्षलतादिकांचें उपवनांत राजकुलस्वामिनी चंडी मातेचें संगमरवरी प्रस्तरानें विराजित एक भव्य मंदिर होतें. त्यावेळीं सायंकाळ झाला असल्यामुळें सूर्यप्रकाश मंदिराच्या सुवर्णखचित कळसावर पडून तो प्रज्वलित दिसत होता. त्या दोघी मैत्रिणी मधुतर सुवासानें दरवळून टाकणाऱ्या मंदिराच्या उपवनांत येतांच एकदम वाटेंत थबकल्या ! मंदिरांतून मंजुळ पण गंभीर असा स्वर त्यांच्या कानीं आला. तो स्वर कोणाचा याची पृच्छा करण्याच्या उद्देशानें दोघींनीं एकमेकींकडे पाहिलें आणि दोघींनीं एकमेकींच्या मनांतील प्रश्नाला एकच उत्तर दिलें.

" ताईमहाराज ! "

# भावी संकट २

तो स्वर मंदिराच्या सभामंडपांतून येत होता. राजकन्या सुहासिनीचा तो स्वर आहे असें त्या दोघी मैत्रिणींनीं ओळखलें परंतु त्या एकदम स्तंभित कां झाल्या ? वाचकहो ! त्या दोघी मैत्रिणी तेथें उभ्या आहेत तोंपर्यंत आपण मंदिरात प्रवेश करून आंतील स्थिति अवलोकन करूं म्हणजे त्या दोघीजणी एकदम स्तंभित कां झाल्या त्याचें कारण आपल्या लक्षांत येईल.

तें देवालय, अग्निकुलवंशी राजपुतांची कुलस्वामिनी चंडीदेवीचें होतें. देवीच्या पुढें एक भव्य होमाग्निकुंड होतें. त्या कुंडांत जळत असलेल्या चंदनामुळें सर्व मंदिरांत सुगंधाचा घमघमाट पसरला होता. मंदिराच्या भिंती, तुळया, खांब आणि छत यांवर नानाविध कारागिरीनें सुशोभित केलेलें कौशल्य खरोखरीच नयनाल्हादक होतें. मंदिराच्या मध्यभागीं रत्नखचित आसनावर अधिष्ठित असलेल्या अष्टभुजा चंडीदेवीपुढें राजकन्या सुहासिनी दोन्ही हात जोडून अनन्य वाणीनें आपल्या कुलस्वामिनीची आराधना करीत होती. राजकन्येची अंगकान्ती सुवर्णासारखी सतेज होती. आराधना करीत असतां रक्तवर्ण अधरांमधून कुंदकलिकांप्रमाणें तिची शुभ्र दंतपंक्ति शोभत होती. तिचे विशाळ आणि काळे नेत्र इतके पाणीदार होते कीं, पाहणारास त्यांत अपूर्व मोहिनी असल्याचा भास होऊन तिच्याविषयीं नैसर्गिक आदर उत्पन्न होत असे. तिच्या मनोहर आणि कमानदार भृकुटीमध्यें सुंदर तिलक शोभत होता. तिनें हिरव्या रंगाचें भरजरीचें काम केलेले पातळ वस्त्र परिधान केलें असून तिच्या कंठांत अनेक अमोलिक भूषणें होतीं, आणि हातांत हिरेजडित कंकणें होतीं. तिनें आपले लांब व कुरळ केस मोकळे सोडले होते. तिच्या मस्तकावर राजचिन्हदर्शक रत्नयुक्त टोप झळकत होता. मानेवर, वक्षःस्थलावर आणि मुखकमलावरून वाऱ्याच्या योगानें सहजगतीनें उडत असलेल्या त्या कुरळ केसांमुळें तिचें मनोहर लावण्य अधिकच खुलत होतें. तिच्या कानाजवळच्या कुरळ केशपंक्तीकडे पाहतांच, गुलाबी गालांवर भ्रमरावली मधुसेवनार्थ तेथें गुंजारव करीत आहे कीं काय असा भास होत होता. ती वीरासन घालून देवीच्या मुखाकडे तटस्थ वृत्तीनें पहात बसली होती. त्यावेळीं द्वारप्रदेशांतून आंत येणारे, अस्तास चाललेल्या दिनमणीचे कोमल किरण

सुहासिनीच्या पाठीवर पडले होते आणि तिच्या मुखकमलावर देवीमंदिरात सदोदित तेवत असलेल्या रत्नखचित दीपांचा उज्वल प्रकाश पडला होता, त्यामुळें तिच्या मनोहर मुखकांतीला अलौकिक शोभा आली होती. क्षणभरानें ती देवीची आराधना करण्यात तन्मय झाली. तिच्या कोमल कंठांतून निघणारा मंजुळ पण गंभीर स्वर मंदिराच्या बाहेर स्पष्ट ऐकूं येत होता.

श्री जगदंबे ! प्रणतवत्सले ! हात जोडितें तुला ॥
चंडी ! परिसें मम विनतिला ॥ धृ० ॥
कवण्या रीतीं तुला आळवूं-सांगूं मम हेतुला ॥
माझें वृत्त न वदवे मला ॥
हतभागिनी कन्यका तुझी मी, जन्म मला त्वां दिला ॥
केलें भूषण मज मत्कुला ॥
॥ चाल ॥ मत्तात-विसांवा मीच असे एकली ।
तो तात सकल मम बंधू भगिनि माउली ।
मज वागवि, जसि तो नेत्र निजा सावली ।
सौख्याचा या लाभ सदैवें आहे मज जाहला ॥
माझ्या विभवा नाहीं तुला ॥ १ ॥
वरपांगीं हीं सुखें, विभव हें गोडचि सारें दिसे ॥
परि मज सौख्य घडीभर नसे ॥
दुःख गिळुनि, अनमान न गणुनी कंठूं दिन मी कसे ? ॥
जडलें रात्रंदिन हें पिसें ॥
आज महाराणा मजविषयीं मागणि घालीतसे ॥
हृदयेश्वर मम अन्यचि असे ॥
॥ चाल ॥ मम तात मांडलिक त्या राण्याचा जरी ।
ही नीच याचना पडतां कानीं परी ।
तो खवळुनि गेला तात असे अंतरीं ।
तामसि दोघे माखवितिल या रक्तानें भूमिला ॥
चंडी ! आवरि तूं त्यांजला ॥ २ ॥

"हे जगच्चालिनी भक्तसुखकारिणी चंडीमाते ! प्रसन्न हो. आणि माझी मनकामना पूर्ण कर.

इतकें बोलून राजकन्येनें साष्टांग प्रणिपात केला, आणि पुनरपि हात जोडून ती एकाग्र चित्तानें देवीच्या मुखाकडे पहात राहिली. त्यावेळची तिची अचल दृष्टि पाहून असें वाटत होतें कीं, आपण केलेल्या प्रार्थनेला ती देवीच्या उत्तराची अपेक्षाच करीत आहे.

" कोकिळे ! एकूण त्या वृद्ध मेघावीनें सांगितलेली हकीकत खरी आहे तर ! " हळुहळू मंदिरांत येत असतां यशोधरा म्हणाली.

" होय. आतां आपण ऐकिलें यावरून सिद्धच होत आहे. " असें म्हणून कोकिळा मुकाट्यानें चालूं लागली. क्षणभरानें ती आपल्या मैत्रिणीकडे वळून म्हणाली, " पण काय ग यशोधरे ! आतां ताईमहाराज म्हणाल्या तो त्यांचा हृदयेश्वर कोण बरं असावा ? आपल्या ताईमहाराजांचं पवित्र प्रेम कोठल्या तरी राजपुत्रावर जडलं आहे अशी मला आजपर्यंत शंका देखील आली नाहीं. तुला आहे का माहीत ? "

" नाहीं. पण परवां अमात्यांनीं आणलेल्या अनेक तसबिरींपैकीं एक तसबीर ताईमहाराजांनीं आपल्या शयन मंदिरांत नेऊन ठेविली आहे इतकेंच मात्र मला माहिती आहे. "

" ती तसबीर कोठल्या बरं भाग्यवान् राजपुत्राची आहे ? "

" तें नाहीं अजून मला कळलं ? त्या गोष्टीचा मी आज शहानिशा करणार होतें तों हें मध्यें भलतेंच विघ्न उद्भवलें ? तरी देखील ताईमहाराजांनीं केलेली निवड सर्वथैव योग्यच असली पाहिजे. "

" यांत काय शंका ! "

दोघीजणी हळूंच मंदिरांत शिरल्या आणि दरवाजाजवळ मुकाट्यानें उभ्या राहिल्या परंतु त्यांची सावली आंत पडतांच देवालयांत कोणी तरी आलें आहे असें सुहासिनीच्या लक्षांत आलें. तिनें मागें वळून पाहिलें. तिची मुद्रा गंभीर पण उदासीन दिसत होती. नानाविध शंका आणि दुश्चिन्हें यानीं तिच्या अंतःकरणांत एकच गडबड उडवून देऊन तिला फार विव्हळ करून सोडलें होतें. मंदिराबाहेर असतांना राजकन्येचा स्वर ऐकून खऱ्या वस्तुस्थितीची चांगलीशी कल्पना झाली नव्हती परंतु मंदिरांत येतांच सुहासिनीची ती शोकाकुल स्थिति पाहून खरोखरच कांहीं तरी दुश्चिन्ह ओढवणार असें त्या दोघीजणींना वाटलें आणि त्यांचें हृदय व्याकुळ झालें. त्या अगदीं

विरघळून गेल्या. त्या तटस्थ वृत्तीनें तिच्या दुःखव्याप्त मुखेंदुकडे पहात राहिल्या. क्षणभरानें त्यांना प्रेमाचा अनावर उमाळा येऊन त्यांच्या डोळ्यांतून झरझर अश्रु वाहूं लागले, दोघींच्याहि तोंडांतून शब्द उमटेना. त्या केविलवाण्या मुद्रेनें सुहासिनीकडे पहात राहिल्या. ही आपल्या बाल्य सखींची स्थिति सुहासिनीच्या लक्षांत आली.

" सखे यशोधरे, " सुहासिनी सद्गदित स्वरानें म्हणाली, " सखे कोकिळे, आजपासून माझ्या दुःखाला सुरवात झाली ! " असें म्हणून तिनें कोकिळेच्या खांद्यावर आपला हात ठेवून दुःखातिशयानें भणभणून गेलेलें आपलें मस्तक यशोधरेच्या खांद्यावर ठेविलें.

" ताईमहाराज, आम्ही देखील आपल्या दुःखाच्या वाटेकरी आहोत हें आपण विसरलां कां ! आम्हाला सकाळपासून कां बरं अज्ञानांत ठेविलं आहे ? " कोकिळा म्हणाली.

" परंतु ताईमहाराज ! तुम्ही एवढ्या हताश कां झालां आहांत ? " यशोधरेनें विचारलें. " महाराण्यानें मागणी केली आहे ही गोष्ट खरी का ? "

" होय. "

" म—ग—"

" कोकिळे, तुला कसली शंका आली ? " सुहासिनी तिच्याकडे चौकस दृष्टीनें पहात म्हणाली, " महाराण्यानें मागणी केली यांत तुला भूषण का वाटतं ? तुला त्याचा दुष्ट स्वभाव आणि अनीतीचं आचरण माहिती नाहीं का ! विवाहाच्या दोन राण्या असून शिवाय त्याची नाटकशाळा अनेक स्त्रियांनीं भरली आहे ही लोकवार्ता तूं विसरलीस का ? फक्त तो महाराणा आहे म्हणून त्याच्या वैभवसत्तादिकांची आकांक्षी होऊन किंवा अशा वैभवसंपन्न, बलिष्ठ राजाची पट्टराणी व्हावयास मिळतें या इच्छेनें त्याच्या अपरंपार ऐश्वर्याची अभिलाषा धरून मी त्याच्या मागणीला ' हो ' म्हणेन असें का तुला वाटतं ! "

" नाहीं—ताईमहाराज, असे दुष्ट विचार माझ्या मनांत कधींहि यावयाचे नाहींत. मी त्या सत्ताधीश चांडाळाला ओळखित नाहीं असं का तुम्हांला वाटतं ? मला शंका आली ती इतक्याच गोष्टीबद्दल कीं—"

" बोल, बोल कोकिळे, अशी थाबूं नकोस ! तुला कोठल्या गोष्टीबद्दल शंका आली ? "

" ताईमहाराज, तुम्ही इतक्या निश्चयी स्वभावाच्या असून ह्या पापी महाराण्याची मागणी येतांच त्याला झिडकारण्याचं टाकून अशा शोक आणि दुःख करीत हताश होऊन बसलांत हें आश्चर्य नव्हे काय ? "

" पण कोकिळे, तूं असा गैरसमज करून घेऊं नकोस. महाराण्यानें माझी मागणी घालतांना जो निरोप पाठविला आहे त्या निरोपामुळेंच मी इतकी हताश होऊन गेलें आहें. "

" असा काय निरोप त्या पाप्यानें पाठविला आहे ? "

" ' सुहासिनीला शमीनगराची पट्टराणी करावी अशी माझी इच्छा आहे. माझ्या मागणीचा अव्हेर केल्यास बाहुबलानें मी तिला माझ्या नाटकशाळेंत खेंचून नेईन, ह्या गोष्टीचा नीट विचार करून माझ्या मागणीचा योग्य विचार करावा आणि मला समाधानकारक उत्तर पाठवावें ' असा त्यानें बाबांना निरोप पाठविला आहे. "

" ह्या निरोपाला असमाधानकारक उत्तर पाठविणें म्हणजे रक्तपात ! " यशोधरा मध्येंच म्हणाली.

" रक्तपात होईल इतकंच नव्हे तर माझ्या नकारानें ह्या शांत, सुखी आणि उत्साही मयुरनगरीचा उध्वंस होईल, ह्या विचारानें मी अगदीं हताश झालें आहें. मला कांहींच सुचत नाहीं. महाराण्याचा निरोप ऐकून बाबा अगदीं कोपाविष्ट होऊन गेले आहेत. आतां ह्या गोष्टीचें पर्यवसान काय होईल तें कळत नाहीं. मी सारखी चंडीमातेला आळवितें आहें. ह्या संकटांतून तिच्या शिवाय आतां आपणास कोण तारणार आहे ? सखे यशोधरे, कसंग हें मजवर संकट ओढवलं ! मज अभागिनीपुढें बाबांना वृद्धपणीं कितीतरी हें दुःख ! "

" ताईमहाराज, आतां दुःख करून काय होणार ! जी गोष्ट कधीं आपल्या स्वप्नीं नव्हती ती आतां होऊं पहात आहे. आतां आलेल्या संकटाचा प्रतिकार करण्याच्या उद्योगाला लागलं पाहिजे. महाराण्याला आपलं नकारार्थी उत्तर जातांच पुढें काय होणार हें तर आपणांस उघड दिसत आहे. तेव्हां भावी संकटाला तोंड देण्याची आपण जय्यत तयारी केली पाहिजे. "

" यशोधरे, तयारी ती कशी करायची ? आपलें सैन्यबल महाराजांच्या अफाट सैन्यसागरापुढें कितीसें टिकाव धरणार आहे ! "

"मला एक कल्पना सुचली आहे. ताई महाराज, ही वेळ म्हणजे आपणास दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा आहे. अशा वेळीं जर—"

"आपणाला कोण बरं मदत करणार आहे ? आणि आपणास मदत करून व्यर्थ महाराण्याचा स्वतःवर कोप करून घेण्यास कोण तयार होणार आहे ?"

"कोण म्हणजे आपल्या नाहीं का लक्षांत आलं !"

"नाहीं."

"आपण मघां चंडी मातेची आराधना करतांना म्हणालांत ते !"

"ते कोण ?"

"हृदयेश्वर !"

# मदतीची अपेक्षा ३

यशोधरेचें उत्तर ऐकतांच सुहासिनीच्या विचारांची दिशा बदलली. ती क्षणभर विचारमग्न झाली. मध्यंतरी चिंतेच्या उदयानें म्लान झालेलें सुहासिनीचें सदा प्रफुल्ल असणारें हास्यसुधापूर्ण मुखमंडळ हळुहळू उज्ज्वल दिसूं लागलें. तिचा उत्साह वाढूं लागला. तिचे नेत्रयुगुल मुदित झाले. यशोधरेनें सुचविल्याप्रमाणें आपणास संकटमुक्त होण्यास एक खात्रीचा मार्ग आहे असें आतां तिला वाटूं लागलें. ती क्षणभरानें म्हणाली, "खरंच गडे ! मजवर हें संकट येऊं पहात आहे असं त्या थोर पुरुषास कळलं तर—पण—" इतकें बोलून सुहासिनी गप्प राहिली. तिचा चेहरा पुनः गंभीर दिसूं लागला.

"ताई महाराज, पण काय ! अशा वेळीं जर त्यांच्या सहाय्याची याचना करायची नाहीं तर—"

"पण यशोधरे, आपल्या मार्गांत अडचणी किती आहेत याचा तूं विचार केलास का ? मी त्या पवित्र चरणी माझं सर्वस्व अर्पण केलं आहे याची त्यांना कल्पनादेखील नाहीं, असें असतां एकदम आपण त्यांच्या मदतीची अपेक्षा करणं—"

"चांगलं नाहीं असं का आपणास वाटतं ? परंतु सत्यनिष्ठ, सात्विक आणि

शुद्ध प्रेमाच्या राज्यांत अशा शंका कुशंका उद्भवतच नाहींत. मला त्याभाग्य-वान् पुरुषश्रेष्ठाचं नांव सांगा म्हणजे हरप्रयत्नानें मी त्यांस आपल्या पवित्र प्रेमाची ओळख करून देऊन संकट निवारणार्थ मी त्यांस येथें घेऊन येतें.'

"प—ण—!"

"पुनः पण आणि परंतु कशाला? ताईमहाराज, माझ्या बोलण्याचा आपणास विश्वास पटत नाहीं का?—आपण अशा विचारमग्न कां? ह्या देहावर आपली सत्ता आहे ना?—मग आपलं मन असं साशंक कां व्हावं? फक्त मला त्या नरवीराचें नांव सांगा म्हणजे त्याचें वास्तव्य येथून जरी असंख्य योजनें दूर असलें तरीहि ही आपली यशोधरा कधींहि माघार घ्यावयाची नाहीं. स्वामिनी कार्यांत हा देह कामीं आला तर देहाचं सार्थक झालं असंच मी समजेन!"

"यशोधरे, सखे तुझ्याविषयीं माझी पूर्ण खात्री आहे पण—"

"पुनः 'पण' कां?"

"हा पुनः 'पण' कां, तो तुझ्या नाहीं लक्षांत आला यशोधरे!" राजकन्येकडे तिरक्या दृष्टीनें पहात मध्येंच कोकिळा म्हणाली, "आपल्या सुखाकरितां वाटेल तें भयंकर दिव्य तुला करायला सांगितलं तरी तें तूं मोठ्या आनंदानें करशील अशी ताईमहाराजांची खात्री आहे परंतु हें 'पण' येण्याचं कारण कांहीं निराळेंच आहे." असें म्हणून ती पुनः सुहासिनीच्या तोंडाकडे पाहूं लागली. तिच्या चर्येवरून कोकिळेनें आपलें हृद्गत जाणलें असें सुहासिनीला वाटलें. कोकिळा काय सांगते तें ऐकण्यासाठीं मोठ्या उत्सुकतेनें तिच्या मुखाकडे राजकन्या पाहूं लागली. आपल्या मैत्रिणीची जिज्ञासा वाढवून क्षणभरानें कोकिळा हास्य मुद्रेनें म्हणाली, "हें पण म्हणजे काय, तें सांगूं का यशोधरे? अग, ताईमहाराज आपल्या त्या उच्च कुलोत्पन्न हृदयेश्वराचं नांव—नगरी सागण्यास लाजतात म्हणून हा 'पण' आणि 'परंतु'!"

सुहासिनीच्या मुखावर स्मित छटा विलसूं लागली. ती सलज्ज मुद्रेनें यशोधरेकडे पाहूं लागली. यशोधरा विनोदप्रिय होती आणि प्रस्तुतचा विषय थट्टेला अगदीं योग्य होता, परंतु तिनें आत्मसंयमन केलें. यशोधरा फारच विचारी, दूरदृष्टि आणि समयोचित वर्तणारी होती. सुहासिनीची थट्टा करण्याचा तो योग्य प्रसंग होता तरी सांप्रत आपल्या मैत्रिणीवर इतकेंच नव्हे तर आपल्या सर्व नगरीवर कोणता प्रसंग येऊं पहात आहे याचा विचार करून ती गंभीर स्वरानें म्हणाली, "असं का? मग त्याला आहे एक युक्ति! ताई-

महाराज, आम्हाला ती रमणीय तसबीर दाखवा म्हणजे त्यावर कुशल चितान्यानें लिहिलेलें नाव आणि नगरी आम्हांला कळेल."

यशोधरेचें हें साधें उत्तर ऐकून कोकिळेचा बराच हिरमोड झाला. थट्टेची सुसंधि मिळाली असतां यशोधरा ती व्यर्थ दवडील असें तिला वाटलें नव्हतें. ती क्षणभर यशोधरेच्या मुखाकडे पहात राहिली. परंतु यशोधरेनें त्याकडे लक्ष न देतां ती उठली. त्यावेळीं बहुतेक सर्वत्र काळोख पडला होता. मशालजीनें मंदिरांतील दीप लावण्यास नुकतीच सुरवात केली होती. इतक्यांत एक दासी आपल्या स्वामिनीचा शोध करीत मंदिरांत आली.

"ताईमहाराज, राणाजी केव्हांपासून आपली वाट पहात आहेत. मी सर्व उद्यान शोधलें; तुम्ही येथें असाल अशी मला कल्पना देखील नव्हती. नाहींतर मी प्रथम येथेंच आलें असतें. आज राणाजींची मुद्रा फार चिंतायुक्त दिसत आहे—"

सुहासिनीनें दासीच्या चऱ्हाटाकडे लक्ष दिलें नाहीं. तिनें पुनः एकदां चंडीदेवीला नमन केलें. आणि हळूच ती आपल्या जागेवरून उठली. मंदिरांतून बाहेर पडत असता पुनरपि तिच्या मनांत निरनिराळे विचार येऊं लागले. यशोधरा आणि कोकिळा तिच्या मागून चालत होत्या. दासी बरीच मागें होती. राजमार्गावरून प्रासादांत प्रवेश करीत असतां मार्गावरील पहारेकरी आणि अनुचर सुहासिनीला पाहतांच आपलें मस्तक वांकवून नम्रतेनें प्रणाम करीत. क्षणभरानें राजकन्या प्रासादांतील भव्य दिवाणखान्यांत आली. तेथें एका मौल्यवान् आसनावर राणा भद्रसेन सचिंत बसला होता. त्याचें वय जवळ जवळ साठ वर्षांच्या घरांत होतें. बांध्यानें सशक्त असून तो उंच आणि धिप्पाड पुरुष होता. सांप्रत त्याचें तोंड चिंतेनें व्याप्त झालेलें दिसत होतें, तरी गांभीर्याची पूर्ण छटा त्याच्या चेहऱ्यावर दिसत होती. त्याचा स्वभाव, त्याची न्यायनीति आणि प्रजेबरोबर त्याचें वर्तन कशा प्रकारचें होतें हें थोडक्यात सांगावयाचे म्हणजे सर्व प्रजा त्याला प्रत्यक्ष आपल्या पितृस्थानीं मानीत होती, एवढें सांगितलें असतां बस्स आहे. सुहासिनी अगदीं लहान असतांना, म्हणजे केवळ रांगतें बालक असतांना ती मातृसुखाला पारखी झाली. त्यानंतर एकदोन वर्षें विधुरावस्थेंत काढल्यानंतर राणाजीनें पुनर्विवाह करावा अशी मंत्रीमंडळाची फार इच्छा होती. गादीला वारस असावा म्हणून कैक वेळां त्यांनीं राणाजीजवळ आपली इच्छा दर्शविली.

परंतु राणाजीच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं. कारण मृणालिनीवर—आपल्या गत पत्नीवर राण्याचें अकृत्रिम प्रेम होतें. सुहासिनी ही आपल्या मातेची केवळ प्रतिमा होती. तिच्याकडे पाहतांच राणाजीला आपल्या प्रियकर पत्नीची वेळोवेळीं स्मृति होत असे. आणि तेवढ्याचकरितां सुहासिनी हीच आपला आनंद, जीवन आणि पुत्र आहे असें मानून राणाजी आपल्या प्रियकर पत्नीच्या विरहाचे दिवस कंठीत होता.

दिवाणखान्यांत राणाजी बसलेले पाहून यशोधरा आणि कोकिळा बाहेरच उभ्या राहिल्या. सुहासिनी मंदगतीनें पुढें झाली. आणि पित्याला नमन करून बाजूला उभी राहिली. राणाजीनें तिच्याकडे पाहिलें, आणि एक दीर्घ श्वास सोडला.

" सुहासिनी, बैस. " राणाजी म्हणाला, " महाराण्याकडून निरोप आल्यापासून माझें मन अगदीं अस्वस्थ झालें आहे. आज सर्व दिवस मी ह्याच गोष्टीचा विचार करीत आहें. मी त्याचा मांडलिक आहें, म्हणून त्यानें मला असा निरोप पाठविला असें मला वाटतें. त्याच्या धमकावणीला भिऊन मी जर त्याची मागणी मान्य केली तर काय होईल ?—सुहासिनी, तुझ्या सर्व सुखाचा नाश होईल. परंतु बाळे, अशी गोष्ट माझ्या हातून कधींहि होणार नाहीं. महाराण्याचा वर्तनक्रम किती नीचपणाचा आहे त्याची मला पूर्णपणें माहिती आहे. शिवाय परवां आपल्या कनक अमात्यानें ज्या कांहीं थोड्या तसबिरा आणल्या त्यांपैकीं एका वीर पुत्राची तसबीर तूं पसंत केली आहेस असेंही मला कळलें आहे. " पित्याचें हें शेवटचें वाक्य ऐकतांच सुहासिनीनें अधोवदन केलें. तें पाहून राणाजी पुढें म्हणाला, " सुहासिनी, मला कळलेली गोष्ट जर खरी असेल तर महाराण्याची मागणी मी कधींहि कबूल करणार नाहीं."

" पण पिताजी, त्याचा परिणाम काय होईल ?—महाराणा आपल्या नगरीवर असंख्य सैन्यानिशीं चाल करून येईल—"

" त्याची मला मुळींच भीति नाहीं. अनीतीचा प्रतिकार करण्याकरितां माझा प्रत्येक वीर रणमैदानावर मोठ्या उत्साहानें जाईल, हें तूं विसरलीस काय ! उगाच रक्तपात करून आपल्या पुत्रवत् प्रजेंत असंतोष उत्पन्न व्हावा ही माझी इच्छा नसल्यामुळें महाराण्याला मी आजपर्यंत नेमानें खंडणी देत आलों. परंतु त्याचा परिणाम निराळा झाला. मी निर्बल असून रणभीरू

आहे असें वाटूनच त्यानें मला ही दहशत घातली आणि तुझी मागणी केली. परंतु ही राजनीति नव्हे !"

पिताजी, महाराण्याची आणि राजनीतीची ओळख असेल किंवा नाहीं याचीच मला शंका उद्भवते !"

राणाजीनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. परंतु क्षणभरानें विषय बदलून आपल्या लाडक्या कन्येच्या मुखाकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पहात राणाजीने विचारलें, "सुहासिनी, आपल्या अमात्यानें आणलेल्या तसबिरींतून तूं एक ठेविली आहेस, हें आतां निश्चित झालें. होय—ती तुझी चर्याच स्पष्टपणें सांगत आहे. हें पहा—सुहासिनी, अशी लाजूं नकोस. तूं समंजस आहेस, तेव्हां कुलशीलाच्या बाबतींत तुझी निवड योग्यच असली पाहिजे. अशी माझी खात्री आहे. परंतु एकवेळ ती तसबीर पहावी अशी माझी इच्छा आहे."

सुहासिनी खालच्या मानेनें उठली. आणि हळु हळू आपल्या शयनगृहाकडे गेली. राणाजी तिच्याकडे पहात राहिला. तिची चालण्याची ढब पाहून त्याचें अंतःकरण गतपत्नीच्या स्मृतीनें भरून गेलें. क्षणभरानें त्याच्या नेत्रांतून दोन अश्रुबिंदू बाहेर पडले. तो स्वतःशींच बोलूं लागला, "मृणालिनी! हे स्वर्गस्थ देवी! तूं हा आपला प्रेमतंतु माझ्या स्वाधीन करून गेली आहेस, त्याची योग्य जोपासना मजकडून होत आहे किंवा नाहीं हें तूं स्वर्गांतून पहात आहेस हें मी जाणून आहें. आपल्या सुहासिनीच्या सुखाकरितां महाराण्या-बरोबर घनघोर युद्धसंग्राम करावा लागला तरी बेहेत्तर आहे. मी सुहासिनीच्या प्रेमाआड कधींहि येणार नाहीं." असें म्हणून राणाजी वरच्या छताकडे क्षणभर अचल दृष्टीनें पहात राहिला. थोड्या वेळानें सुहासिनी हंसगतीनें आंत आली. तिच्या हातांमध्यें एक तसबीर होती. ती तसबीर तिनें दोन्ही हातांनीं अशा रीतीनें हृदयाशीं धरली होती कीं, त्यामुळें त्या प्रतिमेविषयीं तिचें प्रेम, भक्ति आणि आदर सहजच व्यक्त होत होतीं. सुहासिनीनें ती तसबीर आपल्या पित्याच्या हातीं दिली. राणाजीनें ती तसबीर बराच वेळ न्याहाळून पाहिली. इतक्यांत त्याची दृष्टि चित्राच्या खालीं लिहिलेल्या नांवावर गेली. त्याबरोबर त्याच्या मुखांतून आनंदाचे उद्गार बाहेर पडले !

"हा भीमरथाचा पुत्र अमरसिंह !" असें म्हणून तो आश्चर्यचकित मुद्रेनें सुहासिनीकडे पहात राहिला. "सुहासिनी, तुझ्या नैसर्गिक शुद्ध प्रेमानें ही जी राजपुत्राची निवड केली, त्यामुळें स्वाभाविक रीतीनें किती तरी गोष्टी जुळून

आल्या त्याची तुला कल्पना देखील नसेल! विजयपूरच्या भीमरथाचा आणि माझा किती जुना स्नेह संबंध! परंतु तुझी माता निवर्तल्यापासून मी नगरी सोडून कोठेंच गेलों नसल्यामुळें आमचा स्नेहसंबंध अगदीं शिथिल झाला होता, तो आतां तुझ्या या प्रेमाच्या निवडीमुळें पुनः पूर्ववत् होणार हें पाहून मला आनंद होत आहे. शिवाय दुसरा एक योग जुळून आला आहे. भीमरथानें आता नुकताच चार वर्षांपूर्वी द्वितीय संबंध केला. ही त्याची द्वितीय संबंधाची पत्नी, राणी दामिनी आपल्या महाराण्याची कनिष्ठ भगिनी होय. म्हणजे पर्यायानें महाराणा धुंडपाळ हा तुझ्या इच्छित वराचा मातुल होय." इतकें बोलून राणाजी कांहीं वेळ विचारमग्न झाला. हा चमत्कारिक योगायोग जुळून आल्यामुळें पुनः त्याच्या विचाराचा ओघ बदलला. क्षणभरानें तो म्हणाला, "महाराण्याला ही गोष्ट कळली तर त्याच्या मनावर ह्या गोष्टीचा विपरीत परिणाम होईल असें मला वाटतें. आपल्या भगिनीच्या सावत्र मुलाची—अमरसिंहाची आपण वर योजना केली आहे हें समजल्यावर आनंद वाटण्या ऐवजीं आपला अपमान केला असें वाटून तो अविचारी राणा विकारवश होईल अशी माझी खात्री आहे, पण त्याला नाइलाज आहे. सुहासिनी, तुझ्या सुखापुढें राण्याच्या क्रोधाची मला कांहींच पर्वा नाहीं."

इतका वेळ सुहासिनी आपल्या पित्याचें भाषण मुकाट्यानें ऐकत होती. आपण स्वतःच्या निवडीनें ज्यांस आपल्या देहाचे स्वामी केलें, ती निवड आपल्या पूज्य पित्याला पसंत पडलेली पाहून सुहासिनीला आनंद झाला. ती क्षणभर त्या आनंदांत गर्क होती, तोंच तिला धुंडपाळाच्या मागणीची आठवण झाली. आपण त्याची मागणी अमान्य केली हें ऐकून आपला अपमान झाला म्हणून तो आपल्या नगरीवर चाल करून येईल वगैरे विचार तिच्या मनांत येऊं लागले. ती वीरबाला होती तरी धुंडपाळाच्या स्वारीची तिला एक प्रकारची दहशत वाटत होती. फक्त आपल्या सुखाकरितां सर्व नगरींतील शांततेचा भंग होऊन असंख्यात सुखी कुटुंबें दुःखी होतील, ह्या विचारानें तिच्या कोमल हृदयाचें पाणी होऊं लागलें. हळुहळू तिचे विचार-तरंग वाढूं लागले. एकीकडे ती आपल्या हृदयवल्लभाचा विचार करी, तों धुंडपाळाचा दुसरा विचार तिच्या मनांत येई. अशी तिची मनःस्थिति चमत्कारिक झाली होती. ती आपल्या विचारतरंगांत इतकी गढून गेली होती कीं, राणाजी केव्हां उठून गेला हें देखील तिच्या लक्षांत आलें नाहीं.

त्यावेळीं ती मखमालीच्या एका मृदु कोचावर बसली होती. आणि राणाजीनें जातांना ठेविलेली तिच्या प्राणेशाची प्रतिमा तिच्या समोरच होती. सुहासिनी आपल्या विचारतरंगांत पोहत असतां तिची दृष्टि सहज त्या प्रतिमेवर निश्चल झाली होती. त्या वेळचा देखावा खरोखरीच फार मनोहर दिसत होता. सुहासिनीची त्या प्रतिमेशीं तन्मय झालेली स्थिति पाहून जणूं काय संकट निवारणार्थ ती आपल्या प्राणवल्लभाचें विनयानें आर्जव करीत आहे कीं काय असें वाटत होतें.

इतक्यांत यशोधरा आणि कोकिळा आंत येऊन मुकाट्यानें सुहासिनीच्या मागें उभ्या राहिल्या.

---

## दरबार ४

दिवाणखान्याच्या मध्यभागीं असलेला भव्य दीपकाचा लख्ख प्रकाश त्या प्रतिमेवर पडून चतुर चितार्‍यानें कुशलतेनें रेखाटलेल्या निरनिराळ्या रंगांत अमरसिंहाचें प्रतिबिंब फारच रमणीय दिसत होतें. यशोधरा आणि कोकिळा आंत येतांच त्यांची दृष्टि त्या प्रतिमेवर अचल झाली. क्षणभरानें त्या मनोहर चित्रानें त्या दोघींचें मन इतकें वेधून घेतलें कीं, किंचित्काल त्या देहभान रहित झाल्या ! थोड्या वेळानें अमरसिंहाच्या प्रतिमेवरून आपली दृष्टि काढून यशोधरेनें त्या तटस्थ वृत्तीचा भंग केला.

“ ह्या भुवन मनोहर महेन्द्ररूपी राजपुत्राला जगच्चालक प्रभु उदंड आयुष्य देवो ! ” असें म्हणून तिनें आपल्या कानशीलावर कडाकड बोटें मोडलीं. त्याबरोबर सुहासिनी आपल्या प्राणेश चिंतनाच्या निमग्नतेंतून जागी झाली.

“ ताई महाराज, या वीररत्नाची मदत मिळेल तर खात्रीनें आपण संकट-मुक्त होऊं. ” यशोधरा म्हणाली, “ आतां तुम्हीं विचार कसला करतां ! उदईक दरबार भरविण्याचा राणाजींनीं नुकताच हुकूम सोडला आहे. तेव्हां पुढें काय काय गोष्टी घडून येणार तें आतां स्पष्ट दिसतच आहे. म्हणून म्हणतें आपण आतांपासून तयारींत असावें तें चांगलें. थोड्या वेळापूर्वी राणा-जींनीं हुकूम देतांना काढलेल्या उद्गारांवरून लवकरच युद्धाला तोंड मिळेल असा रंग दिसतो. ”

" सखे यशोधरे, मला देखील तसेंच वाटतें. " सुहासिनी करुणस्वरानें म्हणाली, " पण ही मदत मागविण्यास आपण काय कारण दाखविणार ? "

" कारण ?—प्रेम ! "

" यशोधरे, पण गडे ! हें अवघड काम तूं कसं करशील हेंच मला कळत नाहीं. "

" त्यांत काय आहे ! तुमचं कुंकुमतिलककंकण त्यांच्या स्वाधीन करायचं आणि त्या कंकणावरील संकट निवारण करून त्याचं आजन्म रक्षण करा अशी विनंति करायची ! ताई महाराज, तुम्हाला त्या विषयीं बिलकुल चिंता नको. मी हरप्रयत्नानें आपल्या शुद्ध प्रेमाची त्या वीरपुरुषाला ओळख करून देऊन त्यांस येथें घेऊन येईन. "

बराच वेळ त्या तिघी मैत्रिणींचा ह्या गोष्टीवर खल होऊन दुसऱ्या दिवशीं भरणाऱ्या दरबारांत काय ठरतें तें पहावयाचें आणि त्याप्रमाणें पुढल्या गोष्टी ठरवायच्या असें ठरलें. रात्रीं भोजनोत्तर पुनः त्या तिघी मैत्रिणींचें त्रिकुट जमलें !

सर्व नगरींत आज विशेष गडबड दिसत होती. राणाजीनें हुकूम सोडल्याप्रमाणें सकाळच्या दुसऱ्या प्रहरीं दरबार भरावयाचा होता. राज-प्रसादाच्या समोर भव्य पटांगणांत हा खास दरबार भरणार होता, त्यामुळें उत्तर रात्रीपासूनच त्या मंडपाची रचना सुरू झाली होती. सूर्योदयाच्या सुमारास सर्व मंडप तयार झाला. मंडपाच्या दर्शनी स्तंभावरून दैदिप्यमान मणिमुक्तादिकांच्या सुंदर माला सोडल्या होत्या. त्यावरून मंडपाच्या आंतील काम किती प्रेक्षणीय आणि मनोहर झालें असेल याची सहज कल्पना होण्यासारखी आहे. दोन्ही बाजूला अमीर उमराव याच्या योग्यतेप्रमाणें लहान मोठ्या जागा मुद्दाम तयार केल्या होत्या. मध्यभागीं रत्नजडीत सिंहासन मांडलें होतें. त्याच्या उजव्या बाजूला दुसरें एक उंच आसन मांडलेलें होतें. दरबाराचा वेळ भरत येण्यापूर्वीच मंडपाच्या बहुमूल्य छताला ठिकठिकाणीं हीरकमाला लावून मंडपाची पूर्ण तयारी झाली. थोड्या वेळानें चोपदारानें शृंग वाजविण्यास सुरवात केली. हळुहळू त्या प्रशस्त मंडपांत सभासदांच्या आगमनाला सुरवात झाली. मधून मधून चोपदारांच्या ललकारण्या होत होत्या. अशा रीतीनें नेमलेल्या वेळेच्या आंत सर्व दरबारमंडप सभासदांनीं अगदीं गच्च भरला. कांहीं वेळानें चार सुवर्णदंडधारी चोपदार मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ

येऊन उभे राहिले. त्यांच्यामागून एकजात सारखे पोषाक केलेल्या सशस्त्र सैनिकांची तुकडी आली. ह्या सैनिकांच्या मध्यभागीं एक भव्य ध्वज वातावरणांत फडफडत होता. ह्या ध्वजावर मयूर नगरीचें ‘ मयूर ’ राजचिन्ह होतें. सर्व सभासद आतां तटस्थ वृत्तीनें प्रवेशद्वाराकडे राणाजीच्या आगमनाची वाट पहात होते. इतक्यांत चोपदाराचा जयजय शब्द त्या प्रशांत सभामंडपांत ध्वनि प्रतिध्वनित करूं लागला. त्याबरोबर सर्व सभा उठून उभी राहिली. क्षणभरानें रत्नखचित पोषाक केलेला राणा भद्रसेन आंत आला. त्यावेळीं राणाजीला प्रणाम करण्याकरितां प्रत्येक सभासदानें आपलें मस्तक खालीं वाकविलें. राणाजीच्या उजव्या बाजूला राजकन्या सुहासिनी चालत होती. तिच्या बहुमूल्य अवगुंठन वस्त्रांतून शरदृतूंतील पौर्णिमेच्या शुभ्र विमल कौमुदीप्रमाणें रसिकांचीं मनें हरण करणारी तिची अंगकांति स्पष्ट दिसत होती.

राणाजी सिंहासनावर आरूढ झाल्यावर, उजव्या बाजूला असलेल्या आसनावर सुहासिनी बसली. नंतर सर्व सभासद आपापल्या स्थानावर बसले. थोड्या वेळानें स्तुतिपाठकानें जयजयकार करून उच्च स्वरानें राणाजीचा स्तुतिपाठ म्हणण्यास सुरवात केली.

पुनः चोपदारानें शंखनाद केल्यावर चहूंकडे शांत झालें. क्षणभरानें राणाजीने सिंहासनावरून उठून धीर गंभीर स्वरानें बोलण्यास सुरवात केली. तो म्हणाला, “ माझे अमीर उमराव व सरदारहो ! मी ह्या अग्निकुलवंशी पवित्र सिंहासनावर नीतीचा राजदंड घेऊन विराजमान झाल्यापासून माझ्या कारकीर्दीत प्रजेच्या सुखाकरितां आणि नगरींत सर्वत्र शांतता राखण्याविषयीं काय काय गोष्टी केल्या त्या सर्व आपणास अवगत आहेत. आज हा खास दरबार भरलेला पाहून तुम्हां सर्वांना आश्चर्य वाटलें असेल. कारण वार्षिक उत्सवाखेरीज मी आजपर्यंत असा खास दरबार कधींहि भरविला नाहीं. परंतु हा खास दरबार भरविण्याचें कारण सागण्यापूर्वी आपल्या मनांत आज बरींच वर्षें मूळ धरून असलेली शंका मी प्रथम निरसन करितों. मी कित्येक वर्षें धुडपाळ महाराण्यास नेमानें खंडणी भरितों तीबद्दल प्रजेचा मजवर रोष आहे. परंतु ज्यावेळीं हा खंडणी देण्याचा प्रथम प्रसंग आला त्यावेळीं आपल्या नगरीची फारच शोचनीय स्थिति होती. तशा स्थितींत मी खंडणी देण्याचें नाकारिलें असतें तर युद्ध प्रसंग येता आणि त्यामुळें व्यर्थ रक्तपात होऊनहि परिणाम काय झाला असता तो सांगतां आला

नसता. त्यानंतर अलीकडे चार सहा वर्षांत आपली सांपत्तिक स्थिति सुधारून सैन्यबळहि चांगलें वाढलें. तेव्हां आतां मी खंडणी देऊं नये अशी मंत्रि-मंडळानें मला एकवेळ सल्ला दिली आणि मलाहि ती प्रथम मानवली. परंतु विचारांतीं ती सल्ला मी अमान्य केली. कारण खंडणी देण्याचें बंद केलें म्हणजे साहजिक धुंडपाळानें आपणावर स्वारी केली असती. आणि सुदैवानें जरी आपणास जय प्राप्ति झाली असती तरी त्यापासून मला आनंद झाला नसता. कारण वार्षिक पांच पन्नास हजार मोहरा वांचविण्याकरितां आपल्या शेंकडों पुत्रवत् सैनिकांचा युद्धांत बळी द्यावयाचा ही राजनीति मला पसंत नाहीं. एक मानव जीव अगणित मोहरा मोजूनही मिळणारा नाहीं अशी माझी प्रामाणिक समजूत आहे. शिवाय खंडणीकरितां देश जिंकणें, त्याकरितां प्राणहानि करणें, उगाच मर्यादेबाहेर राज्य वाढविणें व त्यामुळें राज्यांत बेबंदशाही माजवून रयतेला दुःखी करणें ही देखील राजनीति नाहीं. "

राणाजीनें थोडक्यांत पण मुद्देसूद रीतीनें ही राजनीतीची व्याख्या केलेली पाहून सर्व सभासदांनीं माना डोलाविल्या आणि कित्येकानीं राणाजीच्या नांवाचा जयजयकार करून आपला आनंद व्यक्त केला. थोड्या वेळानें राणाजी पुढें म्हणाला, " परंतु आज खास दरबार भरविण्याचें कारण अगदीं निराळें आहे. थोड्या दिवसांपूर्वी महाराण्यानें राजकन्येची मागणी घातली, ही हकीकत तुम्हांस अवगत आहे. ही मागणी घालतांना त्यानें आपल्या अधि-काराचा उपयोग करून मला दहशत घातली आहे हेंहि तुम्ही जाणतां. तेव्हां आतां पाल्हाळ न करतां इतकेंच सांगतों कीं, राण्याचें वर्तन राजपदाला लांछन आणणारें असल्यामुळें त्याच्या नगरींतील कुलीनास आपला लौकिक सांभाळण्यास कठीण जात आहे हें सर्व श्रुत आहे. शिवाय त्याला दोन राण्या असून त्याची नाटकशाळाहि मोठी आहे. अशा दुर्वृत्त पुरुषास आपली कन्या देण्यास कोण तयार होईल ? माझ्या सुहासिनीला असा वर स्वप्नींहि पसंत पडणार नाहीं हें मी आपणांस सांगावयास पाहिजे असें नाहीं. तेव्हां आतां मोठा बिकट प्रश्न उद्भवला आहे. मी आज हा खास दरबार भरविला याचें मुख्य कारण हेंच होय. मी महाराण्याची मागणी अमान्य केल्याचा निरोप येथून जातांच राणा क्रोधावश होऊन ससैन्य आपल्या नगरीवर चाल करून येईल. करितां आतांपासूनच आपणास तयारीनें राहिलें पाहिजे—"

" आमची पूर्ण तयारी आहे. राजभगिनीचें रक्षण करणें हें आमचें कर्तव्य

आहे. राणाजींनीं निर्भय असावें." कित्येक वीरपुरुषांच्या तोंडांतून उद्गार निघाले.

हे आश्वासनकारक उद्गार ऐकून राणाजी आणि सुहासिनी यांची मुद्रा प्रफुल्लित दिसूं लागली. पुढें थोडा वेळ मंत्रीमंडळाबरोबर संभाषण होऊन महाराणा धुडपाळाला त्याची मागणी नाकारली असें उत्तर पाठविण्याचें ठरलें. नंतर अत्तर गुलाब वांटून होतांच दरबार बरखास्त झाला. सुहासिनी आपल्या पित्याबरोबर प्रासादांत परत आली. त्यावेळीं तिची मुद्रा गंभीर स्मित होती. स्वतःच्या मंदिरांत आल्यावर आपल्या अंगावरील बहुमूल्य उपवस्त्र एका कोचावर फेंकून देऊन ती बाजूच्या सुवर्ण मंचकावर जाऊन बसली. थोडा वेळ स्वगत विचारांत मग्न झाल्यावर तिचें मन हळुहळू अस्वस्थ होऊं लागलें. आपल्यामुळें सर्व नगरीवर भयंकर संकट ओढवणार आणि त्यामुळेंच पूर्व सूचक म्हणून कारणाशिवाय आपलें मन अस्वस्थ होत आहे असें तिला आतां वाटूं लागलें.

सुहासिनीनें सर्व दिवस विचारांत घालविला. जशी जशी सायंकाळ होऊं लागली तशी तशी तिची वृत्ति चमत्कारिक होऊं लागली. ती मधून मधून दरवाज्याकडे पाही. ती आपल्या मैत्रिणींची मार्गप्रतिक्षा करीत होती. आधल्या दिवशीं ठरल्याप्रमाणें दरबारांत काय बेत ठरतो तो पाहून यशोधरा आज प्रवासाला निघणार होती. परंतु सर्व दिवसांत यशोधरेकडून कांहींच न कळल्यामुळें तिच्या मनांत अनेक कुतर्क येऊं लागले. यशोधरेनें आपणास मधाचें बोट दाखविलें असें आतां तिला वाटूं लागलें. शेवटीं तिच्या मनाची अस्वस्थता फार वाढली. ती आपल्या मंचकावरून उठली आणि त्या प्रशांत दिवाणखान्यांत येरझारा घालूं लागली. इतक्यांत धाडकन् दरवाजा उघडून बावीस वर्षांचा एक युवक आंत आला.

# यशोधरेची तयारी ५

"ताईमहाराजांचं काम मी करणार!" सुहासिनीला गडबडीनें प्रणाम करीत तो युवक म्हणाला, "मी आतां कोठलीहि सबब ऐकणार नाहीं. ताईमहाराजांचं काय काम आहे, त्याचें स्वरूप काय आहे तें सर्व कळल्या-

शिवाय मी येथून—ताईमहाराजांच्या चरणाजवळून—एक रतीभरदेखील हालणार नाहीं."

पायांजवळ वीरासन घालून बसलेल्या त्या युवकाच्या मुखाकडे क्षणभर कौतुकानें पाहत सुहासिनी म्हणाली, "विनोदा, तुझ्या बोलण्यावरून तूं अगदीं कंबर कसून आला आहेस, असें दिसतें. पण तुला देण्याला मजजवळ काम काय आहे?"

"ताईमहाराज, तें मी बिलकुल ऐकायचा नाहीं. यशोधराताईला तुम्ही काम सांगितलं आणि मीच काय केलं? मी तिच्यापेक्षां मोठा आहें, तेव्हां ताईमहाराजाचं काम करण्याचा माझा अधिकार जास्त पोंचतो."

"होय. तूं मोठा आहेस, तुझा अधिकार मोठा आहे. हें सर्व मी जाणतें. पण यशोधरेला मी कांहीं कामच सांगितलं नाहीं, तेव्हां तुला तरी मी कुठलं काम सांगूं?"

"कोठलं सांगूं म्हणजे! यशोधराताईला जें सांगितलं आहे तेंच मला सांगा. तिची सकाळपासून जारीनें तयारी चालली आहे. मी केव्हांपासून तिची पाठ पुरविली—सारखी कटकट लाविली, तेव्हां आतां कुठें तिनें मला सांगितलें कीं, 'मी ताईमहाराजांच्या कामगिरीवर जाण्याची तयारी करीत आहें.' इतकें कळतांच मी येथें धांवत आलों—हें काय बरं ताईमहाराज! राणाजीहि मला कांहीं कामगिरी नेमून देत नाहींत आणि तुम्ही देखील मला कांहीं काम सांगत नाहीं!"

विनोद अंगविक्षेप करीत आपल्या विनोदप्रचुरवाणीनें सारखा बोलत होता. परंतु त्याच्या पुढल्या भाषणाकडे सुहासिनीचें बिलकूल लक्ष नव्हतें. 'यशोधरा सकाळपासून जाण्याची तयारी करीत आहे,' हे विनोदाच्या तोंडचे शब्द ऐकताच तिला एकाएकीं नवा उत्साह आला. आशेनें पुनः तिच्या मनांत वास्तव्य केलें. ती स्वतःच्या विचारांत क्षणभर गर्क झाली. वाचकहो! सुहासिनी आपल्या विचारांत मग्न आहे आणि विनोद आपल्या बोलण्यांत दंग आहे. तोंपर्यंत आपण विनोदाची ओळख करून घेऊं. यशोधरा आणि विनोद हीं दोघें वीरमणी अमात्याचीं मुलें. ह्या सुशील वृद्ध अमात्यानें साठ वर्षेपर्यंत मयूरनगरीच्या गादीची सेवा फारच इमानें इतबारें केली होती. मरण समयीं त्यानें आपलीं हीं दोन्हीं मुलें राणाजीच्या चरणीं अर्पण केलीं, तेव्हां अमात्याची चाकरी लक्षांत आणून राणाजीनें त्या दोघां मुलांना

खास आपल्या जवळ ठेऊन घेतलें. त्यावेळीं विनोद दहा वर्षांचा आणि यशोधरा सहा वर्षांची होती. सुहासिनी आणि यशोधरा समवयस्क असल्यामुळें त्या दोघीजणी आणि तिसरी कोकिळा, ही नव्या अमात्याची—कनकवीराची मुलगी—यांची लवकरच मैत्री जुळली. विनोद हा अत्यंत चपळ, हुशार आणि बुद्धिमान् होता, परंतु डोक्याचा मात्र हलका होता. कित्येक प्रसंगीं तो अगदीं वेड्यासारखें वर्तन करी. त्यामुळें त्याच्या इतर सर्व गुणावर पाणी पडे. कोठल्याहि गोष्टीचा, मग ती गोष्ट आनंदाची असो किंवा दुःखाची असो, एकदां अतिरेक झाला, म्हणजे त्याचा परिणाम तात्काल त्याच्या डोक्यावर होत असे. लहानपणीं त्याला अशा वेडाच्या लहरी येत, परंतु ती गोष्ट कोणाच्याहि लक्षांत आली नाहीं. त्याचें चमत्कारिक वर्तन आणि त्या वेडाच्या लहरींत तो जें बोलत असे त्या बोबड्या बोलाचें कौतुक वाटून त्याचें विनोद असें नांव पडलें. वास्तविक आतां त्याचें नोकरी करण्याचें वय झालें होतें. परंतु ह्या एका गोष्टीमुळें राणाजीनें त्याला कोठलीच असामी दिली नाहीं. हीं दोन बहिणभावंडें कनक अमात्याकडे रहात असल्यामुळें विनोदानें आपल्या गुणानीं कोकिळेचें मन ओढून घेतलें होतें. परंतु ही गोष्ट अद्यापि कोणालाहि कळली नव्हती. केव्हां केव्हां विनोदाच्या भाषणाची किंवा त्याच्या वर्तणुकीबद्दल कोणी थट्टा करूं लागले म्हणजे कोकिळेला तें बिलकूल खपत नसे. तिला अतिशय राग येत असे. अशावेळीं मात्र, तिला राग कां येतो याचें इतरांना मोठें गूढ पडत असे. असो.

" विनोदा, तुला कोणीच काम सांगत नाहीं, तेव्हां तुझी मौज आहे म्हणायची !" थोड्या वेळानें सुहासिनी म्हणाली. " खुशाल खावं, प्यावं, आणि चैनींत असावं—"

" छे ! छे ! ! ताईमहाराज, वीर पुरुषाला असं राहणं कधींहि आवडणार नाहीं. "

" असं ! असं ! ! " सुहासिनी हांसत हांसत म्हणाली. " एकूण तूं वीर पुरुष आहेस तर ! "

" ताईमहाराज, तुम्ही देखील माझी थट्टा करतां ना ? " विनोदाला वाईट वाटलें !

" तसं नव्हे रे ! पण हें [illegible] विनोद, आतां लवकरच युद्धप्रसंग येणार

आहे. त्यावेळीं पिताजींना सांगून मी तुला एका मोठ्या सैन्याचा सेना-नायक करीन–"

" काय म्हणतां ताईमहाराज ! खरंच ना पण हें ?—वाः मग तर काय मौजच आहे ! " आनंदानें टाळी वाजवून विनोद म्हणाला.

" टाळी वाजली तेव्हा अखेरीस काम फत्तेच होणार ! " दरवाजांतून आवाज झाला !

सुहासिनीनें चटकन् मागें वळून पाहिलें, तों प्रवासाच्या पूर्ण तयारीनिशीं आलेली यशोधरा तिच्या दृष्टीस पडली. तिच्या मागून कोकिळा आंत येत होती. यशोधरा जवळ येईपर्यंत सुहासिनी तिच्याकडे निस्तब्धपणें पाहत राहिली. त्यावेळीं तिच्या मनांत विलक्षण मनोविकारांच्या भावना होत होत्या. आपल्या कामाकरितां यशोधरा निघाली, तेव्हा आतां सुखाची आशा करण्यास पुष्कळ जागा आहे, असें तिला वाटलें. तिला आतां स्तब्ध राहवेना. यशोधरा जवळ येतांच तिनें हर्षोत्फुल्ल चित्तानें तिच्या गळयाला मिठी मारिली.

" ताईमहाराज ! मला आता परवानगी द्या. माझी पूर्ण तयारी झाली. " सुहासिनीच्या बाहुपाशांतून आपली सुटका करीत यशोधरा म्हणाली.

" ताई," मध्येंच हर्षयुक्त स्वरानें विनोद म्हणाला, " ताईमहाराजांनीं तुला जशी एक कामगिरी सांगितली आहे, त्याचप्रमाणें राणाजींना सांगून त्या मलाहि एक कामगिरी सांगणार आहेत."

" खरं कीं काय ? मग तर आनंद आहे ! पिताजींच्या मागें आपले दोघांचे देह स्वामिकार्याला लागणार तेव्हां भाग्यच म्हणायचं " असें म्हणून कोकिळेला नेत्रांनीं खूण करीत यशोधरा पुढें म्हणाली, " पण भाऊराया ! तुझ्या वाट्याला कोठली कामगिरी आली ती कोकिळेला नाहीं का सांगायची ?

" वाः ! सांगायची तर ! " असें म्हणून विनोद उठला. यशोधरेला अद्यापि एक दोन महत्त्वाच्या गोष्टी राजकन्येला विचारावयाच्या होत्या, हें कोकिळेला माहित होतें. तेव्हां यशोधरेनें खूण करतांच कोकिळाहि उठली आणि हळुहळू तिनें विनोदाला दिवाणखान्याच्या बाहेर आणलें. विनोद तिच्यामागून चालत होता. तिनें एकदोनदां वांकडी मान करून कुतुहलपूर्ण दृष्टीनें आपल्या मागून येणाऱ्या विनोदाकडे अवलोकन केलें. दिवाणखान्यां-तून बाहेरच्या स्फटिक सज्जावर आल्यानंतर कोकिळा उभी राहिली; तेव्हां आकाशांतील तारापति चंद्र निस्तब्धपणें हांसत हांसत तिच्या सुधांशु–वदनावर

सुधाराशीचा वर्षाव करूं लागला. विनोद तिच्या जवळ उभा राहिला, आणि तिच्या रम्य मुखमंडलाकडे अगदीं सूक्ष्मपणें निरखून पाहूं लागला. कोकिळे-बरोबर असे एकान्त प्रसंग त्याला क्वचित् मिळत असत. कारण बहुतेक नेहमी ती यशोधरा किंवा राजकन्या यांच्या सान्निध्यांत असे. आजचा प्रसंग अगदीं अकल्पित रीतीनें जुळून आला होता. कोकिळेच्या मुखमंडळाचे सूक्ष्मपणें निरिक्षण करीत असतां रजनीनाथाच्या रजतसदृश्य किरणसमूहांत त्या रमणीचा मुखचंद्र तळपत असतांना पाहून आमच्या तरुण विनोदाच्या हृदयाला अगदीं गुप्त अशा भार्गी कांहीं अनिर्वनीय वृत्ति उचंबळूं लागल्या. एखाद्या लोहचुंबकाप्रमाणें त्याचें मन त्या अमात्यकुमारीकडे आकर्षित होऊं लागलें, परंतु तें निंद्य लालसेनें मात्र नव्हे !

"ताईमहाराज कुठली कामगिरी देणार आहेत ?" निस्तब्धतेचा भंग करून अधोवदनानें कोकिळा हळूच म्हणाली.

"आतां लवकरच युद्धप्रसंग येणार आहे. त्यावेळीं राणाजींना सांगून ताईमहाराज मला सेनानायकत्व देणार आहेत !" मोठ्या आतुरतेनें विनोद म्हणाला.

हास्यमुद्रेने पूर्ण अंगविक्षेप करून विनोदानें मोठ्या फुशारकीनें उच्चारलेलें वाक्य ऐकतांच कोकिळा क्षणभर त्याच्या मुखाकडे पहात राहिली. विनोदाला सेनेचें नायकत्व देण्याचे ताईमहाराजांनीं अभिवचन दिलें म्हणजे केवळ त्याची थट्टा केली आहे हें ती समजून चुकली. तिला वाईट वाटलें. ताईमहाराजांनीं देखील विनोदाची थट्टा करावी हें पाहून तिला चमत्कारिक वाटलें. ती कांहींच बोलत नाहीं हें पाहून विनोदाला आश्चर्य वाटलें. आपण ही आनंदाची बातमी सागतांच कोकिळेला आनंद होईल असें त्याला वाटलें होतें. परंतु ती गप्प राहिलेली पाहून तो म्हणाला, "कोकिळे ! तूं बोलत कां नाहींस ? मला ताईमहाराजांनीं कामगिरी देण्याचें दिलेलें अभिवचन खोटें आहे असें का तुला वाटतें ?"

"नाहीं. ताईमहाराजांच्या वचनाविषयीं शंका घेणें हें पाप आहे !"

"मग तूं अशी गप्प कां राहिलीस ?"

"गप्प नाहीं ! पण माझीहि अशी इच्छा आहे कीं, ताईमहाराजांनीं योजल्याप्रमाणें खरोखरीच तुम्हास सेनानायकत्व मिळावें आणि तुमच्या हातून एखादी मोठीशी कामगिरी व्हावी."

" अशी आहे तुझी इच्छा ? "

" होय. "

" मग तर आजपासून शूरत्वाचें काम करणें हेंच मी आपलें ध्येय बनवितों. " हें वाक्य निश्चयी स्वरानें विनोद म्हणाला, तें ऐकून कोकिळेला त्याच्या भाषणाचें कौतुक वाटलें. विनोदाच्या हातून अशींच कांहीं तरी वीरास साजेशीं कामें व्हावीं, अशी तिची फार इच्छा होती. क्षणभरानें विनोदानें तिचा मृदु हात धरला आणि तिच्या सुंदर मुखाकडे भेदक दृष्टीनें पहात विचारिलें, " अशी कामगिरी केल्यास कोकिळे, तुला आनंद होईल ना ? "

इतक्यांत मोठ्या गडबडीनें वृद्ध मेधावी चारण तेथें आला. त्याच्या दृष्टीस तो सर्व प्रकार पडला; तेव्हां लज्जित होऊन कोकिळेनें विनोदाच्या हातांतील आपला कोमल हात सोडवून घेतला. तरी तो म्हणाला, " विनोदा, सर्व नगरीमध्यें सकाळपासून युद्ध तयारीची कोण भयंकर धुमश्चक्री उठून राहिली आहे. आणि तूं येथें एकान्तांत ह्या अल्लड पोरीबरोबर प्रणयलीला करीत स्वस्थ बसला आहेस काय ? थांब—आतां जाऊन राणाजीच्या कानावर ही सर्व गोष्ट घालतों. त्याशिवाय ह्या शेफारलेल्या कोकिळेची खोड मोडणार नाहीं—पण ती राजकुमारी कुठें आहे ? तिच्याच नकारामुळें हें युद्धाचें बंड उद्भवलें आहे."

बाहेरच्या सज्जावर वृद्ध चारणाची चाललेली गडबड ऐकून सुहासिनी आणि यशोधरा बाहेर आल्या.

" ताईमहाराज, महाराण्याच्या मागणीला होय म्हणा आणि हा युद्ध प्रसंग टाळा. " सुहासिनीकडे आपला मोर्चा फिरवून मेधावी एकदम म्हणाला, " अहो, तुम्हां तरुणींना ह्या युद्धाची थोडी तरी कल्पना आहे काय ? तुम्ही आपल्या सुखाकरितां ' होय ' किंवा ' नाहीं ' म्हणतां. परंतु शेवटीं त्याचा परिणाम फार फार भयंकर होतो. युद्ध होतें, रक्ताच्या नद्या वाहतात, प्रेतांचे ढीग पडतात, नगरी उध्वस्त होते आणि शांततेनें चाललेल्या सर्व राज्यावर नांगर फिरतो. म्हणून म्हणतों—ताईमहाराज ! त्या धुंडपाळ महाराण्याच्या मागणीला होय म्हणा ! राणाजीकडे गेलों—त्यांस किती किती तरी समजाविलें, परंतु छे ! तुमच्या सुखासाठीं त्यांचा दृढनिश्चय झालेला आहे. "

" युद्धप्रसंग आला म्हणून त्यांत भिण्यासारखें काय आहे ? " विनोद मध्येंच म्हणाला, " अरे शूराला आपलें शौर्यत्व प्रगट करण्याची ती एक पर्वणीच असते ! "

" विनोदा, तुला अल्लड—हूड पोराला ह्या युद्धाच्या गोष्टींत काय कळलं आहे ? "

तुच्छतापूर्वक चारणानें उच्चारलेलें वाक्य ऐकतांच विनोदाचा पिढीजाद स्वाभाविक जहाल स्वभाव एकदम प्रकट झाला. अभिमान आणि क्रोध या विकारांनीं त्याच्या हृदयांत खळबळ उडाली ! तो कठोर पण कंपित स्वरानें म्हणाला, " चारणा, ह्या रणधीर क्षत्रिय कुमाराला तूं हूड पोर समजतोस काय ? अरे युद्धाची गोष्ट ऐकतांच युद्ध उन्मत्त होऊन तुझ्या सर्व शरीरांतील हें वृद्धपणानें गोठलेलें सर्व रक्त सळसळावयास लागून शत्रुसंहाराकरितां तुझे बाहु, स्फुरण पावूं लागले पाहिजे होते. तें तर राहिलें एका बाजूला ! उलट स्वाभिमान विसरून ताईमहाराजांजवळ रुद्ध कंठानें शंख करावयास आला आहेस काय ? " विनोदाचें भाषण ऐकून सर्वजण आश्चर्यचकित होऊन त्याच्या मुखाकडे टकमका पाहूं लागले. त्यावेळीं त्या सुंदर वीरमूर्तीच्या मुखावर वीरत्वाची पूर्ण छटा दृग्गोचर होत होती. आपल्या बंधूच्या मुखांतील ते शब्द ऐकून यशोधरेचें हृदय सद्गदित झालें; कोकिळेला आपल्या प्रियकराच्या भाषणाचा अभिमान वाटला; राजकन्येला कौतुक वाटलें आणि वृद्ध चारण खजील झाला !

क्षणभरानें राजकन्या म्हणाली, " चारणा, युद्धाची तुला इतकी भीति वाटते काय ? "

" ताईमहाराज, भी—भी—ति नाहीं—पण—"

" पण आणि परंतु नको ! तुला भीति वाटत असेल तर माझें एक काम कर. हें पहा—एका अत्यंत महत्त्वाच्या कामगिरीवर मी यशोधरेची दूर रवानगी करीत आहें, तर तूं तिच्याबरोबर जा. पण लक्षात ठेव कीं, नगरांतून बाहेर पडेपर्यंत ही गोष्ट कोणाला देखील कळतां उपयोगी नाहीं. काय समजलास ? "

" समजलों. पण मी हिच्याबरोबर गेल्यास यु—युद्धाची—भीति—"

" अगदीं नाहीं. " सुहासिनीनें त्याचें वाक्य पुरें केलें. " मग हो तर तयार, चल लवकर ! "

" म्हणजे आतां ? " आश्चर्यानें मेघावीनें विचारलें.

" होय आतांच. सूर्योदयापूर्वी तुम्हाला नगराबाहेर बराच मार्ग क्रमण केला पाहिजे. जा—"

वृद्ध चारणाला मुकाट्यानें जावें लागलें. आपण कशाकरितां आलों आणि त्याचा परिणाम काय झाला हा सर्व प्रकार त्याला स्वप्नवत् वाटूं लागला.

" विनोदा, अश्वशाळेंत जाऊन दोन उत्तम अश्व सज्ज करून मुकाट्यानें उद्यानद्वाराजवळ आण. जा इतक्यांत आम्ही येतों. "

वृद्धचारणाच्या मागून विनोदहि नेमून दिलेल्या कामगिरीवर निघून गेला. तेव्हां सुहासिनी पुढें म्हणाली, " सखे यशोधरे ! चारणाला मी तुझ्याबरोबर पाठविण्याचें योजलें, परंतु तें तुला पसंत पडलें नाहीं असें तुझ्या चर्येवरून दिसलें. पण तूं एकटीनें इतक्या लांबचा प्रवास, विजयपुरापर्यंत—चाळीस-पन्नास कोसांचा प्रवास करणें धोक्याचें आहे. चारण भित्रा आहे तरी तो पुरुष आहे. ऐन प्रसंगीं तो तुझ्या उपयोगी पडण्यासारखा आहे. "

" ताई महाराज, हें कार्य मी एकटीनेंच करावें अशी जरी माझी फार इच्छा आहे तरी चारणासारखी व्यक्ति माझ्याबरोबर असली म्हणून त्यांत कांहीं बिघडत नाहीं. पण मला भीति वाटते ती इतकीच कीं, त्याचें तोंड त्याच्या स्वाधीन नाहीं. आपल्या बडबड्या स्वभावामुळें तो कोठल्यावेळीं काय संकट ओढवून घेईल तें मात्र सांगतां येत नाहीं. पण तें जाऊं द्या. मला तुमचें कुंकुमतिलक कंकण देता ना ? चला—आतां विलंब नका लावूं—"

## अशुभ चिन्ह ६

दरबार भरून आज सात दिवस होऊन गेले होते. मयूरनगरीमध्यें पूर्वीप्रमाणेंच शांतता नांदतांना दिसत होतें. परंतु सूक्ष्मावलोकन करणारास गेल्या प्रकरणांत वृद्ध चारणानें सांगितल्याप्रमाणें युद्धतयारीची एकच धुमश्चक्री उडाली आहे असें दिसून आलें असतें. आज बरींच वर्षें मयुर नगरींतील रजपूतवीरांना युद्ध करण्याचा प्रसंग न आल्यामुळें प्रस्तुत युद्धप्रसंग म्हणजे त्यांना एक प्रकारची पर्वणीच वाटत होती. अलीकडे रोज सकाळसंध्याकाळ राजप्रसादाच्या समोर भव्य पटांगणांत सर्व सैन्याची हजिरी आणि कवाईत स्वतः राणाजी आपल्या देखरेखीखालीं घेत असत. त्या वेळीं राजकन्या आपल्या सखीसह प्रासादाच्या वरील सज्जावर बसून ती सर्व मौज पाहत असे.

विनोदाला सुंदर अश्वावर आरूढ होऊन राणाजीच्या बरोबर सेनेसभोंवती फेरे घेतांना पाहून कोकिळेला मुग्ध आनंद होत असे. यशोधरा आपल्या स्वामिनीच्या कार्याकरितां गेल्यापासून कोकिळेला विनोदाच्या सान्निध्यांत घालविण्यास बराच वेळ मिळत असे. तिच्या सहवासानें आणि उत्तेजित शब्दामुळें विनोदाच्या पूर्व स्वभावांत थोडा फरक दिसूं लागला होता. स्वतःच्या उच्च कुलशीलाची कोकिळा त्याला बरोबर गोड व प्रेमळ शब्दांनीं आठवण करून देऊं लागल्यामुळें त्याला स्वतःच्या कर्तव्याची, स्थितीची आणि आचाराविचारांची हळुहळू ओळख पटूं लागली होती. दिवसेंदिवस त्याचें प्रेम वृद्धिंगत होऊं लागलें.

कोकिळा आणि विनोद यांच्या प्रेमलीला एकदोनदां सुहासिनीच्या अवलोकनांत आल्या; परंतु तिनें त्यांकडे विशेष लक्ष पुरविलें नाहीं. ती आपल्याच विचारांत अलीकडे निमग्न असे. यशोधरेनें नेलेल्या कंकणाचा काय परिणाम होतो, याकडे तिचें सर्व लक्ष वेधलें होतें. शिवाय गेल्या दोन दिवसांपासून तिचें मन अगदीं उदास झालें होतें. कारण गेल्या दोन्हीं रात्रीं तिला वाईट स्वप्नें पडून दिवसा देखील कांहीं अपशकून झाले होते. प्रथम तिनें पहिल्या रात्रीं पडलेल्या स्वप्नाचा विशेष विचार केला नाहीं. परंतु पुन्हा दुसऱ्या दिवशीं रात्रीं वाईट स्वप्न पडून दिवसा अपशकुन झाले, तेव्हां मात्र तिचें मन अस्वस्थ झालें. ती आज संध्याकाळीं कोकिळेसह सज्जावर बसून सैन्याच्या कवाईतीची मौज पाहात बसली होती, तरी तिचें लक्ष मात्र कवाईतीकडे नव्हतें.

" ताईमहाराज, आज दोन दिवस आपण अशा चिंताक्रांत का ? "

मोठ्या उत्कंठेनें कोकिळेनें विचारलें. ती आपल्या स्वामिनीच्या चिंताक्रांत मुखाकडे उत्तराची अपेक्षा करीत उत्कंठेनें पाहात राहिली. परंतु सुहासिनीचें तिच्याकडे लक्ष नव्हतें.

" ताईमहाराज, आज आपण अशा सचिंत कां ? "

कोकिलेनें मनाचा हिय्या करून सुहासिनीला विचारलें. परंतु सुहासिनीनें बराच वेळपर्यंत उत्तर दिलें नाहीं. ती शून्य दृष्टीनें आकाशाकडे पाहात होती. इतक्यांत त्या निरभ्रनील आकाशांत नगरीच्या पश्चिम तटावरून एक बाण सूं सूं करीत येत असतांना तिच्या दृष्टीस पडला. त्याबरोबर विस्मयचकित होऊन सुहासिनी त्याकडे बोट दाखवून एकदम म्हणाली, " कोकिळे, तें पहा—तें पहा ! "

तितक्या अवधींत तो बाण राणाजी आणि सेना यांच्या मध्यभागीं येऊन पडला. बाणाचा पुढचा टोंकदार भाला जमिनींत बराच खोल रुतला होता; आणि त्याच्या मागच्या शेंड्याला एक पत्र बांधलेलें होतें. अशा अकल्पित रीतीनें तो बाण आलेला पाहून सर्व सैन्यात एकच गडबड उडाली. राणाजी देखील क्षणभर स्तंभित होऊन त्या जमिनींत रुतलेल्या बाणाकडे पाहत राहिला. हा काय प्रकार आहे हें त्याच्या लक्षांत येईना !

" विनोदा तो बाण इकडे आण. "

राणाजीनें गंभीर स्वरानें केलेली आज्ञा ऐकतांच विनोदानें चट्कन् अश्वावरून उडी टाकली; आणि जमिनींत रुतलेला तो बाण वर खेंचला. त्यावेळीं त्या बाणाच्या शेवटीं बांधलेलें पत्र सर्व सैन्याच्या दृष्टीस पडलें, तेव्हां त्या पत्रांत काय मजकूर आहे हें जाणण्याविषयीं प्रत्येक वीर अगदीं उत्सुक झाला. राणाजीनें तो बाण हातांत घेऊन त्याला बांधलेले पत्र सोडलें आणि बाण दूर फेंकून दिला. राणाजी तें पत्र वाचत असतांना सर्व सैन्यांत निस्तब्धता पसरली होती. क्षणभरानें त्या निस्तब्धतेचा राणाजीच्या क्रोधकंपित स्वरानें भंग केला.

" असं काय ? ठीक आहे ! माझी तयारी आहे ! ! " हे शब्द उच्चारतांना राणाजीचे ओंठ क्रोधानें स्फुरण पावत होते आणि सर्वांग थरथर कांपत होते. तो पुढें म्हणाला, " मत्प्रिय सैनिकवीर हो ! मी भविष्य केल्याप्रमाणें आतां वेळ आली आहे. राजकुमारीला आपल्या बाहुबलानें नाटकशाळेंत खेंचून नेण्याकरितां महाराणा अफाट सैन्यासह आपल्या नगरीच्या पश्चिम द्वाराजवळ आला आहे. आणि हें सुचविण्याकरितां त्यानें हें पत्र पुढें पाठविलें आहे. तुम्ही वीरकुलोत्पन्न आणि वीरशिरोमणि आहांत. तुमच्या तरवारबहाद्दर शूराग्रेसर पूर्वजांनीं आपल्या पराक्रमानें दिगंत कीर्ति फैलाविली आहे. तेव्हां त्यांची कीर्ति लक्षांत आणून आपल्या राजकुमारीचें धर्मरक्षण करण्याकरितां समरांगणांत तरवार गाजवा आणि अभिमानाला पेटलेल्या शत्रूचा संहार करा, इतकेंच आतां मी तुम्हाला सांगत आहें. चला—प्रथम चंडीमातेच्या दर्शनाला चला. आणि तिचा आशीर्वाद ग्रहण करून समरांगणाचा मार्ग धरा—"

क्षणांत सर्व स्थिति बदलली ! राणाजी सैन्यासह आशीर्वाद ग्रहण करण्याकरितां कुलस्वामिनीच्या देवालयांत येत आहेत, अशी पुरोहिताला

वर्दी मिळाली. त्याबरोबर देवीच्या पूजेची तयारी सुरू झाली. थोड्या वेळानें अमात्यादि सैनिक वर्गासह राणाजी मंदिरांत आला. तेव्हां मंदिरांतील घंटा, झांज, शंख इत्यादि वाद्यें वाजूं लागलीं, आणि बाहेरच्या बाजूला दुंदुभि, नगारे वगैरे रणवाद्यांचा दणदणाट सुरू झाला. कांहीं वेळानें एकाग्रचित्तानें राणाजीनें कुलस्वामिनीच्या स्तवनाला सुरवात केली. आणि पुरोहितानें देवीपुढें असलेल्या भव्य होमाग्निकुंडांत चंदनादि सुगंध परिमल द्रव्यांची आहुति देण्यास सुरवात केली. स्तवन होतांच राणाजीनें स्वतः आरक्त सुगंधी द्रव्याची आणि आरक्त पुष्पाची होमाग्नींत आहुति दिली. त्याबरोबर परमपवित्र अग्नीच्या ज्वाला आकाशांत भडकूं लागल्या. आणि त्या अग्निज्वालेप्रमाणेंच वीरश्रीसंपन्न पुरुषांच्या अंगांत शौर्याग्नि प्रज्वलित होऊन त्यांच्या आंगरख्याचे बंद तटातट तुटूं लागले. सर्व सैन्यानें चंडीमातेचा जयजयकार केला. त्याचा शब्दनाद इतका झाला कीं, त्या घनघोर ध्वनीमुळें दाही दिशा गजबजून राहिल्या.

नंतर राणाजीनें आपल्या कुलस्वामिनीपुढें अनन्यभावें साष्टांग नमस्कार घातला. तेव्हां पुरोहितानें राणाजीची भव्य तरवार घेऊन ती देवीपुढें ठेविली आणि तिच्या मस्तकावरील शेंदूर काढून त्या तरवारीला लावला. राणाजीनें पुनः एक वेळ नमन करून प्रसादस्वरूप ती तरवार उचलण्याकरितां आपले दोन्ही हात पुढें केले, तोंच एक अत्यंत भयप्रद प्रकार घडला. एकाएकीं देवीचें बहुमूल्य दीप्तिमान् रत्नजडित शिरोभूषण खालीं आलें आणि गडबडत गडबडत परम जाज्वल्य अग्निकुंडांत पडलें ! ! !

हा अत्यंत अशुभ आणि हृदयविदारण करून टाकणारा निरुत्साही प्रकार पाहून भीतीनें व आश्चर्यानें सर्व सैन्यांतील लोक चकित झाले. ते एकमेकाकडे टकमका पाहूं लागले. कित्येकांच्या अंगावर रोमांच थरारले, कित्येकांच्या तोंडून भीतीचे स्पष्ट उद्गार बाहेर पडले. अशा रीतीनें मंदिरांत सर्वत्र हाहाःकार उडाला !

राणाजीची चर्या खर्रकन् उतरली. कलाहीन निस्तेज झालेल्या चंद्राप्रमाणें त्याचें गंभीर मुख निष्प्रतिम दिसूं लागलें. क्षणभरानें तो शुष्क कंठानें अडखळत म्हणाला, "वीरसैनिकहो ! माझ्या अदृष्टांत काय लिहिलें आहे तें सांगणें कठीण आहे. भविष्यकाळीं होणाऱ्या गोष्टी कशाही असल्या तरी आज आपणापुढें एक पवित्र कर्तव्य आहे. आतां प्रसाद देतांना चंडीमातेनें

अशुभ चिन्ह दर्शविलें, यावरून ती क्षुब्ध झाली आहे असें स्पष्ट दिसतें. करितां आतां हातांत घेतलेल्या कार्याची फलद्रूपता करण्यासाठीं तुम्हीं घनघोर संग्राम करा, शत्रूंचा धुव्वा उडवा आणि शत्रूच्या आरक्त रक्तानें भूदेवी शांत करा. कुलस्वामिनीनें कौल देतांना जें चिन्ह दाखविलें, त्यावरून तिला विदेशियांच्या आरक्त रक्ताची तृषा लागली आहे असें स्पष्ट दिसतें. म्हणून शत्रूनरमुंडांची भव्य माला तिच्या कंठांत घालून शत्रूरक्ताचा तिला अभिषेक करा. चला—उचला आपलीं शस्त्रें आणि परमप्रिय, परमवंद्य आणि परमपूजनीय चंडीमातेला आपल्या मदतीकरितां आव्हान करून तिच्या पवित्र नांवाचा पुनः जयघोष करा ! ”

“ चंडीमातेचा जयजयकार असो ! ”

जयजयकारानें पुनः दाही दिशा दणाणल्या. त्या विजयकारांचा घनघोर ध्वनि नगरीच्या आसमंतांत असलेल्या मोठमोठ्या विशाल पर्वतांतील गिरिकंदरांत प्रतिध्वनित होऊं लागला. तोंच गंभीर वाद्यें वाजूं लागलीं. त्या गजरानें मंदिर परिकंपित होऊन आकाशपाताल एक करून सोडलें !

## युद्धाची रात्र ७

ती रात्र फारच भयंकर गेली. राणाजीनें आपल्या कुलस्वामिनीचें दर्शन घेऊन शूर सैनिक वीरांसह समरांगणाचा रस्ता धरला हें गेल्या प्रकरणांत सांगितलें आहे. नगराच्या पश्चिमद्वारानें बाहेर येतांच शत्रूचा तो प्रचंड सेनासमुद्र राणाजीच्या दृष्टीस पडला. दोन्ही सैन्यें जवळजवळ येतांच युद्धाला तोंड मिळालें. हळुहळू रक्ताची नदी वाहूं लागली. दिनमणी अस्ताला जाईपर्यंत राणाजीच्या मुठभर शूरवीरांनीं शत्रूला मागें हटविण्याचा शक्य तितका प्रयत्न केला. परंतु शत्रूच्या असह्य मारामुळें त्यांचा टिकाव लागेना. सैन्याच्या अघाडीस राहून राणाजी आपल्या वीरांना सारखें उत्तेजन देत होता परंतु त्याचा कांहींच उपयोग होईना. मोठ्या धैर्यानें जो योद्धा तरवार घेऊन पुढें होई, तो स्वरक्तानें सचैल स्नान करून भूमातेला स्वतःचें शिरकमल अर्पण करी. होतां होतां सर्वत्र काळोख पडला. अद्यापि युद्धाचा शेवट झाला

नव्हता. तरी राणाजीची सेना मागें हटूं लागली. एकदां शेवटच्या जोराचा हल्ला करून युद्धाचा शेवट लावावा अशी शत्रूची इच्छा दिसत होती. परंतु क्षणोक्षणीं अंधकाराचें भीषण स्वरूप घेणाऱ्या रात्रीपुढें त्याचा इलाज चालेना. शेवटीं लढाई बंद झाली. आणि दोन्हीं बाजूचीं सैन्यें आपापल्या विश्रांति स्थानाकडे परतलीं.

मध्यरात्र उलटून गेली. कृष्णवस्त्र परिधान केलेल्या रात्रीनें जिकडे तिकडे आपल्या वस्त्राची छाया पाडली होती. सर्व सायंकाळ युद्धासारख्या भयंकर संकटांत अतिक्रान्त झाल्यानें राणाजीच्या छावणींत नाउमेद झालेले वीर विश्रांति घेत होते. थोडा वेळ झालेल्या त्या युद्धांत राणाजीची अर्धी अधिक सेना रणमैदानांत अक्षय्यींची विश्रांति घेत होती. चालू युद्धाचा शेवट काय होणार हें राणाजीच्या लक्षांत येऊन चुकलेंच होतें. त्या वेळीं राणाजीच्या डेऱ्यांत एक दिवा जळत होता. जिकडे तिकडे चिलखतें, तरवारी, भाला, बरच्या, धनुष्य इत्यादि युद्धोपयोगी हत्यारें लटकत होतीं. श्रमामुळें अत्यंत त्रासलेले पहारेकरी डेऱ्याच्या बाहेर नग्न तरवारी घेऊन पहारा करीत होते. सर्वत्र शांतता होती. परंतु राणाजीच्या डोक्यांत विचारांचा सारखा गडगडाट चालू होता. तो आपल्या शय्येवर सचिंत पडला होता. रात्रीं युद्ध थांबतांच सर्व सैन्यानें नगरांत जाण्याचा राणाजीला फार आग्रह केला परंतु ' विजयी झाल्याशिवाय नगरांत प्रवेश करावयाचा नाहीं, ' असा निश्चय करून नगरा बाहेर छावणी करण्याचा त्यानें आपल्या कनक अमात्याला हुकूम दिला. त्यामुळें नाइलाज होऊन नगराबाहेर सैन्याची सर्व व्यवस्था करून नगरींतील व्यवस्था पाहण्याकरितां अमात्याला मध्यान्ह रात्रीं नगरांत जावें लागलें. इतका वेळ अमात्य जवळ असल्यामुळें राणाजीला भावी स्थितीचें चित्र इतकें भेसूर दिसलें नाहीं. परंतु आतां तो डेऱ्यांत एकटा राहतांच त्याच्या डोक्यांत विचाराचें वादळ सुटलें. युद्धाचा भलताच शेवट झाला तर आपल्या सुहासिनीची स्थिति काय होईल हा एकच विचार त्याला हताश करून सोडण्यास पुरेसा होता. पुष्कळ वेळ विचार करून राणाजीनें एका नोकराला हांक मारिली. राणाजी फार विचार करीत होता. भावी स्थितीचें भयंकर चित्र त्याच्यापुढें मूर्तिमंत उभें होतें तरी न डगमगतां प्रसंग पडल्यास पुढें काय करावयाचें हें त्यानें प्रथम ठरवून टाकिलें. थोड्या वेळानें नोकर आंत येतांच विनोदाला घेऊन येण्याची राणाजीनें त्याला आज्ञा केली.

त्यावेळीं राणाजीच्या मनाची जी स्थिति झाली होती, तीच स्थिति विनोदाची होती. तो ज्या डेऱ्यांत त्यावेळीं सचिंत विचार करीत बसला होता त्याच डेऱ्यांत कित्येक घायाळ झालेले शिपाई विव्हळत पडले होते. राणाजीचा निरोप कळतांच तो झटकन् उठला. इतक्या रात्रीं आपणास बोलावणें आलें आहे तेव्हां कोठल्या तरी शौर्याच्या कामगिरीवर आपली नेमणूक होणार असें वाटून तो मोठ्या लगबगीनें निघाला.

" विनोदा प्रस्तुतच्या युद्धाविषयीं तुला काय वाटतं ? " विनोद डेऱ्यांत येतांच त्याचा प्रणाम घेत राणाजीनें पहिला प्रश्न केला.

क्षणभर विनोद राणाजीच्या मुखाकडे पहात राहिला. हा राजकारणाविषयीं केलेला प्रश्न, म्हणजे राजकारणांत महाराजांनीं आपलें मत विचारलें हें पाहून त्याला मुठभर मांस आल्यासारखें वाटलें. आणि त्याचा परिणामही त्याच्या मनावर निराळाच झाला. त्यानें एकवेळ तीव्र दृष्टीनें राणाजीकडे पाहिलें आणि किंचित् मान वाकवून तो गंभीर स्वरानें म्हणाला, " महाराजांनीं मला मत विचारलें परंतु मजसारख्या अननुभवी मुलाला ह्या बिकट प्रश्नात काय कळणार आहे ? "

" छे ! विनोदा असें म्हणूं नकोस ! तूं अमात्य वीरमणीचा मुलगा आहेस. तेव्हां तें बुद्धितेज केव्हांहि लपणार नाहीं. तुझ्या वडिलाचा युक्तिवाद इतका पोक्त असे कीं, त्यांचे प्रत्येक विचार मला पूर्णपणें पटत असत, " क्षणभर थांबून राणाजीनें विचारलें, " तेव्हा आतां सांग पाहूं, तुझें ह्या युद्धाविषयीं काय मत आहे तें ? "

" माझें मत फारच वाईट आहे प–ण — "

" आतां थांबूं नकोस. मला वाईट वाटेल म्हणून भीति बाळगण्याचें कारण नाहीं. मी आतां माझें मन वज्रापेक्षांहि कठोर केलें आहे. मला कांहींच वाईट वाटणार नाहीं. सांग—आपलें मत विचारलें असतां स्पष्ट मत देणें हा एक मोठा गुण आहे—बोल—"

" ह्या युद्धाचा शेवट फार भयंकर होईल अशी माझी मनोदेवता मला सांगते. " किंचित्काळ विचार करून विनोद स्पष्टपणें बोलूं लागला, " सध्यां आपणास काळ अनुकूल नाहीं, असें काल माताजीच्या मंदिरांत असतांना मला वाटलें. परंतु महाराज पुढें, कितीहि जरी भयंकर प्रकार होणार असला

तरी मला त्याची बिलकूल पर्वा नाहीं. काल आपण हीं रणशस्त्रें आणि रणवस्त्रें मला दिलीं त्याचा अभिमान ह्या देहांत प्राण असेपर्यंत—"

" त्याविषयीं तर माझी पूर्ण खात्री आहेच ! पण असें समज कीं, उद्यां माझ्या दुर्दैवानें कांहीं कमीजास्त प्रकार झाला तर पुढें काय करावें ? सुहासिनीच्या प्राप्तीकरितां महाराण्यानीं केलेली प्रतिज्ञा तुला माहिती आहे ना ? "

" हो—य. तो मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे खरा ! परंतु महाराजांनीं ह्या गोष्टीचा कांहींतरी निश्चित विचार केला असेल अशी माझी खात्री आहे. मला आज्ञा करा म्हणजे मी कामगिरीवर निघालोंच ? "

" तेवढ्याचकरिता मी तुला आतां—अशा मध्यरात्रीला बोलावून आणलें आहे. माझी आतां अशी शेवटची इच्छा आहे कीं, ह्या युद्धांत माझा बरावाईट शेवट झाला तर सुहासिनी मात्र महाराण्याच्या हातीं लागतां उपयोगी नाहीं. "

" पण दुर्दैवानें तसाच प्र—सं—ग—"

" तसा प्रसंग आला तर तिनें स्वतःचा आत्मयज्ञ करावा आणि मी ज्या गोष्टीच्या प्रतिकाराकरितां ह्या संकटाला तोंड दिलें ती गोष्ट मुळांतून नष्ट करावी. "

बराच वेळ विनोदाला विचारांत मग्न असलेला पाहून राणाजी पुढें म्हणाला " विनोदा, आतां विचार करण्याची वेळ नाहीं. मी ह्या सर्व गोष्टीचा पूर्वीच विचार करून ठेविला आहे. तुला ह्या युद्धाविषयीं जें वाटतें तेंच मलाही वाटतें. तेव्हां आतां त्याचा खल नको. फक्त तुला मी येथें कां बोलाविलें तें सांगतों आणि त्याप्रमाणें तूं वागावेंस अशी माझी शेवटची इच्छा आहे. "

" महाराजांनीं इतकं हताश होण्याचं कारण नाहीं ! हा माझा देह महाराजांच्या एका शब्दापेक्षांहि जास्त मौल्यवान् आहे असें मला वाटत नाहीं. आपली आज्ञा मला केव्हांहि वंद्यच आहे. "

" ऐक तर—" राणाजी शांत स्वरानें म्हणाला, " उद्यां सूर्योदय होतांच पुनः युद्धाला सुरवात होईल. महाराण्याच्या मानानें आपलें सैन्यबळ अगदींच थोडें आहे तरी देखील आपल्या शूरवीरांविषयीं माझी खात्री आहे. यशाकरितां माझा प्रत्येक वीर रणांगणावर मृत्यु पत्करील हें मी जाणून आहें. तरी युद्धाचा विपरित शेवट होईल असें वाटतांच तूं प्रथम रणक्षेत्रांतून मागें फिर आणि नगरींत प्रवेश कर. पण युद्धाकडे सुहासिनीचे डोळे लागले

असतील तर सर्व वृत्तात कथन करून माझी एक शेवटची इच्छा तिला निवेदन कर. आपल्या प्रासाद गच्चीवरून हें रणक्षेत्र स्वच्छ दिसतें. कारण येथून नगरींतील प्रासाद शिखरें आपणास दिसतात. तेव्हां तेथून पहात असतां ह्या युद्धभूमीवरील आपल्या सैन्याचा मयूरध्वज स्थानभ्रष्ट झालेला तुम्हाला दिसला तर तात्काळ तूं सुहासिनीला घेऊन कुलस्वामिनीच्या मंदिरांत जा. तेथें चंडीमातेच्या डाव्या चरणाला जोरानें मागें लोट म्हणजे देवी आपल्या आसनासह मागें सरेल व तुम्हाला भुयारांत जाण्याचा मार्ग देईल. तुम्ही भुयारांत प्रवेश करतांच भुयाराची शेवटची शिला तू किंचित् वर उचल म्हणजे देवीचें आसन पुनः पूर्वजागीं येऊन बसेल. पुढें त्या भुयारांतून तुम्हाला बराच मार्ग क्रमण करावा लागेल. आपल्या नगरीच्या उत्तर सीमेवर म्हणजे येथून तीन कोसांवर जें अरण्य आहे त्या अरण्यांत तुम्ही जाल. तेथून पुढें तुम्हांला ‘ आनंद कुंज ’ लागेल. तेथें विश्रांति घेऊन तुम्ही थेट विजयपुरचा रस्ता धरा. सांप्रत तेथें भीमरथ महाराज आहेत. ते माझे परम स्नेही आहेत. त्यांचा चिरंजीव अमरसिंह याची तसबीर सुहासिनीनें पसंत केली आहे. तेव्हां त्यांना येथील सर्व वृत्त कथन करून ही देखील हकिकत निवेदन कर आणि मी देतों ही माझी मुद्रिका त्यांना देऊन अशी विनंति कर कीं, मी ही माझी कन्या तुमच्या पदरांत घातली आहे, तिचा स्नुषा म्हणून स्वीकार करून आपला पूर्वापार चालत आलेला स्नेहसंबंध कायम ठेवा. ” असें म्हणून राणाजीनें आपल्या हातांतील विवक्षित रीतीनें घडविलेली एक बहुमूल्य आंगठी काढून ती विनोदाच्या स्वाधीन केली.

त्याचवेळीं नगरांतील कुलस्वामिनीच्या मंदिरांत आपल्या खास परिचयाच्या दोन व्यक्ति चंडी देवीची प्रार्थना करीत बसल्या होत्या. त्यापैकीं एक सुहासिनी आणि दुसरी कोकिळा होती. तो देखावा मोठा गंभीर दिसत होता. सुहासिनीचा घनकृष्ण केशकलाप तिच्या पृष्ठभागावर स्वच्छंदानें लोळत होता. तिनें शुभ्र वस्त्र परिधान केलें असून शिशिरानें म्लान झालेल्या पद्मिनीप्रमाणें तिची अंगकांति दिसत होती. राजकुमारीनें होमकुंडाजवळच आसन घातलेलें होतें. तिनें आपले सुंदर नेत्रयुग्म मिटले असून नम्रभावानें करद्वय जोडले होते. ती ध्यानस्थ बसली होती. मात्र मधून मधून हालणाऱ्या तिच्या सुंदर ओंठावरून ती रमणीय राजबाला देवीजवळ कांहीं तरी अभीष्ट याचना करीत असावी असें स्पष्ट दिसत होतें. याचप्रमाणें नगरांत ठिकठिकाणीं

कुलस्त्रिया निरनिराळ्या देवालयांत जमून आपल्या नगरीवर आलेलें संकट टाळण्याकरितां आणि युद्धांत गेलेले आपले घरांतील वीरपुरुष विजयी होऊन सुखरूप परत येण्याविषयीं मनोभावानें ईशप्रार्थना करीत होत्या. आपल्या कुलस्वामिनीचें चिंतन करून व अभिष्ट याचना करून सुहासिनी कोकिळेकडे वळून गांभिर्यानें म्हणाली, " सखे ! माझं तर चित्त अगदीं अस्वस्थ झालं आहे. माझ्या दैवीं काय लिहिलं आहे तें जरी सांगणें आतां शक्य नाहीं तरी कालपासून मला चमत्कारिक आणि विपरित स्वप्नें पडत आहेत. "

" ताईमहाराज, मन अस्वस्थ असलं म्हणजे अशीं चमत्कारिक स्वप्नें पडतात. पण तीं खरीं का असतात ? व्यर्थ त्यांचा विचार करून मनाला क्षीण देण्यांत काय बरें अर्थ आहे ? "

" चंडी मातेचें दर्शन घेऊन प्रसादांत न येतां पिताजी एकदम रणक्षेत्रांत गेले त्यामुळें मला विशेष काळजी वाटूं लागली आहे. " क्षणभरानें सुहासिनी म्हणाली, " मला वाटतं, काल सायंकाळीं पश्चिम तटावरून जो एक बाण आला तोच ह्या युद्धाच्या मुळाशीं असावा. मी तर आतां असा विचार केला आहे कीं, अरुणोदयापर्यंत पिताजीकडून कांहीं वर्तमान कळलें नाहीं तर स्वतः अश्वारूढ होऊन रणमैदानांत जावयाचें—"

" ताईमहाराजांना इतके श्रम घेण्याची मुळींच आवश्यकता नाहीं. " मंदिराच्या प्रवेशद्वारांतून ध्वनि झाला !

सुहासिनीनें चटकन् आपलें म्लान मुख मागें वळविलें, तो कनक अमात्य प्रणाम करित असतांना तिच्या दृष्टीस पडला.

" तुम्हीं काय खबर आणिली ? " सुहासिनीनें उत्कंठेनें पहिला प्रश्न केला.

" युद्धाचा पूर्वार्ध काल झाला. आपलें सैन्यबल कमी असल्यामुळें परिणामाविषयीं महाराजांचें मन साशंकित आहे. तरी आपण किंचितहि चिंता करूं नये म्हणून मला मुद्दाम महाराजांनीं पाठविलें आहे. आतां आपण मंदिरांत जाऊन स्वस्थ विश्रांति घ्यावी. " असें म्हणून अमात्य कोकिळेजवळ गेला. आणि तिला हळूच म्हणाला, " कोकिळे, ताईमहाराजांना घेऊन तूं आतां मंदिरांत परत जा मला येथें कांहीं गुप्त काम आहे. "

" पण पिताजी, युद्धाची खरी हकीकत काय आहे ? वि—विनोद—"

" विनोदाविषयीं तूं बिलकूल चिंता करूं नकोस. आपल्या स्वर्गगत पूज्य वडिलांप्रमाणेंच त्यानें काल शौर्य प्रगट केलें आहे. पण तूं आतां ताईमहा-

राजांना घेऊन जा. मला येथें फार वेळ राहतां येत नाहीं. सूर्योदय होण्यापूर्वी मला रणक्षेत्रावर गेलें पाहिजे. ”

विनोद खुशाल आहे; इतकेंच नव्हे तर त्यानें युद्धांत शौर्य प्रगट केलें हें आपल्या पित्याच्या तोंडून ऐकतांच कोकिळेच्या मुखावर हास्य विलसूं लागलें. त्या आनंदाच्या भरांत ती राजकन्येजवळ जाऊन म्हणाली, ताई-महाराज, चला, तुम्हाला आतां विश्रांतीची फार आवश्यकता आहे. ”

कोकिळेसह सुहासिनी निघून गेल्यावर कनक अमात्य क्षणभर तेथेंच उभा राहिला. नंतर त्यानें मंदिराचीं द्वारें आंतून बंद करून घेतलीं.

---

# नगरीचा त्याग ८

अरुणोदय झाला. दिशा फाकल्या. पूर्वेकडील आकाशात आरक्त दीनमणीचा उदय झाला. मनाला प्रफुल्लता आणणारा प्रभातसमीर मंदमंद वाहूं लागला. प्रकृतीनें गंभीर स्वरूप धारण केलें. कुसुमपुंज विकसित झाले. मधुलोलुप-भ्रमरांचे थवे गुंजारव करूं लागले. लहान मोठे पक्षी भक्षार्थ फिरूं लागले. अशावेळीं प्रसादाच्या गच्चीवर राजकन्या हासिनी विचार करीत उभी होती. तिची दृष्टि रणक्षेत्राकडे स्थीर झाली होती. क्षणांत तिचें मुखकमल प्रफुल्लितें होई; क्षणांत ती अगदीं उदासीन झालेली दिसे, क्षणांत तिच्या मुखमंडलावर वीरश्रीचें तेज चमकत आहे असा भास होई; तर क्षणांत ती दीर्घ निश्वास सोडी. अशी तिची वृत्ति क्षणोक्षणीं पालटत होती. आणि त्याचें कारण रणमैदानावर दिसणारा युद्धाचा देखावा होय. इतक्यात त्या समरांगणातून एक स्वार भरधांव घोडा फेंकीत नगरीकडे येत असतांना तिच्या दृष्टीस पडला.

“ कोकिळे, तो पहा स्वार येत आहे. ” सुहासिनी न्याहाळून पहात म्हणाली, “ मला वाटतं तो विनोदच आहे. जा—जा पाहूं तो खरोखरच विनोद आहे किंवा दुसरा कोणी जासूद आहे याची चौकशी करून ये परंतु त्यानें तर रक्तजलानें नखशिखात स्नान केलेलें दिसत आहे ! कोण बरें तो असावा ?—अरेरे ! हा रणमैदानावर किती भयंकर देखावा दिसत आहे ! ” एकाएकीं राजनंदिनीचा स्वर बदलला. तिच्या नेत्रांत अश्रूबिंदु

चमकूं लागले. तिच्या हृदयास कंप सुटला. ती सद्गद स्वरानें म्हणाली, " हा युद्धप्रसंग आणण्यास मी कारण झालें. माझ्या एकटीच्या सुखदुःखाकरितां शेंकडों रजपूत आज काळाच्या भक्ष्यस्थानीं पडत आहेत. त्यांच्या मृत्युमुळें कितीतरी रजपूत ललना दुःखानें टाहो फोडत असतील —" पुनः ती क्षणभर थांबली. पुनः तिची चर्या बदलली. " माझ्या सुखाकरितां समरकुंडांत उड्या घेणारे हे वीर मला दिसत नाहींत काय ? माझ्या सुखाकरितां शेंकडों रजपूत स्त्रियांच्या संसाराची राखरांगोळी होत असतां मी येथें स्वस्थ बसून रहावें काय ? मी हा अत्याचार मुकाट्यानें सहन करावा ना ? छे—छे—प्रासादाच्या सौधावर स्वच्छंदानें विहार करण्याची वेळ गेली ! आतां मला रणसमुद्रांत उडी टाकली पाहिजे—चल कोकिळे मजमुळें होणारा हा अत्याचार—" असें म्हणत तिनें मागें वळून पाहिलें.

परंतु कोकिळा होती कुठें ? तिला ' जा ' म्हणतांच ती राजकन्येच्या पुढल्या स्वगत भाषणाकडे दुर्लक्ष करून केव्हांच तेथून निघून गेली होती. त्या येणाऱ्या स्वाराच्या एकंदर बसण्याच्या डौलावरून तो विनोदच असला पाहिजे असें तिला वाटलें. आणि म्हणूनच ती इतक्या तांतडीनें चौकशी करण्याकरिता निघाली. ती उद्यानाच्या दरवाजाजवळ येईपर्यंत तो स्वार अगदीं जवळ येऊन ठेपला.

" कोकिळे ! " रक्तानें सर्वांगलाल झालेल्या विनोदानें एकदम अश्वाचा गतिरोध केला. " कोकिळे, ताईमहाराज कुठें आहेत ? सांग—सांग लवकर ! प्रसंग मोठा बिकट आला आहे—"

" पण तुम्ही रणांतून पळून कां आलां ? " तुच्छ दृष्टीनें विनोदाकडे पहात कोकिळा कठोर स्वरानें म्हणाली.

" मी रणांतून पळून आलों ? " भृकुटी वक्र करून गर्जना करीत विनोद म्हणाला, " कोकिळे, तुला असा विपरित संशय आला काय ? महाराजानीं आपल्या हातांनीं मला दिलेल्या ह्या रजपूतदैवताला धारण करण्यास मी असमर्थ आहें असें तुला वाटलें काय ? " असें म्हणून शत्रुरक्त प्राशून लाल झालेली आपली तरवार सरकन् उपसून आपल्या उजव्या हाताच्या वज्रमुठींत त्यानें धरली. " कोकिळे, ह्या विनोदाच्या कर्तृत्वाची तुला अद्यापि ओळख पटली नाहीं असें दिसतें. "

विस्मयाकुल होऊन कोकिळा आपणापुढें उभा असलेल्या वीरपुंगवाकडे क्षणभर पहात राहिली.

" कोकिळे, महाराजांची आज्ञा म्हणूनच मी तें युद्धक्षेत्र सोडून आलों. मजकडे महाराजानीं एक मोठी जोखमाची कामगिरी सोंपविली आहे. " विनोद किंचित्कालानें म्हणाला, " ताईमहाराज मंदिरांत आहेत ना ? "

" होय. पण त्या पहा येथेंच येत आहेत—" मागें बोट दाखवून कोकिळा म्हणाली.

विनोद त्या बाजूला पाहूं लागला. त्यावेळीं सुहासिनी रणवेषानें सज्ज होऊन उद्यानांत प्रवेश करीत होती. तिला अशा वेषात पाहतांच कोकिळा आणि विनोद यांना आश्चर्य वाटलें.

" विनोदा, काय बातमी आहे ? पिताजींचे क्षेम आहेना ? "

" ताईमहाराज, मी येईपर्यंत तेथें क्षेम होतें, रणोन्मादानें उन्मत्त झालेली आपली सेना शत्रूचा संहार करीत होती, महाराजांच्या प्रचंड तरवारीचा हृदयाला कांपविणारा खणखणाट दिगंतरालीं सिंहनाद करीत होता—"

" पण आतां येथील वर्तमान काय आहे ? "

" तें मला सांगतां येणें शक्य नाहीं. "

" तर मग तूं कां परत आलास ? फिर मागें—चल मजबरोबर—"

" कुठें ? "

" रणकुंडांत."

सुहासिनीचें उत्तर ऐकतांच विनोद तिच्या तोंडाकडे पहात राहिला. तिच्या स्वरावरून तिचा निश्चय स्पष्ट दिसून येत होता. त्यामुळें तो थोडा वेळ गोंधळला.

" विनोदा, तूं अशा मुद्रेनें मजकडे काय पहात राहिला आहेस ? पिताजी तिकडे संकटांत असतील. आपले शूर योद्धे माझ्या सहानुभूतीची अपेक्षा करीत असतील; अशा वेळीं मी येथें स्वस्थपणें भवितव्यतेचा विचार करीत बसणें—"

" पण ताईमहाराज, तेथें जाण्याची ही वेळ नाहीं."

" वेळ असो अगर नसो. इतका वेळ मला माझ्या कर्तव्याची विस्मृति पडली होती. परंतु आतां स्मृति होऊन जर मी माघार घेऊं लागलें तर जगाच्या उपहासाला कारण होईन. मला पाषाणहृदयी म्हणून जन नांवें ठेवतील—"

" ताईमहाराज, असे विचार आपण मनांत देखील आणूं नयेत. आपणावर सर्व प्रजेचें किती निस्सीम प्रेम आहे याची तुम्हाला कल्पना

देखील होणार नाहीं. आपणाकरितां धारातीर्थी आपला देह पडावा म्हणून प्रत्येक वीराची सारखी धडपड चालली आहे."

"म्हणूनच मला समरभूमीवर गेलें पाहिजे."

"पण महाराजांची इच्छा निराळीच आहे. त्यांनीं मला ही मुद्रिका देऊन आपणाकडे पाठविलें आहे." असें म्हणून विनोदानें आपला हात पुढें केला.

"पिताजीची काय आज्ञा आहे ?" विनोदाच्या करंगुळींतील बहुमूल्य आंगठी पाहतांच ती ओळखून सुहासिनी म्हणाली.

"महाराजानीं आज्ञा केली नाहीं परंतु त्याची शेवटची इच्छा अशी आहे."

"शेवटची इच्छा! म्हणजे? पिताजींचें रणक्षेत्रात क्षेम आहे म्हणून म्हणालास ना ?" भयाभीत होऊन आश्चर्यानें राजकन्येनें एकदम विचारलें

"होय. ताईमहाराज आपण अशा भयविव्हळ कां झाला ? महाराजांनीं मला मध्यरात्रीं जवळ बोलावून ही शेवटची इच्छा सांगितली आणि म्हणाले, युद्धांत कांहीं कमी अधिक प्रकार झाला तर तूं तात्काळ नगरींत जा आणि आपणास माझी इच्छा सांग. त्याप्रमाणें सकाळीं युद्धाला प्रारंभ होऊन थोडा वेळ होतांच महाराजांनीं मला जवळ बोलावून आपणाकडे पाठविलें आहे."

"मग पिताजींची काय इच्छा आहे ?" सुहासिनी खिन्न आवाजांत म्हणाली.

"प्रासादाच्या गच्चीवरून युद्धक्षेत्राकडे पहात असतां आपला मयुरध्वज स्थानभ्रष्ट झालेला दिसला तर तात्काळ आपणास घेऊन महाराजांनीं सांगितलेल्या गुप्त मार्गानें विजयपुरास जावयाचें आणि आपणास भीमरथ महाराजाच्या स्वाधीन करावयाचें."

सुहासिनी स्तब्ध उभी होती. तिनें कांहीं एक उत्तर दिलें नाहीं. चर्येवरून तिच्या मनांत चाललेले विचार स्पष्ट दृग्गोचर होत होते. क्षणभरानें 'ताई महाराज, चला,' असें म्हणतांच ती एखाद्या आज्ञाधारक मुक्या जनावराप्रमाणें विनोदाच्या मागून जाऊं लागली. तिच्या मागून कोकिळाहि निघाली, तीं तिघेंजण उद्यान ओलांडून प्रासादांत शिरलीं. तेथून प्रासादावरील भव्य मनोऱ्यावर जाईपर्यंत कोणीसुद्धां एक अक्षर उच्चारलें नाहीं. सुहासिनी सर्वांच्या पुढें होती. सज्जावर येतांच तिची दृष्टि दिसणाऱ्या तेथून समरभूमीवर गेली.

त्यावेळचा देखावा कसा होता ?—समरभूमीकडील दिशा अगदीं धुंद झाली होती. मधून मधून अंतरिक्षांत तरवारीच्या आघातानें धडापासून दूर झालेलीं शीरकमलें चेंडुसारखीं वर उडतांना दिसत होतीं. फार दूरवरून असा भीषण

देखावा दिसत होता तर प्रत्यक्ष युद्धभूमीवर किती भयानक प्रकार घडत असेल ? डोळ्याचें पातें लवतें न लवतें इतक्या अवधींत अगणित सैनिकांचीं मस्तकें धडावेगळीं होऊन धारातीर्थी पडत होतीं. तीक्ष्ण कुऱ्हाडींच्या घावानें शरीराचे अवयव छिन्नभिन्न होऊन इतस्ततः पडत होते. चाऱ्हीं बाजूंनीं रक्ताच्या नद्या वहात होत्या. ठिकठिकाणीं शूरवीरांच्या प्रेताचे ढीग पडलेले दिसत होते. रणोन्मादानें बेहोष झालेल्या वीरांचें देहभान विसरलेले अश्व भयंकर पिशाचाप्रमाणें समरनृत्य करीत आहेत कीं काय, असें दिसत होते. तरवारींचा खणखणाट, भाल्यांच्या फेंका, बाणांचा सर्र आवाज, कुऱ्हाडींचे आघात आणि रजपूत विरांचा घोर सिंहनाद दिगंतरालीं प्रतिध्वनित होत होता !

हा हृदयविदारण करून टाकणारा देखावा पहात असतां प्रासादाच्या गच्चीवर असलेल्या व्यक्तींच्या हृदयाचा खरा भेद करणारा एक अत्यंत भयंकर प्रकार घडला. इतकावेळ समरांगणावर फडकणारा मयुरध्वज आतां एकाएकीं कोसळला ! तें पाहतांच त्या तिघांच्या हृदयांत भयंकर धक्का बसला. राजकन्येचें मुखमंडळ काळें ठिक्कर पडलें. राजकुमारीचा अवरोष्ठ थरथरां कापूं लागला. तिच्या वदनमंडळावर क्रोधाची लाली चढली. नयनयुग्मांतून अश्रुबिंदु बाहेर दिसूं लागले. तीच स्थिति बाजूला उभ्या असलेल्या विनोदाची झाली. आपलें राजचिन्ह पतन पावलेलें पाहतांच तो अभिमानी तरुण देहभान रहित झाला. त्यानें सरकन् म्यानांतून आपली तरवार बाहेर काढली. आणि दूरवर असलेल्या समरकुडांत उडी टाकण्याकरिता सज्जाच्या बांधावर त्यानें एकदम उडी मारिली. हा प्रकार इतक्या अल्पावधींत झाला कीं जवळ असलेल्या सुहासिनीला त्याचा प्रतिकार करण्याचें भानच राहिलें नाहीं. परंतु कोकिळेनें मात्र त्यावेळीं बाजू राखिली. तिनें चालाखी करून विनोदाला एकदम मागें ओढलें.

" समरांगणांत जाण्याकरितां तुम्ही येथून उडी मारणार कीं काय ? " कोकिळा विनोदाला उद्देशून म्हणाली.

" आतां तुमच्या कर्तव्याची दिशा ती नव्हे." धिटाईनें कोकिळा म्हणाली, " महाराजांची तुम्हांला शेवटची आज्ञा काय आहे, ती तुम्हीं विसरलांत काय ?—आतां महाराजांच्या इच्छेप्रमाणें ताईमहाराजांचं रक्षण करणं हेंच तुमचें कर्तव्य ! "

कोकिळेचें भाषण ऐकतांच विनोदाला आपल्या खऱ्या कर्तव्याची ओळख

झाली. हताश झालेल्या मनुष्यासारखा तो अधोवदन करून क्षणभर तेथेंच उभा राहिला. त्यावेळीं त्याच्या अंतःकरणाला अनिर्वचनीय यातना होत होत्या. त्याची स्थिति एखाद्या दंतहीन भुजंगाप्रमाणें झाली होती.

" कोकिळे, आज तुझे मजवर अगणित उपकार झाले. ऐनसमयीं तूं मला माझ्या कर्तव्याची ओळख करून दिलीस, ह्या उपकाराबद्दल मी तुझा जन्मभर ऋणी राहीन. " असें मोठ्या कृतज्ञतेनें म्हणून तो सुहासिनीकडे वळून पुढें म्हणाला, " ताईमहाराज, चला—आतां क्षणहि फुकट दवडितां कामा नये. काळ फिरला आहे. शत्रुसैन्य आतां केव्हां येथें येईल याचा नेम नाहीं. कोकिळे जा—तुझ्या हाताशीं लागतील ते ताईमहाराजांचे कपडे घेऊन मंदिरांत ये. क्षणाचाहि विलंब लावूं नकोस. जा—जा—लवकर—"

कोकिळा निघून गेली. परंतु सुहासिनी मात्र तेथेंच एखाद्या स्फटिक पुतळीप्रमाणें उभी होती. ती जडमूढच होऊन गेली होती. तिचा सुंदर मुखचंद्र दिवसाच्या चंद्राप्रमाणें अगदीं निस्तेज होऊन गेला होता. एकंदरीनें त्यावेळीं राजकुमारीची स्थिति खरोखरीच फार अनुकंपनीय होती. भविष्यत् काळाच्या चिंतनानें आणि निरनिराळ्या विचारानीं तिचें मस्तक भणाणून गेलें होतें. विनोदानें तिला दोन चार हांका मारिल्या, परंतु त्या तिनें ऐकल्या नाहींत, इतकी ती संज्ञाशून्य बनली होती. शेवटीं त्यानें " ताईमहाराज " अशी मोठ्यानें हाक मारिली.

" विनोदा, आतां पुढें कसें होणार रे ? " बाष्पगद्गद कंठानें सुहासिनीनें विचारलें.

" ताईमहाराज, आपण अशा विकल कां झालां ? "

" मग आतां पुढें काय करायचें ? "

" महाराजांची शेवटची इच्छा पूर्ण करायची ! चला—"

" पण पतिजींची आतां आपणास भेट नाहीं का होणार ? "

" नाहीं—तें मला निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. " किंचित् विचार करीत पण अडखळत विनोद म्हणाला, " आतां आपली सर्व काळजी चंडी मातेला आहे. चला—ताई महाराज, ही विचार करण्याची वेळ नाहीं."

ते चंडीमातेच्या देवालयांत जातात न जातात तोंच कोकिळा तेथें आली. तिच्या हातांत कांहीं वस्त्रें एकत्र बांधलेलीं होतीं. तिला आलेली पाहतांच विनोदानें एकवेळ सर्वत्र न्याहाळून पाहिलें. परंतु त्यावेळीं देवालयांत किंवा

देवालयाच्या आसपास कोणीहि नव्हतें. फक्त फार दूरवर शत्रुसैन्याचा कोलाहल मात्र अगदीं अस्पष्ट ऐकूं येत होता. पण ही स्थिति क्षणभरच होती. इतक्यांत एक मोठा भयंकर स्फोट झालेला ऐकूं आला. त्या आवाजाबरोबर ते तिघेहि एकदम दचकले. विनोद चटकन् मंदिराच्या द्वाराजवळ जाऊन पाहूं लागला. तों काय ?—नगरीचा भव्य व मजबूत पश्चिम तट कोसळला असून रणोन्मत्त शत्रुसैन्य दिग्मंडळ प्रतिध्वनित करणारा प्रचंड जयध्वनि करीत नगरींत प्रवेश करीत आहेत; असें त्याच्या दृष्टीस पडलें !

"ताईमहाराज चला—शत्रूचा नगरींत प्रवेश झाला !" मोठ्या तांतडीनें बोलत तीरासारखा विनोद आंत झाला. आणि मोठया गडबडीनें त्यानें चंडीमातेचा डावा चरण धरून जोरानें मागें लोटला. त्याबरोबर देवी आसनासह मागें सरकली. आणि तेथें एक भव्य भुयार दिसूं लागलें. विनोदानें प्रथम सुहासिनीला हाताशीं धरून आंत उतरविली. नंतर कोकिळा आत शिरली. त्याच्यामागून भुयारांत प्रवेश करण्याकरितां विनोद तयार झाला.

"जय चंडीमाते ! तूंच आतां आमची रक्षण करणारी !" इतकें बोलून विनोदानें देवीला साष्टांग प्रणिपात केला आणि भुयारांत उडी टाकिली.

क्षणभरानें देवी आसनासह आपल्या पूर्व स्थानावर येऊन स्थीर झाली.

## २

## नजरकैद

१

विजयपुराच्या राजमंदिरांत एका भव्य महालांत अमात्य अनंगसेन विचार करीत बसला होता. त्याच्या अंतःकरणांत औदासीन्य पसरलें होतें. त्यावेळीं संध्यासमय अगदीं समीप येत चालला होता. क्षितिजावर तांबूस वर्णाची छटा आली होती. वृक्ष आणि लता नानातऱ्हेच्या पुष्पांनीं प्रसन्न झाल्या होत्या, मनाला आनंद देणारा वारा झुळझुळ वहात होता. आकाश-पटल चित्रविचित्र रंगांनीं रंगित झालें होते. असें हें मनोहर सृष्टिसौंदर्य महालाच्या खिडकींतून स्पष्ट दिसत होतें. परंतु अमात्याच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम होत नव्हता. वास्तविक पाहिलें असतां त्यास कोणत्याहि गोष्टीचें न्यून नव्हतें. त्याचा अधिकार मोठा होता. वृद्धावस्थेमुळें भीमरथ राण्यानें आपल्या राज्याचीं सर्व सूत्रें त्याच्या हातीं दिलीं होतीं, त्यामुळें तो प्रत्यक्ष राण्याचाच मान उपभोगित होता. इतकेंच नव्हे, तर प्रीतीनें वश झालेल्या राणी दामिनीचा तो स्वामी बनला होता. अशा रीतीनें सर्व गोष्टी अनुकूल असतांना आज तो इतक्या उदास वृत्तीनें कसला बरें विचार करीत असावा ?

थोडावेळ झाला. अमात्य आपल्या जागेवरून उठून इकडे तिकडे फिरूं लागला. आतां त्याचे विचार मुखावाटे बाहेर पडूं लागले. तो स्वतःशीं म्हणूं लागला, “ कदाचित् ही गोष्ट शक्य आहे. राणा जरी आपल्या तरुण राणीच्या सौंदर्यानें मूढ बनून अंध झाला असला, तरी युवराजाचे डोळे उघडे आहेत. माझी सत्ता त्याला सहन होत नाहीं, माझा तो द्वेष करतो हेंच खरें ! अंतकानें आणलेल्या बातमीवरून तो कांहीं तरी कारस्थान उपस्थित करण्याच्या विचारांत असावा असेंच खरें ! ”

इतक्यांत एक सेवक आंत आला, त्याला पाहतांच अमात्यानें मोठ्या

उत्सुकतेनें विचारलें, " अंतका, आलास ? काय बातमी आहे ? मला आलेला संशय खरा काय ? "

" नाहीं महाराज. ते कोणी परदेशांतील हेर नसून त्यांना आपल्या युवराजांची ओळख देखील नाहीं. फक्त त्यांनीं युवराजाची चौकशी केली. ते दोघे जण गुरु शिष्य आहेत. त्यांपैकीं वृद्ध आहे तो धन्वंतरी आहे, आणि तो तरुण—"

" हं—बोल. तो तरुण काय ? "

" तो तरुण नसून ती तरुणी आहे असा मला संशय आला आहे. "

अंतकाचें उत्तर ऐकतांच अमात्य क्षणभर विचारांत पडला.

" ती तरुणी आहे तर ह्या गोष्टीची चांगलीच शहानिशा झाली पाहिजे; करितां अंतका, आतां असें कर—पुन: तेथें निराळ्या वेषानें जाऊन तिला येथें घेऊन येण्याची व्यवस्था कर म्हणजे स्वत: मी ह्या सर्व गोष्टींचा उलगडा करतों. "

" आज्ञा महाराज " असें म्हणून अंतक बाहेर पडला.

आपणास आलेला संशय निराधार आहे, असें कळतांच अमात्याच्या मनाची तळमळ शांत झाली. आतां ही तरुणी कोण असावी ? ही कोठून आली असावी ? हिला युवराजाची चौकशी करण्याचें कारण काय ? वगैरे विचार त्याच्या मनांत येऊं लागले. परंतु त्याचें त्याला इतकें महत्त्व वाटलें नाहीं कारण ती तरुणी येतांच आपण हांहां म्हणतां त्या सर्व गोष्टींचा उलगडा करून घेऊं, अशी त्याला खात्री होती. तो आतां प्रसन्न चित्तानें उठला, आणि घरीं जाण्याकरितां निघाला.

विजयपुरचा राणा भीमरथ बरीच वर्षें विधुरावस्थेंत राहिल्यावर त्यानें शमीनगरच्या धुंडपाळ महाराण्याच्या भगिनीची सौंदर्यकीर्ति ऐकून तिच्या बरोबर द्वितीय संबंध केला. दामिनी राणीला नटण्या मुरडण्याची आणि दागदागिन्यांची फार आवड असल्यामुळें राणा तिचें कोड पुरविण्यास सदा तत्पर असे. ती चंचलबुद्धीची आणि फार मानी होती. राण्याला प्रथम पत्नीपासून अमरसिंह झाला होता. त्याच्यावर राण्याचें अत्यंत प्रेम होतें. परंतु दामिनीला पुत्रप्राप्ती होतांच त्याच्या सर्व प्रेमाचा ओघ दामिनीपुत्र कमलसिंह याजकडे वळला. तरी देखील अमरसिंहाला त्याचा विषाद वाटला नाहीं. तो विचारी आणि प्रेमळ स्वभावाचा होता. आपल्या धाकट्या

भावावर त्याचें फार प्रेम होतें. परंतु पुढें पुढें राणा जसा थकत चालला, तेव्हां राणीला एक नवीन चिंता उत्पन्न झाली. पुढें मागें अमरसिंह हा राज्याचा मालक होईल आणि आपणास कोणीहि विचारणार नाहीं, असे विचार तिच्या मनांत रात्रंदिवस घोळूं लागले. राण्याच्या मागें आपल्या कमलसिंहाला सिंहासन प्राप्ती व्हावी म्हणून काय करावें, ह्या विचारांत असतांना अनंगसेनानें तिच्यावर आपला शह बसविला. राणी चंचलबुद्धीची असल्यामुळें सहजासहजीं ती त्याच्या इरेस पडली. हळूहळू त्याचें प्रस्थ इतकें वाढत गेलें कीं, राणीच्या शिफारशीनें त्याला अमात्यपद प्राप्त झालें. तरी देखील त्याची महत्त्वाकांक्षा दिवसेंदिवस वाढत्या प्रमाणावर होती. असो.

बरीच रात्र झाली होती. भोजनादि विधि आटोपून अनंगसेन अमात्याची स्वारी अंतकाची वाट पहात बसली होती. इतक्यांत त्याला दामिनीराणीकडून बोलाविणें आलें. अमात्याला आपल्या स्वामीनींचा निरोप सांगून परिचारिका गेली नाहीं, तोंच अंतक आंत आला, आणि म्हणाला, “ महाराज, मी त्या तरुणाला—तरुण कसला, तरुणीच ती ! तिला एकटीला घेऊन आलों आहें. परंतु मी युवराजाकडूनच आलों आहें असें तिला सांगितलें आहे. तिला किंवा तिच्याबरोबर असलेल्या वृद्धाला येथील कांहींच माहिती नाहीं असें दिसतें. तर आतां आपण युवराजच आहात असें तिला भासवा म्हणजे सर्व कांहीं कळेल.”

“ तर मग तूं आतां असें कर,” अमात्य विचार करीत म्हणाला, “ मला आतां राणीनें बोलाविलें आहे, तेव्हां तूं तिला प्रासादाच्या उत्तरद्वारानें आंत आण. मी तेथेंच आहें. ”

अंतक निघून गेल्यावर अमात्यानें आपला पोषाख चढविला. परंतु पोषाख करतांना ती तरुणी सुंदर असेल काय, हा विचार त्याच्या मनांत घोळूं लागला. सर्व पोषाख करून झाल्यावर त्यानें एकवेळ आरशांत आपलें प्रतिबिंब पाहिलें, आणि आपण प्रासादात जात आहोंत असें सेवकाला सांगून तो बाहेर पडला.

प्रासादाच्या उत्तर द्वारानें आंत आल्यावर एक भव्य महाल होता. त्या महालाची रचना फारच कुशलतेनें केलेली होती. बहुतकरून तो महाल नेहमीं बंद असे. राजकारणासंबंधीं गुप्त मसलती करण्याकरितां मुत्सद्दी मंडळी त्या महालांत जमत असे. अंतक येण्यापूर्वींच अमात्य त्या महालांत जाऊन बसला. तेथें उत्तम रोषनाई केलेली असून सर्व महाल उत्तम प्रकारें शृंगारलेला होता. अमात्याला तेथें जाऊन फार वेळ तिष्ठत बसावें लागलें नाहीं.

कारण तो जाऊन बसतो न बसतो तोंच अंतक आंत आला आणि अत्यंत नम्रपणाने भूमीला हात लावून त्यानें अमात्याला प्रणाम केला. त्याच्या मागें एक अठरा एकोणीस वर्षांचा तरुण आंत आला. परंतु अमात्याच्या मुखाकडे पाहतांच तो तरुण गोंधळला.

" तुम्हांला ज्यांना भेटावयाचें आहे तेच हे युवराज महाराज ! " अंतक त्या तरुणाकडे वळून म्हणाला.

युवराजांचा जयजयकार असो ! " त्या तरुणानें विनयानें प्रणाम करून म्हटलें. परंतु त्याचा प्रत्येक शब्द .बोलतांना अडखळला. तो अमात्याच्या चेहऱ्याकडे तीक्ष्ण दृष्टीनें पहात राहिला.

" हे तरुणा ! तूं कोण ? कोठून आलास ? तुझें नांव काय ? आणि माझी भेट घेण्याचा तुझा उद्देश काय ? " असे अमात्यानें एकाच भाषणांत सर्व प्रश्न विचारले. परंतु बराच वेळ पर्यंत त्या तरुणानें उत्तर दिलें नाहीं. तें पाहून आपणास कोठलाही संशय आला नाहीं असें दाखवून अमात्य पुढें म्हणाला, " तरुणा, तूं असा गोंधळून कां गेला आहेस ? तुला येथें भिण्याचें कांहींच कारण नाहीं. तूं जी इच्छा धरून येथें आला आहेस ती मला कळूंदे. सांग— असा गप्प कां ? "

" महाराज तुमच्या या सेवकाचा कांहींतरी गैरसमज झाला असावा असें वाटतें, " तो तरुण म्हणाला, " मला युवराज अमरसिंह महाराजांची भेट घ्यावयाची आहे. "

"ठीक आहे. मग बोल तुला काय बोलायचें आहे तें ! मीच तो अमरसिंह."

" आपण अमरसिंह ? " आश्चर्यानें तो तरुण म्हणाला.

" होय मींच. पण तुला अशी शंका कां उद्भवली ? "

" कारण मी युवराज अमरसिंहमहाराजांची तसबीर पाहिली आहे, आपण ते न—व्ह—त—"

" असं काय ? एकूण तूं अमरसिंहाला ओळखतोस तर ! बरं तर तूं कोण हें मला कळूं दे म्हणजे मी तुझी आणि युवराजाची भेट करून देतों. "

" पण प्रथम आपणच युवराज असं मला कां भासविलं ? "

" कारण तूं स्वतः मला तसं भासविलेंस म्हणून मलाहि तसेंच करावें लागलें."

" म्हणजे ? "

" म्हणजे तूं तरुण नसून तरुणी आहेस—"

अमात्याच्या मुखांतून इतके शब्द बाहेर पडतांच तो तरुण एकदम चपापला. आपलें संधान बरोबर लागू पडलेलें पाहून अमात्य हांसत हांसत पुढें म्हणाला, " तरुणी, आता हा लेपंडाव पुष्कळ झाला. तूं कोण आहेस हें मी केव्हांच ओळखलें. आतां तुझें काम काय आहे तें मला कळूं दे. अशा पुरुषवेषांत येथें येण्याचा तुझा उद्देश काय ? "

" आपण कोण हें मला कळेल काय ? " क्षणभरानें ती तरुणी म्हणाली.

" कळेल पण प्रथम तुला तुझ्या खऱ्या स्वरूपांत पहावें अशी माझी इच्छा आहे, तर अंतका, जा आणि सर्व स्त्रीभूषणें घेऊन ये. इतकें बोलून अमात्य आपल्या आसनावरून उठत म्हणाला, " हे सुंदरी, तुझ्या ह्या कृतीवरून तूं मोठी धैर्यशील स्त्री आहेस अशी माझी खात्री झाली. पण तूं कोण आहेस तें मला आतां कळूं दे ! ! "

" पण महाराज आपण दूर व्हा—आपण कोण आहांत हें कळल्याशिवाय-"

" सुंदरी, ह्या देहाला अनंगसेन म्हणतात. पण—"

" कोण ! आपण अमात्य अनंगसेन ! " आश्चर्यातिशयानें मागें सरतांच त्या धक्क्याबरोबर त्या तरुणीच्या डोक्यावरील मंदिल खालीं पडला आणि व्यवस्थेनें गुंडाळून आटोपशीर बांधलेले तिचे लांब कुरळे केश सुटले. त्याबरोबर तिच्या चर्येत विलक्षण फरक पडला. अमात्य क्षणभर तिच्या सौंदर्याकडे एकाग्रतेनें पहातच राहिला. हळुहळू त्याच्या मनांत निरनिराळे विचारतरंग येऊं लागले. त्या थोड्या वेळाच्या अवलोकनानें तो अगदीं मूढ होत चालला. क्षणभरानें तो पुढें होऊन म्हणाला, " सुंदरी, तूं आतां आपल्या मनांतील सर्व विकल्प सोडून दे. मी तुझा दास आहे असें समज आणि मला आपला म्हणून तुझें जें काम असेल तें सांग. मी अधिकारानें अमात्य जरी असलों तरी तुझ्या शब्दाला मीं माझी मान नेहमीं वाकवीन. बोल, हे सौंदर्यलतिके, तुझी काय आज्ञा आहे ? पण तूं अशी दूर कां ? "

" दूर—दूर व्हा—अमात्यमहाराज दूर व्हा. आपण थोर पुरुष इतक्या सहजीं विकारवश झालां हें मोठें आश्चर्य आहे. "

" यांत आश्चर्य कसलें ! जेथें प्रपंच राहिला नाहीं—"

" महाराज, आपल्या विचारांची मर्यादा फार पुढें गेली. आपण इतक्या कच्चा मनाचे असाल असं मला वाटलं नव्हतं. हं दूर—व्हा—"

इतक्यांत अंतक आंत आला आणि त्यानें आणलेलीं स्त्रीभूषणें त्या तरुणीपुढें ठेविलीं. नंतर त्यानें आपल्या स्वामीकडे पाहिलें. परंतु त्याच्या चर्येत त्याला पुष्कळ फरक दिसला. नंतर त्यानें त्या तरुणीकडे पाहिलें, तों तिच्याहि चर्येत फरक पडलेला त्याला दिसून आला. तेव्हां आपल्या मागें येथें काय प्रकार घडला हें त्या चाणाक्ष सेवकाच्या सहज लक्षांत आलें. परंतु त्या गोष्टीची ओळख न देतां तो पुढें होऊन हळूच म्हणाला, "महाराज, मी आतां मंदिरांत गेलों असतां राणीमहाराजांकडून प्रमदा पुनः आलेली मला भेटली."

अमात्याच्या रंगाचा बेरंग झाला! राणीकडून प्रमदा आली होती असें ऐकून त्याला राग आला. आजपर्यंत तो राणीच्या बोलविण्याची सारखी वाट पहात असे, पण आजचा दिवस मात्र निराळा होता. त्याच्या पुढें उभी असलेल्या तरुणीनें त्याला अल्पावकाशांत मोहिनी घातली होती. परंतु करतो काय? तो मोठ्या विचारांत पडला. कारण राणीकडून त्याला दोनदां बोलविणें आलें होतें. आतां जर आपण गेलों नाहीं, तर आपला शोध काढीत राणी स्वतः येथें येईल अशी त्याला भीति होती. तेव्हां नाइलाजास्तव त्यानें क्षणभर विचार करून अंतकाला डोळयानें खूण केली आणि त्या तरुणीकडे वळून तो म्हणाला, "हीं वस्त्रें आणलीं आहेत. आपणास ह्या पुरुषवेषांत बरीच अस्वस्थता वाटत असेल, करितां ह्या वस्त्रांचा अंगीकार करावा आणि मी थोड्या वेळानें परत आल्यावर आपण पुनः स्वस्थ चित्तानें बोलत बसूं!"

"मला आतां येथें जास्त वेळ राहतां येत नाहीं."

"परंतु आपला येथें गुप्त वेषानें येण्याचा उद्देश कळल्याशिवाय मी आपणास जाऊं देणार नाहीं."

"पण माझा उद्देश आपणास कधींहि कळणार नाहीं."

"असें असेल तर आपणासहि येथून जातां येणार नाहीं."

"कां बरं?"

"कारण आपण माझा नजरकैदी अहांत."

# गुप्त कारस्थान २

अमात्य अनंगसेनेच्या नजरकैदेंत अडकलेली तरुणी कोण होती, हें वाचकांच्या लक्षांत आलेंच असेल ! आपल्या स्वामिनीच्या कार्याकरितां वृद्ध मेघावी चारणाला बरोबर घेऊन निघालेली ती यशोधरा होती. विजयपुरांत प्रवेश करण्यापूर्वी तिनें आपला स्त्रीवेष टाकून पुरुषवेष घेतला होता. परंतु शेवटीं तिची फसगत झाली. अंतक हा अमात्य अनंगसेनाचा अत्यंत विश्वासु आणि चाणाक्ष गुप्त हेर होता. त्यानें यशोधरेचें खरें स्वरूप तेव्हांच ओळखलें. परंतु त्याची गांठ पडण्यापूर्वी यशोधरेनें विजयपुरासंबंधीं बरीच माहिती मिळविली होती. भीमरथमहाराज सध्यां आजारी असून दामिनीराणी आपल्या नवीन नेमलेल्या अमात्याच्या तंत्रानें वागते, त्यामुळें नगरांत असंतोष उत्पन्न झाला आहे, युवराजाला कोणी विचारीत नाहीं, इत्यादि गोष्टी तिला चौकशीअंतीं कळल्या. शिवाय तिला दुसरी एक गोष्ट कळली, ती ही कीं, शमीनगरचा महाराणा धुंडपाळ, ज्यानें सुहासिनीची मागणी घातली त्याचीच दामिनी ही धाकटी बहिण आहे.

यशोधरेला ह्या गोष्टी कळल्यावर ती विशेष सावध झाली होती तरी देखील अंतकाच्या भाषणाला ती फसलीच ! युवराज म्हणून त्यानें तिला अमात्याच्या पुढें आणून उभें केलें, परंतु तो युवराज नाहीं, हें मात्र तिनें तात्काळ ओळखलें. कारण मयूरनगरी सोडण्यापूर्वी युवराज अमरसिंहाची तसबीर तिनें सुहासिनीजवळ पाहिली होती, त्यामुळें ती पूर्ण फसली नाहीं. तथापि नजरकैदेंत मात्र येऊन पडली.

गेल्या प्रकरणांत वर्णन केल्याप्रमाणें अमात्य निघून गेल्यावर अंतकानें यशोधरेला वळविण्याचा थोडासा प्रयत्न केला परंतु तोही सफल झाला नाहीं. तेव्हां तो दरवाजे बंद करून तेथून चालता झाला. ते दोघे निघून गेल्यावर यशोधरेला पुनः एकांत मिळाला. पुढें काय करावें हें तिला सुचेना. ती किती वेळ एकसारखी विचार करीत होती. इतक्यांत तिला अस्पष्ट असा वीणानाद ऐकूं येऊं लागला. स्वभावतः ती गायनलोलुप असल्यामुळें वीणेचा मंजुळ नाद ऐकतांच ती झटकन् आपल्या जागेवरून उठली आणि आवाज कोठून येतो तें पाहूं लागली. हळुहळू ती त्या आवाजाच्या अनुरोधानें एक

दालन टाकून पुढें गेली, तेव्हां तिला तो आवाज विशेष स्पष्ट ऐकूं येऊं लागला. यशोधरा बराच वेळ तेथें उभी राहून पलीकडे चाललेलें मंजुळ गायन ऐकत होती. परंतु तेवढ्यानें तिची तृप्ति होईना. इतका कोमल कंठस्वर कोणाचा आहे, हें कळावें अशी तिला जिज्ञासा झाली. परंतु पलीकडे जाण्यास तेथें कांहींच मार्ग नव्हता. शेवटीं इकडे तिकडे निरीक्षण करतां भींतीच्या उभ्या तुळईत आणि छताच्या प्रत्येक आडव्या तुळईत साधारण फट असलेली तिला दिसली. तेव्हां तेथें चढून पलीकडे पहावें, ह्या उद्देशानें ती वर चढण्याचा मार्ग शोधूं लागली. इतक्यांत कर्मधर्मसंयोगानें तिचा हात अशा ठिकाणीं पडला कीं, ती भिंत एकाएकीं दुभंग झाली आणि पलीकडे एक लहानसें गुप्तद्वार तिच्या दृष्टीस पडलें. तें द्वार उघडण्यास यशोधरेला कांहीं फार वेळ लागला नाहीं. कारण तशा प्रकारच्या गुप्तद्वारांची तिला चांगली माहिती होती. तिनें हळुहळू द्वाराच्या सर्व बाजू दाबून पाहिल्या, तों खालच्या बाजूला तिला एक कळ दिसली. ती तिनें दाबताच तें गुप्त द्वार हळूच उघडलें. यशोधरेनें तें द्वार किंचित् उघडून आंत डोकावून पाहिलें तों त्या द्वाराला पडदा लावलेला होता. परंतु त्यांतून पलीकडील सर्व प्रकार स्पष्ट दिसत होता.

तो अत्यंत उत्कृष्ट रीतीने श्रृंगारलेला राणी दामिनीचा खासगी महाल होता. महालाच्या मध्यभागीं असलेल्या सुवर्णाच्या मच्छरदाणी लावलेल्या मंचकावर दामिनी राणी हातांत वीणा घेऊन बसली होती. जवळच चौघी परिचारिका उभ्या होत्या. पलीकडे एका सुवर्ण ताटांत सुंदर विडे, एकांत पुष्पहार आणि एकांत खमंग खाण्याचे पदार्थ ठेवलेले होते. इतका वेळ राणी आपल्या कोमल अंगुलीनीं वीण्याच्या तारा छेडीत होती; परंतु आतां ती आपला कोमल कंठस्वर त्या वीणानादांत मिळवूं लागली—

रामयति सुभृशं कामपि सुदृशं खलहलधर सोदरे।
किमफलम वसं चिरामिह विरसं वद सखि विटपोदरे।
रमते यमुनापुलिनवने विजयी मुरारिरधुना ॥ १ ॥

एकाएकीं राणी थांबली! कोणी तरी आंत आलें, असें यशोधरेला वाटलें म्हणून ती गुप्त द्वारांतून जास्त डोकावून पाहूं लागली. तों खरोखरीच अनंगसेन अमात्य आंत आला होता. परंतु त्यावेळीं त्याचा पोशाख बदललेला होता. त्याला आंत येतांना पाहून राणीनें आपल्या हातांतील वीणा

दूर केली. तेव्हां नम्रतेनें प्रणाम करीत अमात्य लीनतेनें म्हणाला, "राणी महाराजांच्या आनंदांत मी व्यत्यय आणला त्याबद्दल ह्या गरीब दासाला क्षमा असावी."

राणीने कांहींच उत्तर दिलें नाहीं. फक्त हास्य मुद्रा करून किंचित् वाकड्या मानेनें तिनें अमात्याकडे पाहिलें, आणि आपल्या सख्यांना खूण केली. त्याबरोबर त्या चौघीजणीं हळुहळू त्या महालांतून बाहेर गेल्या. तेव्हां क्षणभर थांबून राणी म्हणाली, " आपण मला राणीमहाराज म्हणता पण मला गडे त्याची फार लाज वाटते—"

"कां बरं ? आपण स्वामिनी आहांत आणि मी आपला गरीब दास आहें."

पुरे झालं आतां ! बसायचं नाहीं का ?—पण आपण मला आज किती वेळ तिष्ठत बसविण्याचा विचार केला होता ? प्रमदा दोन वेळां गेली. शेवटीं मीच येणार होतें स्वारीला आणण्याकरितां ! "

छे ! छे ! इतके श्रम घेण्याचें काय कारण ? हा दास आपल्या सेवेला हजर आहे—"

" पण प्रथम माझी सेवा घेणार ना गोड करून " नेत्रकटाक्षाचा भडीमार करीत राणी म्हणाली.

अमात्य मंचकावर बसल्यानंतर राणीनें प्रथम फराळाचें ताट पुढें केलें. विनोदलहरींत परस्परांचा फराळ झाल्यावर, राणीनें अमात्याच्या गळ्यांत पुष्पहार घालून एक सुंदर ताबूल त्याच्या तोंडांत दिला. नंतर ती स्वतः त्याच्याजवळ बसली आणि म्हणाली, " पण आतां हें किती दिवस असें लपून छपून चालणार ? मला तर ह्या सर्व गोष्टींचा अगदीं मनापासून वीट आला आहे. सर्व दिवसभर मनाविरुद्ध त्या वृद्धकपीजवळ बसून मी तर अगदीं कंटाळलें. पण तुम्हाला त्याचं कांहींच वाटत नाहीं ना ? "

" वाटत नाहीं कसं ? वाटतं ! परंतु सर्वच गोष्टी अशी घाई करून होत नसतात. आजच राण्याला प्रयोग करून उपयोग नाहीं. "

" मग मी हे असेच दुःखांत दिवस कंठावे ना ? "

" थांब—आणखी थोडे दिवस थाब ! प्रथम अमरसिंहाचा कांटा काढल्याशिवाय आपल्या मनासारखें होणार नाहीं. कारण त्याला मागें ठेवल्यास राज्यपदाचा स्वामी होऊन आपलीं पाळेंमुळें तो साफ खणून काढील. अलीकडे त्याला बराच संशय येत चालला आहे. पण माझ्या

करड्या अमलापुढें त्याचें तेज पडत नाहीं. हा प्रश्न निराळा! शिवाय नगरांतहि बराच असंतोष पसरला आहे."

"पण मी म्हणतें, दोन्ही गोष्टी एकाच घावानें करून पुढें प्रजेंत उत्पन्न होणारा असंतोष आपल्या अधिकारानें आपणास सहज घालवितां येईल."

"छे! अशी गोष्ट केव्हांही शक्य नाहीं. प्रजेचा असंतोष राज्याला बाधक आहे."

"मग हें असं किती दिवस चालणार?" असें म्हणून राणीनें लडिवाळपणानें अमात्याच्या गळ्याभोंवतीं हात टाकला.

शिव! शिव! तो प्रकार पाहतांच यशोधरेच्या अंगावर रोमांच उभे राहिले. ती निर्मळ मनाची युवती झटकन् मागें सरकली. आपण पाहिलेला प्रकार खरा आहे किंवा इतका वेळ आपण स्वप्नांत होतों अशी देखील तिला क्षणभर शंका वाटूं लागली. ती पुनः आपल्या पूर्वस्थळीं आली आणि एका कोचावर पाहिलेल्या गोष्टींचा विचार करीत बसली. ती आतां स्वतःविषयीं सर्व गोष्टी विसरली. इतकेंच नव्हे तर ज्या कार्याकरितां ती विजयपुरात आली होती, त्या कार्याची देखील तिला विस्मृति पडली. आपल्या सुखाकरितां राणी प्रत्यक्ष आपल्या पतीला ठार मारण्यास तयार झाली आहे आणि त्या अमानुष कृत्यांत अमात्य तिला सहाय्य आहे, त्याप्रमाणें युवराजालाहि आपल्या मार्गांतून दूर करण्याचा त्यांचा विचार आहे, ह्या गोष्टींचा तिनें पुष्कळ विचार केला आणि त्यांचे जीव वांचविण्याकरितां आपणास काय करतां येईल याचा ती शेवटीं विचार करूं लागली. बराच वेळ विचार केल्यावर ह्या सर्व गोष्टी समाधानकारक पार पाडण्याचा मार्ग तिला सुचला, तेव्हां तिला आनंद झाला. पुनः एक वेळ त्या सर्व गोष्टींचा विचार करून ती उठली.

अंतकानें आणून ठेविलेलीं वस्त्रें तेथेंच पडलीं होतीं. तीं उचलून यशोधरेनें आपला पुरुषवेष उतरविला आणि ती पुनः स्त्रीवेषांत सजली.

---

## शह बसविला ३

मध्य रात्रीचा सुमार झाला होता. यशोधरा अमात्याच्या आगमनाची वाट पहात बसली होती, तिनें पुढल्या सर्व गोष्टींचा कार्यक्रम चांगला आंखून

ठेविला होता. ती स्वतः धाडशी, चाणाक्ष आणि दूरदृष्टि असल्यामुळें प्रस्तुत प्रसंगीं बिलकूल डगमगली नाहीं. उलट तिला एकप्रकारची ईर्षा आली. आपल्या स्वामिनीनें संकटसमयीं युवराजाच्या मदतीची अपेक्षा केली परंतु युवराजांचाच जीव सांप्रत मोठ्या संकटांत होता. आणि तो वांचविण्याकरितां म्हणजे आपल्या स्वामिनीकार्याकरितांच ती ह्या भानगडींत पडत होती असं नाहीं. उलट त्यावेळीं ती आपलें स्वतःचें कार्य देखील विसरली होती. फक्त आपलें कर्तव्य म्हणूनच तिनें आतां कंबर बांधिली होती.

थोड्या वेळानें महालाचा दरवाजा वाजला आणि अमात्य आंत आला. त्याला पाहतांच यशोधरा उठून उभी राहिली, आणि अमात्याच्या मुखाकडे पहात राहिली. इतका वेळ राणीच्या महालांत त्यानें काय प्रकार केले, ते जाणण्याकरितां ती त्याच्या मुखाचें निरीक्षण करूं लागली. तिला सर्व प्रकार कळून चुकला. तिला त्याचा तिरस्कार उत्पन्न झाला. परंतु हातीं घेतलेल्या कार्याकरितां घेतलेली भूमिका यशस्वी होईपर्यंत कर्तव्य म्हणून वाटेल तें करण्याचा तिनें निश्चय केला होता. ती त्याच्याकडे अचल नेत्रांनीं पहात होती, परंतु, अमात्याच्या मनांत त्यावेळीं काय विचार चालले होते? आपणासमोर केवळ दिव्य सौंदर्याची पुतळीच, अशी एक तेजोमय अप्सरा उभी आहे कीं, काय असा त्याला भास होत होता.

"अमात्य महाराज, आपण मला येथें किती दिवस नजर कैदेंत ठेवाल?"

"हे चारुमूर्ति सुंदरी, तें तुझ्याच हातांत आहे. माझ्या मताला तूं रुकार दे कीं, तूं सांगशील तें दिव्य करायला हा दास तयार आहे. पण हे रमणी, तूं प्रथम अशा छद्मवेषानें कां येथें आलीस तें सांग!"

"थांबा, दूर व्हा—माझ्या परीक्षेला तुम्ही उतरल्याशिवाय ह्या देहाला मी आपणास स्पर्श करूं देणार नाहीं."

"पण प्रणयीजनाची परीक्षा तूं प्रेमांतच घेणार ना? मग अशी दूर कां?"

"महाराज, आपण असे एकदमच भडकून जाऊं नका. मी कोण, काय? याविषयीं कांहींच माहिती नसतां आपण माझे दास होण्यास तयार झालां, यावरून आपल्या चंचलमनाची मला साक्ष पटली. शिवाय पुरुषजात फक्त मतलबापुरती असते, हें मी जाणून आहें. परंतु मी जी कित्येक कोस लांबून आलें ती केवळ दुसऱ्यांच्या स्वार्थाकरितां आलें नाहीं. माझा स्वार्थ आणि माझी महत्त्वाकांक्षा फार जबर आहे."

" सुंदरी, ह्या राज्यांतील माझा अधिकार किती मोठा आहे, याचा तूं विचार केल्यास, तुझी वाटेल ती महत्त्वाकांक्षा मला पूर्ण करतां येईल हें तुझ्या लक्षांत येईल. "

" आपला अधिकार म्हणजे अमात्यपदाचा ना? म्हणून म्हणतें, आपणाकडून माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण होणें शक्य नाहीं. आणि इतक्याच करितां मी अशा वेषानें आपल्या युवराजांचा शोध करीत येथें आलें. यावरून माझी महत्त्वाकांक्षा आपल्या लक्षांत येईल. कारण आपले युवराज राज्याधिकारी आहेत. मला अनेकविध विलासांची अत्यंत आवड म्हणून माझ्या मातापित्यानें माझें नांव विलासवती ठेविलें. ह्या नांवाची सार्थकता करण्याकरितां मला राज्ञीपदाची महत्त्वाकांक्षा आहे. परंतु हें राज्ञीपद देण्याचें सामर्थ्य आपल्या बाहूंत नाहीं, अशी माझी खात्री झाली आहे. "

" विलासवती, हें तूं कशावरून म्हणतेस ? "

" कारण दुसऱ्या एका स्त्रीच्या प्रेमपाशांत बद्ध होऊन स्वतःच्या सुखाकरितां—नव्हे स्वार्थाकरितां आपल्या मार्गातील युवराजाचा कांटा काढण्यास आपण तयार झालां आहांत, इतकेंच नव्हे, तर प्रत्यक्ष राण्याच्या जीवितावरहि उठलां आहांत ! "

वज्राघात झाला! यशोधरेचें भाषण ऐकताच अमात्य काळाठिक्कर पडला ! त्याचें हृदय धडधडूं लागलें, तो जवळ जवळ ज्ञानशून्य होऊन एखाद्या भ्रमिष्ठासारखा तेथें अचल उभा राहिला. क्षणभरानें तो अडखळत म्हणाला, " पण तुला हें कसें कळलें ? "

" त्याची आतां वाच्यता नको. परंतु इतकी गोष्ट मात्र खरी कीं, ज्या स्त्रीनें स्वतःच्या सुखाकरितां ह्या सर्व गोष्टी करण्याचें योजिलें आहे आणि त्याकरितां जें साधन हातीं धरिलें आहे, तें मात्र अगदींच निर्बल आहे. "

" तें कोठलें ? "

" स्वतः आपणच ! आपणाकडून ती हें सर्व कृत्य करून घेणार आहे. "

यशोधरेच्या खोंचदार भाषणापुढें अमात्य अगदीं हतवीर्य झाला. राणी वश होतांच तो स्वतःला मोठा मुत्सद्दी, धोरणी आणि कारस्थानी असें समजत होता, परंतु यशोधरेनें त्याला आपल्या अल्पपरिचयांतच अगदीं निरुत्तर केलें. त्याच्यावर तिनें जबरदस्त शह बसविला. तो जितका कारस्थानी होता, तितकाच मनाचा भित्रा होता. राणीबरोबर त्याचें भाषण होत असतां, ह्या

त्याच्या स्वभावाचा कमकुवतपणा यशोधरेच्या तात्काळ लक्षांत आला. आणि त्याच आधारावर तिनें आपलें सर्व पुढचें कारस्थान रचलें होतें.

" अमात्य महाराज, आपण असे गोंधळून जाऊं नका! माझ्या ह्या अल्पपरिचयावरून मी जितकी महत्त्वाकांक्षी आहे, तितकीच कारस्थानी आहें, असें आपणास समजून चुकलेंच असेल. परंतु त्या बरोबर हेंहि लक्षांत ठेवा कीं, मी प्रेमाची फार दृढ आहें. माझें प्रेम राणीसारखें चंचल नाहीं. आज आपणाकडून तिच्या मनासारखी कार्यसिद्धी होऊं द्या आणि उद्यां आपणापेक्षां एखादा सुंदर पुरुष तिच्या नजरेस पडूं द्या, कीं, आपणाविषयीं सर्व प्रेम ती विसरून जाईल, हें मी खात्रीनें सांगतें. कारण मी आमचा स्त्रीस्वभाव चांगला निरिक्षण केला आहे. '

अमात्याच्या मनांत अनेक चमत्कारिक विचारांची गर्दी झाली. तिला काय उत्तर द्यावें, हेंच त्याला सुचेना. आपल्या सर्व कारस्थानाची हिला इत्थंभूत बातमी कशी लागली, हेंच त्याला कळेना. अंतकाच्या सांगण्यावरून ती त्याच दिवशीं नगरांत आली होती, असें असतांना राणीच्या अंतर्गृहांत आपण केलेले बेत एका दिवसांत हिला कसे कळले, याविषयीं तो विचार करूं लागतांच आपणापुढें उभी असलेली, कोणी तरी मंत्रविद्या जाणणारी स्त्री आहे, असें त्याला वाटूं लागलें. असे विचार त्याच्या मनांत येतांच फक्त स्वरूपाकडे पाहून अशा स्त्रीला जवळ करणें म्हणजे ' धरल्यास चावेल व टाकल्यास शापेल ' अशा प्रकारची त्याची स्थिति झाली. त्यानें पुनः तिच्या मुखाकडे पाहिलें, परंतु तें मुख सौम्य, निर्मळ आणि पूर्ण सौंदर्यशील असें त्याला दिसलें. क्षणभर त्या मुखाकडे त्याची दृष्टि अचल झाली. हळुहळू तो तिच्या मुखाची आणि राणीच्या मुखाची तुलना करूं लागला. त्यांतच त्याचें मन रमलें. समोर उभी असलेल्या विलासवतीच्या—यशोधरेच्या सौंदर्यापुढें राणीचें सौंदर्य त्याला फिकें वाटूं लागलें. नंतर तो तिच्या प्रत्येक अवयवाची चांचणी करूं लागला. त्या प्रत्येकात राणी मागें पडली. तेव्हां त्याचें मन बदललें. ही रमणीय सुंदरी आपणांस प्राप्त व्हावी, असें त्याला शेवटीं वाटूं लागलें.

" महाराज, आपण असे स्तब्ध कां राहिलां ? "

" तुझ्या या अद्वितीय सामर्थ्यापुढें माझे तेज निस्तेज पडलें ! "

" असं जर आपणास वाटत असेल, तर मग मला येथून जाऊं द्या.

माझा उपयोग करून घेणारा आणि माझ्या गुणाची योग्य पारख करून घेणारा योग्य वर ह्या नगरांत नाहीं, असेंच म्हणावें लागतें ! "

" विलासवती, असें कां बरें म्हणतेस ? तुझ्या गुणांचा उपयोग करून घ्यावयास मी तयार आहें, पण माझ्या प्रेमाव्यतिरिक्त जर त्याचा मोबदला इच्छिशील तर मात्र, तूं म्हणतेस त्याप्रमाणें मी असमर्थ आहें. "

" ठीक आहे. मला आपल्या प्रेमाशिवाय दुसरा कोठलाहि मोबदला नको, परंतु माझी महत्त्वाकांक्षा पूर्ण होईपर्यंत आपण मला सहाय्य केलें पाहिजे. "

" ह्या गोष्टीला माझी केव्हांहि संमति आहे. मी काय करावें अशी तुझी इच्छा आहे ? "

" उदईक माझ्या गुरुजींचा धन्वंतरी ह्या नात्यानें राजवाड्यांत प्रवेश झाला पाहिजे. म्हणजे ते तुमच्या इच्छेप्रमाणें कोणासही संशय न येईल अशी औषध योजना करतील. आणि युवराजांची मी स्वतःच व्यवस्था करतें; मात्र माझ्या हातांत अधिकार पाहिजे. "

" आतां तुला जास्त अधिकार काय देऊं ? विलासवती, आतां हा अनंगसेन अमात्य तुझा दास आहे. पण विलासवती—"

" असे अधीर होऊं नका. ह्या बिकट कार्याची पूर्तता होईपर्यंत मी आपल्या प्रेमाची कसोटी पाहीन आणि ठरल्याप्रमाणें मी आपणास अनुकूल परिस्थिति आणून दिल्यावर आपण मला राज्ञीपदावर बसवावें आणि मग आपण माझ्या प्रेमाची याचना करावी. " असें म्हणून यशोधरेनें आपला पदर सांवरिला आणि अमात्याकडे हास्य मुद्रेनें अवलोकन केलें. त्याबरोबर तो प्रेमविव्हळ होऊन म्हणाला, " पण विलासवती—" पुनः त्यानें आपलें मन आवरलें !

परंतु अमात्याची स्थिति यशोधरेच्या लक्ष्यांत आल्यावांचून राहिली नाहीं. अमात्य आतां आपल्या हातांतील एक बाहुलें बनलें, अशी तिची पूर्वींच खात्री होऊन चुकली. ती हांसत हांसत म्हणाली, " महाराज, प्रेमगिरीवरील अत्युच्च शिखरावर असलेल्या सौख्यवृक्षाच्या शीतल छायेखालीं बसण्यापूर्वी अशा प्रकारच्या कारस्थानांचा बिकट मार्ग आक्रमण केला असतां, त्या प्रेमसौख्याचें रहस्य जास्त कळतं ! आतांपर्यंत आपली परस्परांची स्वभावओळख झाली. आतां मनमीलनाकरितां इतका अवधि अवश्य आहे. आणि तें होईपर्यंत आपल्या ह्या हातीं घेतलेल्या कारस्थानांची पूर्तताहि होईल, अशी माझी खात्री आहे. "

" होय विलासवती, तूं म्हणतेस तें अक्षरशः खरें आहे. आतां तूं जी ही प्रेमाची मीमांसा केलीस त्यावरून प्रेमाच्या उच्च बिंदूची मला चांगलीच कल्पना झाली. प्रेम प्रेम म्हणून म्हणतात, तें प्रेम रहस्यमय असेल तरच खरें असें आतां मला वाटूं लागलें आहे. "

" बरं महाराज, आतां फार रात्र झाली, करितां आपला सेवक पाठवून माझ्या गुरुजींना येथें बोलावून घ्या. ते माझी सारखी मार्ग प्रतिक्षा करीत असतील. मला ही जागा पसंत आहे, कारण, आपल्या पुढल्या कारस्थानाला हें स्थळ अगदीं योग्य आहे. "

. " जशी तुझी इच्छा. मी तुमची येथेंच योग्य व्यवस्था लावून देतों. पण विलासवती, तूं कोठून आलीस ? तुझ्या बरोबर तो वृद्ध आहे तो कोण ? तुमचा देश—"

" महाराज, ती हकीकत फार मोठी आहे. पुनः केव्हां तरी मी स्वतःविषयीं आपणास जास्त परिचय करून देईन. "

" ठीक आहे. पण मी आतां—जाऊं—"

" होय " अशा अर्थानें हास्यमुख करून यशोधरेनें त्यास संमति दिली. तरी देखील त्याचें पाऊल उचलेना ! एखाद्या चुंबकानें आकर्षिल्याप्रमाणें तो पुनः पुनः यशोधरेच्या मुखाकडे पहात राहिला.

" माझ्या गुरुजीना प्रथम पाठवून द्या. तेथें ते व्यर्थ चिंता करीत असतील. आणि ह्यापुढें माझें नांव ' विलाससेन ' आहे हें लक्षांत ठेवा. जा—आतां रात्र फार झाली. "

अमात्य निघून गेल्यावर यशोधरा इतका वेळ झालेल्या गोष्टीचा विचार करीत राहिली. अमात्य आणि राणी ह्या दोन व्यक्तिविषयीं जेव्हां तिच्या मनांत विचार आले, तेव्हां पुनः तिचें सर्वांग थरारलें. अशा उलट्या अंतःकरणाचीं महान् पातकीं माणसें जगांत मोठ्या सुखानें ऐषआराम उपभोगितात, याचें तिला आश्चर्य वाटलें. अशा ह्या भयंकर अपराध्यांना त्या न्यायी परमेश्वरानें कोठलें प्रायश्चित्त नेमलें असेल, त्याचा तिनें किती वेळपर्यंत तरी सारखा विचार केला. शेवटीं तिच्या सूक्ष्म मनानें तिच्या प्रश्नाला उत्तर दिलें. आणि तें उत्तर म्हणजे अमात्य आणि राणी यांना देहान्त प्रायश्चित्त !

———

# कारस्थानांचा स्फोट ४

" माझ्या प्रकृतींत अलीकडे वरचेवर अशी विकृति होण्याचें काय कारण तें आपण सांगूं शकाल काय ? "

" महाराज, आपली रोगचिकित्सा उत्तम प्रकारें केल्याशिवाय तें मला सांगतां येणार नाहीं. करितां आपण थोडा वेळ थांबा. आपले राजवैद्य आतां इतक्यात येतील. त्यांच्या समक्ष आपली प्रकृति पाहून मी आपल्या रोगाचें खरें कारण सांगतों."

त्यावेळीं सर्व राजप्रासादांत एकच गर्दी उडाली होती. महाराजांना निरोगी करण्याकरितां एक दूरदेशचा प्रख्यात धन्वंतरी आला आहे, ही बातमी सकाळपासून सर्वतोमुखीं पसरली होती. यशोधरेला कबूल केल्याप्रमाणें अमात्यानें आपली कामगिरी योग्य प्रकारें बजाविली. प्रसिद्ध धन्वंतरी आणि त्याचा शिष्य ह्या नवीन घेतलेल्या वेषानें चारण आणि यशोधरा येण्यापूर्वी महाराजांच्या शयनमंदिरांत त्यांना पहाण्याकरितां बरीच मंडळी जमली होती. राण्याच्या उश्याजवळ दामिनी राणी बसली होती. युवराज आपल्या पित्याच्या पायांजवळ आणि कुमार कमलसिंह आपल्या मातेजवळ उभे होते. शिवाय पलीकडे सेनानायक आणि न्यायशास्त्री आदिकरून मुत्सद्दी मंडळी उभी होती. थोडया वेळाने अमात्य आंत आला. त्याच्या मागून वेषधारी धन्वंतरी-वृद्ध मेघावी चारण आणि पुरुषवेष घेतलेली यशोधरा-विलाससेन आंत आले. राणीची दृष्टि विलाससेनाकडे जातांच त्याची रेखलेली मूर्ति पाहून ती वेड्यासारखी त्याच्याच मुखाकडे पहात राहिली. विलाससेनाच्या तें लक्षांत आलें परंतु त्यानें मुद्दाम राणीकडे पाहिलें नाहीं. थोड्या वेळानें धन्वंतरी राण्याजवळ गेला, तेव्हां राण्यानें त्याला पहिला प्रश्न केला. तो प्रकरणाच्या सुरवातीला दिलाच आहे.

" राजवैद्य अद्यापि कां आले नाहींत ? " अमात्यानें सेवकाकडे वळून विचारलें. इतक्यांत राजवैद्य आत आला. तेव्हां पूर्वी ठरल्याप्रमाणें धन्वंतरी राण्याच्या जवळ जाऊन त्याची प्रकृति तपासूं लागला. तितक्या अवधींत विलाससेन युवराजाजवळ जाऊन उभा राहिला. आपणाकडे राणीचें लक्ष्य आहे हें तो जाणून होता, तरी संधी साधून त्यानें हळूच युवराजाच्या हातांत एक पत्र दिलें आणि डोळ्यांनीं त्याला खूण केली.

" नाडीपरीक्षेवरून मी खात्रीपूर्वक असें सांगतों कीं, आपल्या वैद्यराजांनीं आपणास जीं औषधें दिलीं, तीं उत्तम आणि गुणकारक असून त्यांचा आपल्या शरीरावर अंमल बसूं लागला आहे. वैद्यमहाराजांनीं आपल्या रोगाची केलेली चिकित्सा बरोबर आहे आणि औषध योजनाही उत्तम आहे.

" त्यांत मी विशेष तें काय केलें ? मी माझ्या अल्पमतीप्रमाणें चिकित्सा केली आणि औषधयोजना केली. बाकी हा सर्व महाराजांच्याच चरणांचा प्रताप ! " राजवैद्य विशेष खुलून म्हणाला.

" हा आपला लीनपणा योग्यच आहे. " असें म्हणून अमात्याकडे वळून धन्वंतरी चारण म्हणाला, "अमात्यराज, मला आतां महाराजांची प्रकृति विशेष सूक्ष्मरीतीनें अवलोकन करणें आहे. करितां आपण सर्व मंडळी येथून एक प्रहर बाहेर जावें. आणि मंदिराच्या जवळपास बिलकुल गलबला होऊं देऊं नये. "

राणी आणि कुमार कमलसिंह यांच्याशिवाय सर्वजण हळूहळू बाहेर गेले. तेव्हां विलाससेन राणीजवळ जाऊन म्हणाला, " कुमाराला घेऊन राणी महाराजानीं आता आपल्या महालात जावें. "

" पण महाराजांच्या जवळून मला देखील गेलेंच पाहिजे का ? "

" होय. गुरुजींची तशी इच्छा आहे. आपण आतां जावें. आणि गुरुजी काय सांगतात तें आपणांस कळविण्यास कोणी तरी जासूद येईल. "

" मी जातें. पण आपणच कळविण्यास आलांत तर—! "

" राणी महाराजाची तशी आज्ञा असल्यास मीच येईन. "

" माझी आज्ञा नाहीं पण आपणच माझ्या महालांत यावें अशी माझी इच्छा आहे. "

ही इच्छा दर्शवितांना राणीनें नेत्रचापल्यानें, हास्य वदनानें आणि अंगविक्षेपानें आपला मनोदय इतक्या चातुर्यानें प्रकट केला कीं, विलाससेनहि क्षणभर चकित झाला. एकापेक्षां जास्त सुंदर वस्तु दृष्टीस पडतांच चंचलमनाची कशी स्थिति होते, त्याचें प्रत्यक्ष उदाहरण त्याला पहावयास सांपडलें. त्यानेंहि राणीला तितक्याच गूढ रीतीनें ' मीच आपल्या महालांत येईन, ' असें उत्तर दिलें. थोड्या वेळानें राणी आपल्या कुमाराचा हात धरून बाहेर गेली. परंतु जातांजातांना तिनें दोन वेळां मागें वळून विलाससेनाकडे पाहिलेंच !

आतां महालांत महाराज, वैद्य, धन्वंतरी आणि विलाससेन असे चौघेच राहिले.

" मी आतां रोगपरिक्षा आणि त्याची चिकित्सा काय करतों त्याकडे महाराजांनीं लक्ष्य द्यावें " असें म्हणून धन्वंतरी चारणानें विलाससेनास खूण केली. त्याबरोबर त्यानें कंबरे सभोवतीं अडकविलेल्या म्यानांतून आपली तीक्ष्ण तरवार सरकन् बाहेर काढिली आणि एकाद्या व्याघ्राप्रमाणें वैद्याच्या अंगावर एकदम उडी टाकिली !

" दुष्टा ! तुला जर आपल्या जीविताची आशा असेल तर खरें सांग ! " विलाससेन गर्जना करीत म्हणाला, " बोल—तूं महाराजांवर विषप्रयोग करीत आहेस कीं नाहीं ? "

" म–म—म—महाराज—मीमी—" राजवैद्याची बोबडी वळली. त्याची जिव्हा अडखळली. भयातिशयानें त्याचा शब्दोच्चार होईना.

" तरुणा, हा काय प्रकार आहे ? " आश्चर्यचकित होऊन महाराजांनीं विचारलें.

" महाराज, सर्व राजप्रासादांत भयंकर कारस्थान सुरू आहे. आपणावर आज बरेच दिवसांपासून कोणासहि संशय न येईल अशा रीतीनें विषप्रयोग करण्यांत येत आहे. "

" वैद्यराज, मी हें काय ऐकतों आहें ? हा तरुण सांगतो ही गोष्ट खरी काय ? "

" म–म–म–महाराज, मी पूर्ण अपराधी आहें. मला क्षमा करा. ही दुष्टबुद्धि माझी नाहीं—"

" मग हें भयंकर धाडस—प्रत्यक्ष मला विषप्रयोग तूं कोणाच्या बुद्धीनें केलास ? सांग—त्या चांडाळाचें नांव सांग—"

" आपल्या अमात्याच्या—"

" काय अमात्याच्या ?—अनंगसेन इतका नीच आहे काय ? "

" महाराज, त्याच्या नीचपणाची मर्यादा ह्याहीपेक्षां फार दूर जाऊन पोंचली आहे—" मध्येंच विलाससेन म्हणाला.

" म्हणजे ! तरुणा, तूं काय म्हणतोस तें माझ्या लक्ष्यांत नाहीं आलें ? "

" त्याच्या नीचपणाची मर्यादा आपल्या अंतर्गृहांत जाऊन पोंचली आहे."

" काय म्हणतोस ? इतका तो दुष्ट आहे काय ? "

" होय महाराज. त्याच्या दुष्टपणाची आपणास कल्पना देखील करतां येणार नाहीं. त्याच्या दुष्टपणाची मजल आपला भावी वृक्ष छेदून टाकण्यापर्यंत देखील आली आहे. "

" हें मी काय ऐकतों! अरेरे! माझें मस्तक भ्रमण करूं लागलें!" असें म्हणून राणा आपल्या शय्येवर निचेष्टित पडला!

तात्काळ विलाससेनानें राण्याच्या नेत्रांना पाणी लावून त्यास सावध केलें. आणि बाजूला भीतीनें गांगरून गेलेल्या वैद्याकडे वळून तो म्हणाला, " तुम्हाला जर तुमच्या जीविताची, तुमच्या मुलाबाळांची आणि तुमच्या कुटुंबाची कांहीं आशा असेल, तर आठ दिवसांच्या आंत आपल्या शत्रूचा सूड उगवितां येईल इतकी महाराजांची प्रकृति निरोगी झाली पाहिजे. बोला—तुमच्याकडून अशी औषध योजना होईल कीं नाहीं तें सांगा! नाहीं तर आज सूर्यास्त होण्यापूर्वी तुमच्या जीवितावर व मुलाबाळांसह तुमच्या घरादारावर नांगर फिरविला जाईल."

" हो. पण महाराजांचें अभय पाहिजे—"

" जा—आतांपासूनच औषधयोजनेला सुरवात करा." असें म्हणून विलाससेन चारणाकडे वळून पुढें म्हणाला, " गुरुजी, आतांपासून हे राजवैद्य आपले नजरकैदी आहेत. यांना कोणाला भेटूं देऊं नका. आणि यांच्या औषधयोजनेकडे आपलें पूर्ण लक्ष्य असूं द्या. जा—परंतु आपण ह्या द्वारानें जाऊं नका. तेथें मंडळी असेल."

" हे तरुणवीरा तूं कोण आहेस?" चारण आणि वैद्य निघून गेल्यावर क्षणभरानें राण्यानें खोल आवाजांत विचारलें.

" महाराज, आतां आपण पूर्ण विश्रांति घ्या. आपल्या अंगांत बिलकूल शक्ति नाहीं. मी आतां आपल्या चरणाजवळच आहें, तेव्हां लवकरच एकान्त पाहून महाराजांना माझी ओळख करून देईन. परंतु महाराजापाशीं माझी एक नम्र विनंति आहे." हात जोडून विलाससेन ममतेनें म्हणाला, " महाराज पूर्ववत् शक्तिमान् होईपर्यंत ह्या कारस्थानाची महाराजांनीं कोणालाच ओळख देऊं नये.

" परंतु तोंपर्यंत ह्या दुष्ट अमात्याची—"

" तोंपर्यंत त्याच्या पापाचा घडा पूर्णपणें भरेल. आणि तो भरलेला मी महाराजांस समक्ष दाखवीन. तो स्वनेत्रांनीं पाहून, स्वतःची खात्री करून घेऊन महाराजांनीं स्वहस्तानें दुष्टांना त्यांच्या पापाचें योग्य तें प्रायश्चित्त द्यावें."

राणा क्षणभर स्तब्ध राहिला. आमच्या छद्मवेषी यशोधरेवर त्याचा पूर्ण विश्वास बसला. क्षणापूर्वी त्याचें मन जरी अत्यंत संतप्त झालें होतें, तरी तें

आतां पूर्ण शांत झालें. त्यानें मोठ्या कृतज्ञतेनें यशोधरेचा कोमल हात आपल्या हातात घेऊन दाबला आणि सद्गदित स्वरानें राणा म्हणाला, हे सद्गुणी तरुण वीरा, आजच्या तुझ्या ह्या कृतीनें मी तुझा आजन्म ऋणी झालों आहें. मी तुला केव्हांहि विसरणार नाहीं!"

थोडा वेळ त्याच्या गोष्टी झाल्यावर श्रमामुळें राण्याला निद्रा येऊं लागली. तें पाहून यशोधरा म्हणाली, "महाराज, आतां थोड्या वेळानें माझे गुरुजी आपल्या वैद्यराजास घेऊन येतील. ते आपणांस जें औषध देतील तें आपण प्रसन्न चित्तानें घ्यावें. इतक्यांत मी येतों." असें म्हणून यशोधरा शयन मंदिराच्या बाहेर आली. तेथें सर्व मंडळी तिष्ठत उभी राहिली होती. कारण महाराजांच्या प्रकृतीचें कसें काय आहे, हें कळण्याविषयीं प्रत्येकजण उत्सुक झाला होता. त्या सर्वांना महाराजांची प्रकृति लवकरच सुधारेल असें सांगून यशोधरा अमात्याकडे वळली. आणि त्याला आपल्या मागून येण्याची तिनें खूण केली.

---

## साक्ष पटविली ५

"विलासवती, तुला ह्या विलाससेनाच्या पुरुषवेषांत पाहून मला तुझा मत्सर उत्पन्न झाला." महालांत आल्यावर अमात्य यशोधरेला म्हणाला, "मला वाटतं, तुझ्या गुरुजींना म्हणजे धन्वंतरी याना पाहाण्याकरितां ती मघां महालात मंडळी जमली नसून केवळ तुलाच पहाण्याकरितां ती जमली होती. कारण तूं स्वतः प्रत्येकाच्या नेत्रांचें केंद्र बनली होतीस."

"असं का?" हांसत हांसत यशोधरा म्हणाली, "पण अमात्य महाराज मी काल म्हटल्याप्रमाणें माझ्या भाषणाची आपणास सत्यता दाखविण्याकरितां मी आपणांस येथें आणलें आहें. मी जे आतां आपणास दाखविणार आहें, तें आपण शांत चित्तानें पहावें. चला मजबरोबर या—" असें म्हणून यशोधरेनें अमात्याला आंतल्या दालनांत नेलें आणि आधल्या दिवशीं ज्या गुप्तद्वारांतून त्यांच्या गुप्त कारस्थानांचा भेद काढला होता त्या भिंतीजवळ आणून उभे केले.

" विलासवती, येथें काय आहे ? "

" क्षणभर थांबा म्हणजे काय आहे तें दिसेल." असें म्हणून तिनें भिंतीची कळ दाबली. त्याबरोबर भिंत दुभंग होऊन आंतील चोरद्वार दिसूं लागलें. तें पाहून अमात्य आश्चर्यचकित झाला. आजपर्यंत कैक प्रसंगीं तो त्या दालनांत गेला होता परंतु त्या ठिकाणीं एकादी गुप्तवाट असेल असें त्याच्या स्वप्नींहि नव्हतें.

" विलासवती, येथें गुप्तमार्ग आहे हें तुला केव्हां आणि कसें माहित झालें ? '

" अमात्यमहाराज, जो मनुष्य आपले नेत्र उघडे ठेवून ह्या ईशनिर्मित अनेक चमत्कृतिजन्य जगांत वावरतो, त्याला नैसर्गिक लीलांचें रहस्य सहज दिसतें मग हें तर काय ? बोलून चालून ही मानवी कृति ! " असें म्हणून तिनें गुप्तद्वार उघडलें. " आतां आपण येथेंच स्तब्ध बसून रहा आणि ह्या पलीकडील राणी दामिनीच्या महालांत काय प्रकार होतो तो शांत चित्तानें अवलोकन करा. "

अमात्याला तेथें बसवून विलाससेन ऊर्फ यशोधरा तेथून निघून गेली. अमात्य तेथेंच तिच्या चातुर्याचा विचार करीत बसून राहिला. विलासवती ही मोठी धूर्त व कारस्थानी तरुणी आहे; शिवाय ती सौंदर्यवान आहे, तेव्हां अशी स्त्री आपल्यासारख्या अमात्यपदावर असलेल्या व पुढें मागें याहिपेक्षां उच्चपदावर आरूढ होणाऱ्या कारस्थानी पुरुषास सर्वथैव योग्य आहे असे विचार त्याच्या मनांत येतात, तोंच पलीकडे कांहींतरी आवाज झाल्याचा त्याला भास झाला. त्यानें किंचित् दरवाजा उघडून आंत डोकावून पाहिलें. तों मंचकावर राणी निजलेली त्याच्या दृष्टीस पडली. तिनें नेसलेल्या भरजरी शालूच्या निऱ्या मंचकाखालीं लोळत होत्या. उजवा हात मानेखालीं घेतल्या-मुळें तिचा पदर मागें पडला होता. त्या योगानें तिच्या स्तनभागाला आपल्या उन्नततेचें प्रदर्शन करण्यास चांगला अवसर सांपडला होता. बाजूला चौरंगावर तांबूल साहित्याचें ताट असून त्याला टेकून वीणा पडली होती. तिला अशा मोहक स्थितींत पाहतांच अमात्याचें मन चलबिचल होऊं लागलें. तो आपल्या छपलेल्या जागेवरून तिच्याकडे एकाग्रतेनें पहात राहिला. आपणास अशा ठिकाणीं लपून बसविण्यांत विलासवतीचा काय उद्देश असावा, हे विचार त्याच्या मनांत येतात न येतात तों महालाच्या दरवाजांबाहेर राणीच्या आवडत्या परिचारिकेचे शब्द त्याला ऐकूं आले.

"राणी सरकार आपलाच मार्गप्रतीक्षा करीत आहेत. आपण येतांच आपणांस आंत सोडून देण्याची त्यांची मला आज्ञा आहे."

"महाराजांचें प्रकृतिमान कसें आहे हें समजून घेण्यास त्यांचें मन उत्सुक झालें आहे, हें मी जाणून आहें." असें म्हणून यशोधरा आंत आली. तिनें एकवेळ सभोंवार पाहून मंचकावर निजलेल्या राणीकडे पाहिलें. तिला तशा स्थितींत पाहून यशोधरेच्या चर्येवर हास्याची छटा दिसूं लागली. राणी निजली होती. परंतु ती खरी निद्रा नसून तिनें निद्रेचें मिष केलें आहे, हें तेव्हांच तिच्या लक्षांत आलें. आणि ह्या पुढें काय प्रकार होणार हेंहि ती जाणून होती. कारण विषयी स्त्रियांचे सर्व डावपेंच ती पूर्णपणें जाणत होती.

"राणीसरकार—देवी दामिनी—" यशोधरा मंचकाजवळ जाऊन म्हणाली.

परंतु तिच्या प्रश्नाला उत्तर मिळालें नाहीं. पुनः तिनें किंचित् मोठ्यानें हांक मारिली. तरीही उत्तर नाहीं. तेव्हां तिनें आपल्या कंबरे सभोंवतीं अडकविलेल्या तरवारीचें म्यान दोनचार वेळां मंचकावर आपटून त्याचा ध्वनि केला. तरी देखील राणीची कांहींच हालचाल दिसेना. तें पाहून यशोधरा मंचकाच्या अगदीं जवळ जाऊन तिनें राणीच्या बाहूला स्पर्श केला. त्याबरोबर एकदम दचकून राणी उठली आणि 'महाराज, मला सोडवा, महाराज, मला सोडवा' असें म्हणत भयाभीतवृत्तीनें तिनें एकदम यशोधरेच्या गळ्याला मिठी मारिली.

हा प्रकार पाहून यशोधरा आश्चर्यचकित झाली. राणी एकदम आपल्या गळ्याला मिठी मारण्यापर्यंत मजल आणील असें तिला वाटलें नव्हतें. परंतु मदनशरांनीं विव्हल झालेल्या राणीच्या मनाची तिला काय कल्पना? राणीनें तिला विलाससेनाच्या वेषांत पाहतांच तिचें मन त्याच्यावर बसलें. तें इतकें कीं ती आपल्या महालांत येऊन बसली परंतु तितक्या अवधींत कामविकारांनीं तिला अगदीं जर्जर करून टाकलें. आपण एकदम आपलें मन उघड कसें करावें? आणि यदाकदाचित् आपण आपलें मन उघड केलें तरी तो तरुण आपणास वळेल काय? कदाचित् तो आपणास झिडकारूनहि टाकील असें वाटून तिनें झोपेचें मिष करण्याचें योजून पुढला सर्व व्यूह चांगला रचून ठेविला. प्रथम त्याच्या गळ्याला मिठी मारून आपल्या अंतःकरणाचा दाह कमी करावयाचा! मग जसा प्रसंग येईल त्याप्रमाणें त्याला वश करण्याचा

तिनें निश्चय केला आणि वर लिहिल्याप्रमाणें यशोधरेनें तिला स्पर्श करतांच तिनें आपल्या मनाप्रमाणें तिला पुरुष समजून दृढ आलिंगन तर दिलेंच !

" पण मी हें काय केलं ? " यशोधरेच्या गळयाची मिठी सोडून कंपित स्वरानें आश्चर्यचकित झालेल्या मुद्रेनें त्या छद्मवेषी यशोधरेच्या मुखाकडे पहात राणी म्हणाली.

" देवी अशा भीतिव्याकुळ कां झाल्या ? " राणीच्या स्थितीकडे दुर्लक्ष करून यशोधरा म्हणाली, " ह्या सेवकाला आज्ञा होईल तर राणीमहाराजांचं कोठलंहि बिकट कार्य करण्यास हा दास स्वतःला भाग्यवान समजेल. "

" पण माझ्याविषयीं आपला वाईट ग्रह तर झाला नाहीं ना ! " यशोधरेच्या मुखाकडे भेदक दृष्टीनें पहात राणीनें विचारलें, " मी आपलीच मार्गप्रतिक्षा करीत असतां मला किंचित् डोळा लागला. त्यांत मला— अगबाई—" असें म्हणून राणीनें भीतीचे शहारे आल्यासारखे दाखविलें, " एक भयंकर स्वप्न पडलं. तेव्हां मी भीतीनें महाराजच समजून आपल्या गळयाला—पण तुम्ही मला काय म्हणाल ? तुम्ही ह्या देशांत अगदीं अपरिचित असून पहिल्याच भेटीला माझ्या मनाचा हा कमकुवतपणा तुमच्या दृष्टीस पडला, त्यामुळें तुमचं काय मत झालें असेल ? "

" राणीमहाराजांनीं त्याबद्दल विषाद वाटूं देऊं नये. हा दास आपला आहे. "

" पण माझ्या ह्या कृतीमुळें ह्या पहिल्याच भेटींत मी आपल्या मनांतून उतरलें तर नाहीं ना ? " राणी प्रत्येक शब्द मनांत योजून बोलत होती. परंतु तिच्या भाषणांतील गूढार्थ यशोधरेच्या लक्षांत येत नव्हता असें नाहीं. आतां राणीनें आपलें मन उघड करावें अशी तिची इच्छा होती कारण तिच्या चंचलमनाची साक्ष पलीकडे बसलेल्या अमात्याला तिला पटवावयाची होती. क्षणभरानें राणी तिच्या मुखाकडे तिरक्या दृष्टीनें पहात म्हणाली, " सांगाना ? मी आपल्या मनांतून उतरलें तर नाहीं ना ?—प—ण आपणास कोठल्या नांवानें जन भजतें ? "

" मला विलाससेन असं म्हणतात. पण ह्या नांवाला भक्त मिळण्याइतका हा गरीब दास अद्यापि भाग्यवान् नाहीं. "

" अशा हृदयाकर्षक सुंदर नांवाला भक्त नाहींत असं कसं म्हणतां ? खरंच विलाससेन, आपलं नांव जितकं गोड आहे तितकंच आपलं हृदयहि

शांतिदायक आहे, अशी माझी थोड्या परिचयांत खात्रीदेखील झाली आहे."

"आपली खात्री झाली! ती कशी?"

"थोड्या वेळापूर्वी मी आपल्या गळ्याला मिठी घातली त्या वेळीं क्षणभरच माझ्या भडकलेल्या डोक्याला आपल्या हृदयाचा स्पर्श झाला पण त्यामुळें माझें डोकें शांत झालें. अहाहा! त्या क्षणभर अनुभविलेल्या प्रसंगाची आठवण होतांच माझ्या अंगावर पहा कसे शहारे येतात!"

"देवी, एकूण हें माझं हृदय कठीण आहे तर!"

"छे, छे! विलाससेन, असं कसं उलट म्हणतां? पण मी आपल्या मनांतून उतरलें तर नाहीं ना?—सांगा—मला आपण—मजवर आपलं—" ओंठापर्यंत आलेला आपला अंतस्थ हेतू प्रगट करण्यास उतावीळ झालेलें राणीचें मन गोंधळून गेलें.

"मला माझ्या मर्यादेचें अतिक्रमण करावयाचें नसतें तर राणीसरकारास मी त्यांच्या प्रश्नाचें उत्तर दिलें असतें—"

"द्या—विलाससेन—द्याना उत्तर! मला तुमच्या उत्तराचा राग नाहीं येणार."

"इतकं अभय असल्यावर मग काय?" यशोधरेनें राणीकडे प्रेममय दृष्टीनें पहात उत्तर दिलें, "आपल्या मनांत जी भावना उद्भवली आहे, तिचा प्रतिध्वनि ह्या अंतःकरणांत निघाला आहे इतकें सांगितलें म्हणजे..."

"पण खरं का हें विलाससेन! मग—" पुढें होऊन राणीनें यशोधरेचा हात धरला, "मग मला माझ्या मनाच्या कमकुवतपणाबद्दल लाजण्याचें कांहीं कारणच नाहीं."

"अर्थात् नाहीं." यशोधरेनें तिच्या कंबरे सभोंवती हात टाकून उत्तर दिलें. इतक्यांत दरवाजा वाजला. त्याबरोबर यशोधरा दूर झाली. थोड्या वेळानें प्रमदा आंत आली आणि राणीला प्रणाम करून म्हणाली, "महाराजांकडून सेवक आला आहे—"

"पण विलाससेन महाराजांची प्रकृति कशी आहे त्याविषयीं तुम्ही अद्यापि कांहींच सांगितलें नाहीं हें कसें?"

"महाराजांची प्रकृति लवकर सुधारेल."

"अहाहा! हे आश्वासनपर शब्द ऐकून मला कितीतरी आनंद झाला

म्हणून सांगूं ?" कृत्रिम आनंद दर्शवून राणी म्हणाली, "बरं प्रमदे, महाराजांच्या सेवकानें काय निरोप आणला आहे ?"

"आपणांस महाराजानीं कुमाराला घेऊन मंदिरांत बोलाविलें आहे."

"ठीक आहे. जा—तूं कुमाराला येथें घेऊन ये." परिचारिका निघून गेली असें पाहून राणी यशोधरेजवळ जाऊन म्हणाली, विलाससेन, आपण आपल्या नांवाची साक्ष मला केव्हां बरें पटवाल ? आजपासून आपण माझे पाहुणे असं समजून—"

"दामिनी, हा दास आतां तुझ्या सेवेला सदैव तत्पर राहील. पण थोडे दिवस थांब. मी महाराजांची पूर्ण मर्जी संपादन करून तुझ्या अंतर्गृहांतच माझी नेमणूक करून घेईन."

राणीची समजूत पटली. आणि यशोधरेला तेंच पाहिजे होतें. अमात्याजवळ बोलल्याप्रमाणें स्त्रीस्वभाव चंचल असतो त्याची तिला फक्त साक्ष पटवून द्यावयाची होती. आणि इतक्याच करितां तिनें राणीबरोबर इतका वेळ भाषण केलें. परंतु हा तिचा अंतस्थ हेतु राणीला काय माहित ? आज आपणास एका नवीन सुंदर विलासी पुरुषाची प्राप्ति झाली, ह्या आनंदांत ती गढून गेली होती. परंतु त्याचा परिणाम किती भयंकर होणार आहे. याची तिला त्यावेळीं थोडी तरी कल्पना झाली असेल काय ? त्याचप्रमाणें आपण ज्याला विलासी पुरुष समजतों, तो पुरुष नसून आपल्या सारखीच ती एक स्त्री आहे, अशी तरी तिला शंका आली काय ?—नाहीं.

थोड्या वेळानें कुमार कमलसिंहाला घेऊन प्रमदा आंत आली. तेव्हां यशोधरेला बरेंच समाधान झाल्यासारखें दिसलें. राणीच्या क्षणिक सहवासाचा तिला अगदीं वीट आला होता. केवळ आपली भूमिका वठविण्याकरितांच तिनें राणीबरोबर प्रेमवचनें केलीं. असो. कुमार आंत येतांच महाराजांकडे जाण्यास राणी सिद्ध झाली, तें पाहून यशोधरा म्हणाली, "देवी, आतां आपली महाराजांच्या चरणाजवळ लवकरच भेट होईल, तर तोंपर्यंत मी आपली रजा घेतों." असें म्हणून यशोधरेनें मान लववून राणीला प्रणाम केला. राणीनेंहि तिला हास्य मुद्रेनें आपली संमति दिली.

यशोधरा राणीमहालांतून बाहेर आली. त्या दूषित हवेंतून बाहेर येतांच तिला आनंद झाला. ती आतां संकेतस्थळीं बसवून ठेविलेल्या अमात्याला भेटण्याकरितां पलीकडील महालांत जाणार इतक्यांत समोरून येणाऱ्या एका

तरुणाकडे तिची दृष्टि गेली. त्या तरुणाच्या चालण्याच्या रोंखावरून त्याला आपणासच भेटावयाचें आहे असें तिला वाटलें. ती क्षणभर उभी राहिली. आणि त्याची सतेज मुद्रा, रेखलेले अवयव आणि चालण्याची ऐट पाहून ती त्या तरुणाकडे निश्चल दृष्टीनें पहात राहिली. क्षणभरानें तो तरुण तिच्या जवळून पुढें गेला. परंतु जातां जातांना ' दोन प्रहर रात्रीं राजप्रासादाच्या दक्षिण उद्यानांत भेटा,' हे त्यानें उच्चारलेले शब्द तिला ऐकूं आले.

---

## कंकण संदेश ६

' आपल्या राजतेजाच्या कसोटीची वेळ जवळ आली आहे; कारण एक असहाय राजनंदिनी दुर्धर प्रसंगांत सांपडून आपल्या विजयी कराच्या सहाय्याची याचना करीत आहे. विशेष भेटी अंति. करितां वेळ ठरवा आणि एखाद्या संकेत स्थळीं भेटा. '

राजपुत्र अमरसिंहानें हें पत्र कितीतरी वेळां वाचलें. परंतु त्याला कांहींच बोध होईना. आपणास पत्र देणारा हा तरुण कोण असावा ? तो धन्वंतरी बरोबर आला आहे, आणि धन्वंतरी हा अमात्यानें आणला आहे तेव्हां त्याच्यावर कितपत विश्वास ठेवावा, हें त्याला गूढ पडलें. शेवटीं आपल्या मित्राचा सल्ला घेण्याचा विचार करून त्यानें सेवकाला हांक मारिली आणि सरदारपुत्र वसंतविजयाला घेऊन येण्याची आज्ञा केली. थोड्या वेळानें वसंतविजय आला. तेव्हां त्याच्यापुढें तें पत्र करून राजपुत्र म्हणाला, " मित्रा, ह्या पत्रापासून तुला काय बोध होतो ? "

" हें पत्र कोणी दिलें ? " विचार करीत वसंतविजयानें विचारलें.

" आज अमात्यानें राणाजींची प्रकृति दाखविण्याकरितां एक धन्वंतरी राजप्रासादांत आणला आहे तो तुला माहित असेलच ! त्याच्याबरोबर एक तरुण आला आहे. त्यानें हें पत्र मोठ्या सावधगिरीनें सर्वांची दृष्टि चुकवून महाराजांच्या शय्येजवळ माझ्या हातीं दिलें. "

" मग आपण त्यानें लिहिल्याप्रमाणें संकेतस्थळ योजून वेळ ठरवूं आणि त्याची भेट घेऊं. "

" परंतु तो अमात्यानें आणलेल्या धन्वंतऱ्याबरोबर आलेला आहे हे तूं विसरलास वाटतं ?"

" एकूण युवराज, यांत कांहीं कपट आहे असें आपणास वाटतें तर ?"

" कांहीं निश्चयात्मक सांगतां येत नाहीं. परंतु आपण सावध असावें हा उत्तम मार्ग !"

" ठीक आहे तर ! मी एकटाच त्या तरुणाबरोबर वेळ ठरवून त्याची एकांतांत भेट घेतों.

" पण वसंतविजया, ही कोठली बरं राजनंदिनी असावी असं तुला वाटतं ? मी मघांपासून पुष्कळ विचार केला परंतु माझ्या माहितीपैकीं कोठलीच राजकुमारी ह्या पत्रांत लिहिल्याप्रमाणें संकटांत असलेली मला आठवत नाहीं. म्हणूनच ह्या पत्राविषयीं मला संशय येतो. कदाचित् मला एकान्तस्थळीं गांठण्याकरितां हा सर्व अमात्यानें रचलेला व्यूह नसेल कशावरून ?"

" होय. शंका घेण्यास जागा आहे खरी !"

थोडा वेळ खल केल्यावर वसंतविजयानें पुढली सर्व कामगिरी आपल्या शिरावर घेतली आणि त्यानें संकेतस्थळ आणि वेळ ठरवून यशोधरेला कशी सूचना दिली, त्याविषयीं हकीकत गेल्या प्रकरणांत आलीच आहे. आपल्या पत्राप्रमाणें राजपुत्राकडून उत्तर आलें हें पाहून तिलाहि समाधान झालें. ती तशीच पुढें निघाली. अद्यापि अमात्य आपल्या गुप्तस्थळीं विचार करीतच बसला होता. राणी आणि यशोधरा यांचा प्रेमसंवाद ऐकून राणीविषयीं त्याचें मन साफ बदललें. ती चंचल मनाची स्त्री आपणावर दाखवीत असलेलें प्रेम केवळ वरकांती आहे अशी आतां त्याची खात्री झाली. यशोधरेच्या ऐवजीं खरोखरीच जर एखादा पुरुष असता तर मात्र राणीच्या इतक्या प्रेमलीला त्यानें पाहून घेतल्या नसत्या. रागाच्या आवेशांत त्यानें कांहीं तरी भलताच प्रकार केला असता. असो.

" कां ! झाली ना खात्री ?" पुढें होऊन यशोधरा अमात्याला म्हणाली, " अमात्यराज, ह्या स्त्रिया किती चंचल मनाच्या असतात याची तुम्हाला कल्पना होणें शक्य नाहीं. ज्याचं कुलशील नीच त्यांचें वर्तन बहुधा असेंच नीच असावयाचें ! पण तें असो. तुमचा येथें बराच वेळ मोडला, कारण तुम्हीं राज्य-शकट वाहणारीं जबाबदार माणसं ! तुमचा एक एक क्षण म्हणजे बहुमोलाचा असायचा ! तर तुम्ही आतां जा. शिवाय मलाहि अद्यापि पुष्कळ काम आहे."

" पण विलासवती, तुझी आतां भेट केव्हां होणार ? तुझ्या शिवाय मला आतां बिलकूल चैन पडायचं नाहीं ! "

" होय. मी तें जाणून आहे. पण त्याला नाइलाज आहे. माझी प्रतिज्ञापूर्ति होईपर्यंत आपणास असाच विरह सोसावा लागणार आहे. "

" ती तर होईलच ! पण आज रात्रीं तुझ्या संगतीचा मला लाभ नाहींका होणार ? "

" छे ! मला आज सर्व रात्र महाराजांच्या सान्निध्यांत घालविली पाहिजे. कारण गुरुमहाराजांनीं आज केलेल्या नव्या औषधयोजनेचा काय परिणाम होतो तो मला फारच बारकाईनें अवलोकन केला पाहिजे. "

यशोधरेनें बिनतोड शक्कल लढवून अमात्याला धुडकावून लाविलें. कारण रात्रीं तिला युवराजाची भेट घ्यावयाची होती. आणि तिचें मुख्य कामहि तेंच होतें. एकदां युवराजाची भेट होऊन आपल्या स्वामिनीचें प्रेमकंकण त्याच्या हातांत बांधून त्याला येथून रवाना केला म्हणजे आपली कार्यसिद्धि झाली. नंतर आपण अमात्य आणि राणी हीं दोन बाहुलीं वाटेल तशीं खेळवूं अशी तिची खात्री होती. तिनें अमात्याला वाटेला लाविल्यावर प्रथम राजमहालांत जाऊन वृद्ध चारणाची भेट घेतली. आणि आपण केलेली कामगिरी त्याला सर्व सांगितली. नंतर थोडावेळ राजमंदिरांत घालविल्यावर तिनें अंतकाला बरोबर घेऊन त्याला संशय न येऊं देता प्रासादाचें दक्षिण उद्यान पाहून घेतलें.

रात्र झाली. नेमलेली वेळ भरतांच यशोधरा उद्यानांत जाण्याकरिता सिद्ध झाली. तिनें आपणाबरोबर आपल्या स्वामिनीनें दिलेलें कंकण घेतलें होतें. उद्यानांत त्यावेळीं किंचित् चंद्रप्रकाश पसरला होता. यशोधरा उद्यानाच्या कमानीजवळ जाऊन उभी राहिल्यावर थोड्या वेळानें कोणीतरी हळुहळू आपणाजवळ येत असल्याचा तिला भास झाला.

" कोण आहे ? "

" संकेत स्थळ व वेळ नेमून देणारा ! "

" आपण युवराज का ? "

" नाहीं. "

" माझें काम युवराजाजवळ आहे. त्यांची भेट होईल काय ? "

" नाहीं. "

" कां ? "

" आपणाविषयीं आम्हाला संशय उत्पन्न झाला आहे. कारण आपण अमात्य अनंगसेनाच्या कटांतले अहांत. "

" नाहीं. हा आपला संशय अगदीं निराधार आहे. आमचा राजप्रासादांत प्रवेश होण्यास जरी अमात्य कारणीभूत झाला आहे, तरी त्याचा आणि आमचा बिलकूल संबध नाहीं. इतकेंच नव्हे तर योग्य वेळ प्राप्त होतांच त्याच्या सर्व कारस्थानाचा स्फोट करून मीच त्याला त्याच्या पापाचें प्रायश्चित भोगण्यास लावीन, हें आपण लक्षांत ठेवा. "

" पण आपल्या शब्दावर आम्ही कोठल्या आधारावर विश्वास ठेवावा ? "

" ठीक आहे. आपण विश्वास ठेवा अगर नका ठेऊं. परंतु आम्ही ज्या कार्याकरितां रात्रींचा दिवस करून पन्नास कोस निबिड अरण्यें तुडवित येथें आलों, तें कार्य आपणास सांगतों. येथून आपल्या नगरीच्या पूर्व दिशेला पन्नास कोसावर असलेल्या मयुरनगरीच्या राजकुमारीवर भयंकर प्रसंग गुदरला आहे. तिनें हें कंकण पाठविलें आहे. हें आपण युवराजांच्या हातांत घाला आणि माझा—त्या राजनंदिनीकडून आलेल्या दूताचा असा निर्वाणीचा निरोप कळवा कीं, जर आपल्या अंगांत खरें खरें क्षात्रतेज वास करीत असेल तर एका क्षणाचाहि विलंब न करितां त्या राजबालिकेची त्या दुर्धर संकटांतून मुक्तता करण्याकरितां निघा. " असें म्हणून यशोधरेनें कंकण पुढें केलें.

वसंतविजयानें हात पुढें केला आणि तें रत्नजडित कंकण आपल्या हातात घेतलें. परंतु कंकण घेताना त्याच्या हाताला यशोधरेच्या हाताचा किंचित् स्पर्श झाला. त्याबरोबर त्याला एक चमत्कारिक भावना झाली. आणि तीच स्थिति यशोधरेची झाली. दोघेंहि क्षणभर परस्परांकडे पाहूं लागलीं.

" मजविषयीं आपणास संशय आला आहे, " किंचित्कालानें यशोधरा म्हणाली, " परंतु लवकरच आपलें मन आपणांस मजविषयीं निराळेंच सांगूं लागेल, अशी माझी खात्री आहे. परंतु तो प्रश्न अद्यापि दूरचा आहे. आतां आपण जा. मयुरनगरींत राजकन्या सुहासिनी आपल्या युवराजाची चातकीसारखी मार्गप्रतिक्षा करीत आहे. करितां सूर्योदयापूर्वी नगर सोडून मार्गाला लागा आणि शत्रूचा संहार करून विजयाबरोबर राजनंदिनीनें, युवराज अमरसिंहाच्या चरणी मनोभावानें अर्पण केलेल्या तिच्या सुकुमार देहाचा स्वीकार करा, असा माझा आपल्या युवराजांस निरोप कळवा—जा—"

यशोधरेकडून कंकण घेऊन वसंतविजय पुनः युवराजाच्या महालांत आला. राजपुत्र त्याची वाट पहात होता. वसंतानें सर्व गोष्टी सांगितल्या तेव्हां तरुण वीरांच्या क्षात्रतेजाला उसळी आणणारा यशोधरेचा निरोप ऐकून अमरसिंह उठला आणि वसंताने त्याच्या हातांत दिलेल्या रत्नमय कंकणाकडे क्षणभर पाहून निश्चयी पण गंभीर स्वरांत तो म्हणाला, "वसंतविजया, ह्या प्रकरणांत कपट असो अगर नसो; परंतु एका राजकुमारीनें संकटांत माझ्या मदतीची अपेक्षा केली आहे, इतकेंच नव्हे तर माझ्या वीर्यबलावर श्रद्धा ठेऊन माझ्या चरणीं तिनें आपला कोमल देहसुद्धां अर्पण केला आहे; तेव्हां आतां मला माझ्या कर्तव्याला जागलें पाहिजे. जा, आतां एका क्षणाचाहि विलंब होतां उपयोगी नाहीं. प्रथम श्रुतसेन सेनानायकाला येथें घेऊन ये, म्हणजे पुढें काय करावयाचें तें मी तुला सांगतों."

वसंतविजयाला जाऊन बराच वेळ झाला, तरी युवराज आपल्या हातांतील कंकणाकडे एकाग्रतेनें पहात होता. जणूं काय तें कंकण त्याच्याबरोबर बोलतच आहे कीं काय असें वाटत होतें. कारण क्षणभरानें राजपुत्र बोलूं लागला, 'हे दिव्यकंकणा ! तुला आपल्या कोमल करांत धारण करणाऱ्या तुझ्या स्वामिनीचा निरोप मला कळला ! तिनें मजवर विश्वास ठेविला आहे. आणि त्या विश्वासाला मी पात्र आहें, असें दाखविण्याकरितां मी तुला आपल्या हातांत आतां ह्या मध्यरात्रीच्या सर्व दृश्य आणि अदृश्य देवतांच्या समक्ष धारण करीत आहे. आणि अशी प्रतिज्ञा करतों कीं, सर्व संकटांचा संहार करून ज्या कोमल हस्तात आजपर्यंत तूं वास्तव्य केलेंस, तो तुझ्या स्वामिनीचा सुंदर हात मी ह्या माझ्या विजयी हातांत धरून पितृदर्शनाकरितां तरी येईन, नाहींतर हा देह धारातीर्थी तरी ठेवीन !"

"युवराज हें काय ?" एकदम आंत येऊन वसंतविजय म्हणाला. "आपण ही घोर प्रतिज्ञा करण्यापूर्वी कांहीं विचार केला काय ? कदाचित् हा सर्व अमात्यानें रचलेला कपटव्यूह नसेल कशावरून ?"

"नाहीं—विजया, नाहीं. हा कपटव्यूह नाहीं, असें माझें मन मला सांगत आहे. कारण हें कंकण माझ्या हातांत आल्यापासून ह्या कंकणांतील दिव्यशक्ति मला एकसारखी ओढीत आहे, असा मला भास होतो—पण सेनानायक कुठें आहेत !"

" हा सेवक चरणाजवळ हजर आहे." आंत येऊन प्रणाम करीत श्रुतसेन म्हणाला.

" सेनानायक, अशा मध्यरात्रीं मी आपणास मुद्दाम बोलावणें पाठविलें. मला आपल्या मदतीची जरूरी आहे."

" युवराजमहाराज, अशा शंकित शब्दांत कां विचारतां ? हा देह आपला आहे, मग दासाजवळ अशी दीन भाषा कां ?"

" कारण सांप्रत सर्व राज्यांत फितुरी झाली आहे. अमात्यानें—"

" आणि तेवढ्याच करितां उदईक मी आपणास भेटणार होतों. परंतु त्यापूर्वींच आपण मला बोलाविलें हें एका अर्थी ठीक झालें. आपल्या अमात्यांच्या विरुद्ध मी बोलूं नये परंतु आतां गोष्ट मर्यादेबाहेर गेली तेव्हां नाइलाज झाला आहे. महाराजांनीं सर्व अधिकार त्यांना दिला. परंतु त्याचा ते दुरुपयोग करतात. आतां थोडक्यांत सांगावयाचें म्हणजे माझी सेना माझ्या ताब्यांत राहिली नाहीं. ती कोठल्यावेळीं बंड करील तें मला सांगतां येत नाहीं."

" पण सेनानायक, माझा शब्द ती सेना मानील काय ?"

" महाराज, असं काय विचारतां ? आपल्याच अन्नाची ती सेना ! आपल्या शब्दाकरितां वाटेल त्यावेळीं वाटेल त्या संकटाला तोंड देण्याकरितां मुठींत प्राण धरून प्रत्येक वीर दंड ठोकून पुढें येईल."

सेनानायकाचें भाषण ऐकून युवराजाला बराच धीर आला. त्यानें आपल्या हातांत घातलेलें कंकण पुढें करून त्या कंकणाविषयीं सर्व हकीकत आणि आपली प्रतिज्ञा त्यास सांगितली. पुढें थोडा वेळ त्यांचा विचार झाल्यावर अत्यंत गुप्त रीतीनें एका प्रहराच्या आंत सर्व सेना नगरीच्या बाहेर नेण्याचें आश्वासन देऊन सेनानायकानें युवराजाची रजा घेतली. तो गेल्यावर युवराज म्हणाला, " मित्रा, आतां तुझा काय विचार ठरतो तो सांग ? मी तर हा निघालोंच पण तुझीहि मला मदत पाहिजे."

" मीहि तयारच आहे—"

" नाहीं. मला तुझी तशी मदत नको. मी येथून गेल्यावर अमात्याच्या कारस्थानावर दृष्टि ठेऊन महाराजांच्याजवळ तूं असावेंस अशी माझी इच्छा आहे. आणि हीच तुझी मला मदत पाहिजे." असें म्हणून युवराज उठला. आणि आपल्या शस्त्रागारांत जाऊन पुढल्या तयारीला लागला. बसंत

विजयानें सेवकाला अश्व तयार करण्याचा हुकूम केला. थोड्या वेळानें राजपुत्र आपल्या शस्त्रास्त्रादि आयुधांनीं सज्ज होऊन बाहेर आला. परस्परांनीं एकमेकांस दृढ आलिंगन दिलें. युवराज आपल्या अश्वावर स्वार झाला आणि अश्वाला टांच मारण्यापूर्वी म्हणाला, "वसंतविजया!—मित्रा, मी परत येईपर्यंत महाराजांच्या जीविताची काळजी तुला आहे—जाऊं मी?"

"जा. आणि विजयी होऊन ये!"

---

# सत्य संरक्षण ७

दुसऱ्या दिवशीं नगरांत एकच गडबड उडाली. सर्व सैन्यानें रात्रींच्या रात्रीं नगर सोडलें असून युवराजांचा बंड करण्याचा विचार आहे, असा ध्वनि सर्व नगरात जिकडे तिकडे ऐकूं येऊं लागला. परंतु खरी वस्तुस्थिति मात्र कोणालाच माहिती नव्हती. युवराज स्वसैन्यासह रात्रीं नगरांतून गेला, हें पाहून यशोधरेला अत्यंत आनंद झाला. विजयपुरांत प्रवेश करतांना अमात्याच्या कृष्णकारस्थानाच्या ज्या गोष्टी तिला कळल्या, त्यावर विचार करतां आपल्या स्वामिनीचें कार्य आपणांस कसें शेवटास नेतां येईल, ही एक तिला मोठी शंका होती. परंतु कोठल्याहि गोष्टीचा अडथळा न येतां इतक्या सहजासहजीं आपली कार्यसिद्धि झाली, यावरून आपल्या पुढल्या सर्व कार्यांत आपणास यशच येईल अशी तिला खात्री वाटूं लागली. आता तिचें मन बरेंच स्वस्थ झालें. दुपारच्या प्रहरीं ती प्रसन्न चित्तानें महाराजांच्या महालांत आली. त्यावेळीं महाराजाजवळ अमात्य अनंगसेन बसलेला होता, परंतु यशोधरेला महालांत आलेली पाहून त्यानें आपलें भाषण आटोपलें आणि 'महाराजांच्या आज्ञेप्रमाणें मी युवराजांस समजावून परत आणण्याचा प्रयत्न करतों.' असें म्हणून त्यानें महाराजांस प्रणाम केला आणि यशोधरेकडे वळून तो हास्यमुद्रेनें म्हणाला, "विलाससेन, आपल्या गुरुमहाराजांच्या औषधयोजनेनें महाराजांची प्रकृति सुधारत आहे, हें पाहून मला अत्यंत आनंद होत आहे. आणि ह्या कामांत आपल्या गुरुजीस यश यावें अशी माझी मनापासून इच्छा आहे."

अमात्याच्या म्हणण्याप्रमाणें महाराजांची प्रकृति खरोखरीच सुधारत होती. एका दिवसांतच ते आपल्या शय्येवर उठून बसूं लागले होते. आणखी एक दोन दिवसांत महाराज हिंडूं फिरूं लागताच अमात्य आणि राणी यांचीं कृष्ण कृत्यें उघडकीस आणून आपल्या कार्याची समाप्ति करूं, असा यशोधरेनें विचार केला होता. ती आंत येतांच अमात्यानें केलेलें भाषण तिच्या लक्षांत आलें. तिनें त्या भाषणाला उत्तर म्हणून फक्त हास्यवदन केलें. त्यावेळीं महाराजांच्या शय्येजवळ राणी दामिनी उभी होती यशोधरा आंत येतांच तिच्या चर्येंत चलबिचल झाली. हा प्रकार आणि यशोधरेला पाहून अमात्यानें केलेलें हास्य, पलीकडे दरवाजावर पहारा करीत असलेली एक व्यक्ति तीव्र दृष्टीनें पहात होती. अमात्य निघून गेल्यावर महाराजांची नजर चुकवून राणीनें यशोधरेला नेत्रखुणा केल्या, त्या पाहून त्या व्यक्तीच्या कपाळाला आठ्या पडल्या परंतु चाणाक्ष यशोधरेच्या त्या लक्षांत आल्यावांचून राहिल्या नाहींत. यशोधरेनें महाराजाच्या प्रकृतीविषयीं चौकशी करतांना एकदां भेदक दृष्टीनें त्या व्यक्तीकडे पाहिलें, तेव्हां तिला त्या व्यक्तीची अस्फुट कल्पना झाली. आपणास युवराजांच्यातर्फे वेळ आणि स्थळ नेमून देणारी व आपला युवराजास संदेश कळविणारी ती हीच व्यक्ति असावी असें तिला वाटूं लागलें.

होय. यशोधरेची कल्पना बरोबर होती. राजपुत्रानें नगर सोडतांना जी अत्यंत जबाबदारीची कामगिरी सोंपविली होती, ती बजाविण्याकरितां वसंतविजय पहारेकऱ्याच्या वेषानें महाराजांच्या खास महालाच्या दरवाजावर उभा होता. त्याला यशोधरेचा दृढ संशय आला होता. त्यांत त्यानें परस्परांचे नेत्रसंकेत पाहिल्यामुळें जास्त भर पडली. त्यामुळें त्याच्या मनांत अनेक कुतर्क येऊं लागले. युवराजास नगरांतून काढून दूर करण्याकरितां हा सर्व अमात्यानेंच रचलेला व्यूह आहे, असें आतां त्याला वाटूं लागलें. तो सर्व गोष्टींचा प्रथमपासून विचार करूं लागला. धन्वंतऱ्याबरोबर आलेला हा तरुण कोठल्या देशाचा असावा, तो अमात्याच्या कटांत कां सामील झाला, इत्यादि गोष्टींचा विचार करितां करितां रात्रीं त्या तरुणानें कंकण देतांना त्याचा हस्तस्पर्श झाला असतां आपणास एक चमत्कारिक भावना झाली, याची त्याला आठवण झाली, त्याबरोबर त्याचे सर्व विचार तेथेंच थांबले. क्षणभर तो ह्या विचारांत गर्क असतां त्याचें राणीकडे लक्ष गेलें. ती छद्मवेषी यशोधरेकडे पहात होती. पण तिच्या दृष्टींत निराळ्याच भावाचा बोध होत

होता. प्रत्यक्ष आपल्या पतिसन्निध परपुरुषाबरोबर राणीच्या प्रणयचेष्टा पाहून त्याचें मन खवळलें. त्याचे हात चळवळ करूं लागले. परंतु तितक्यांतच त्यानें आपलें मन आवरलें.

" युवराजानें नगर सोडलें असून तो बंडास प्रवृत्त झाला आहे, ही गोष्ट देवीला कळलीच असेल ! " महाराज म्हणाले.

" युवराज बंडाला प्रवृत्त झाला ! " आश्चर्यानें राणीनें विचारलें.

" होय. त्यानें माझ्या नांवाला कलंक लावण्याचा विचार केला आहे. मला ही बातमी आतांच अमात्याकडून कळली ! "

" मोठं आश्चर्य आहे ! युवराजाच्या डोक्यांत हें कसलं वेड भरलं आहे ! पण महाराजांनीं त्याचा काय बंदोबस्त केला ? "

" देवीचं मन त्याविषयीं अस्वस्थ होण्याचं कारण नाहीं. " इतकें संदिग्ध बोलून महाराज शय्येवरून उठले. परंतु यशोधरेला मात्र त्या भाषणाची चुटपुट लागली. थोड्या वेळापूर्वी अमात्य महालांतून जातांना युवराजाविषयीं तो कांहीं तरी बोलत होता आणि महाराजांनीं त्याला कांहींतरी कडक हुकूम दिला आहे, इतकें तिनें आंत येतांच महाराजांच्या चर्येवरून ताडलें होतें. आणि त्याच गोष्टीचा शहानिशा करावा अशी तिची इच्छा होती. त्याप्रमाणें महाराजांनींच स्वतः होऊन ती गोष्ट काढली, तेव्हा तिला आनंद झाला. आतां आपणास सर्व गोष्टी कळतील असें तिला वाटलें. परंतु महाराजांनीं थोडक्यांतच आपलें भाषण आटोपलें. त्यामुळें तिचा अगदीं विरस झाला. महाराजांनीं अमात्याला काय हुकूम दिला आहे, हें जाणण्यास तिचें मन उत्सुक झालें.

यशोधरा आपणाजवळ येईल म्हणजे आपण तिच्याबरोबर बोलूं अशी राणीची फार इच्छा होती. परंतु यशोधरा मुद्दाम राणीला टाळण्याचा प्रयत्न करीत होती. महाराज उठून आतल्या महालांत जातांच ती संधी साधून राणी यशोधरेजवळ आली आणि म्हणाली, " विलाससेन, आज मी आपली कोठलीहि सबब ऐकायची नाहीं. आपणास आज माझा पाहुणचार घेण्या-करितां अवश्य आलं पाहिजे. " असें म्हणून ती यशोधरेच्या अगदीं जवळ आली. "असं काय ? असा हा संकोच आपणास कां वाटावा ?—विलाससेन, मनाचं एकीकरण झाल्यावर—"

" देवी, आपल्या पाहुणचाराकरितां माझं मन किती उत्सुक आहे म्हणून

सांगूं ! पण देवीनें मला आणखी दोन दिवस क्षमा करावी. आज युवराजाबद्दल नवीन एक चिंता उद्भवली आहे, तेव्हां—"

इतक्यांत महाराज पुनः महालांत आले. त्यामुळें त्यांचें भाषण तितकेंच थांबलें. परंतु महाराजांनीं तो विषय मात्र पुढें चालविला. कारण यशोधरेच्या तोंडचें शेवटचें वाक्य त्यांनीं ऐकलें होतें. ते म्हणाले, "देवीला इतकी भीति वाटण्याचं मुळींच कारण नाहीं ! युवराज बंड करण्याकरितां उद्युक्त झाला असला तरी त्याला मार्गावर आणण्याचें सामर्थ्य मला आहे. आणि मी अमात्यालाहि तसाच हुकूम दिला आहे. आतां देवीनें स्वस्थ असावें. विलाससेन, हा पाहिलांत ना सापत्नभाव आम्हाला कसा नडतो तो ! मी जिवंत असतांना जर हा राज्याधिकारी युवराज असा बंडास अनुसरला आहे तर माझ्यामागें हा काय करील ?—माझ्या कुमाराचा हा खून देखील करील."

अमात्य आणि राणी यांनीं महाराजांना सर्व गोष्टी विपरीत भासवून त्यांचा अगदीं गैरसमज करून दिला आहे, हें वरील भाषणावरून यशोधरेच्या लक्षांत आलें. तिनें एकाच गोष्टीचा उच्चार केला असता तर महाराजांचा गैरसमज दूर होऊन त्यांना खरी वस्तुस्थिति कळली असती. परंतु यशोधरेनें कांहींच उत्तर दिलें नाहीं. ती अनुकूल काळाची वाट पहात होती. तरी देखील महाराजांचा युवराजाविषयीं वाईट ग्रह झालेला पाहून तिला वाईट वाटलें ती गप्प राहिली. तीच स्थिति पहाऱ्यावर असलेल्या वसंतविजयाची झाली. आपल्या प्रिय मित्रावर—युवराजावर प्रत्यक्ष त्याच्या बापानें बंडाचा भयंकर आरोप ठेवलेला ऐकून त्याचें पित्त खवळलें परंतु त्या गोष्टीचा प्रतिकार करण्याचें त्यावेळीं त्याला सामर्थ्य नव्हतें. त्याचें मन पुनः अस्वस्थ झालें. अमात्य आणि राणी यांनीं संगनमतानें कारस्थान चालविलें आहे, त्यांत ह्या नवीन तरुणानें येऊन भर घातली, असें त्याला वाटूं लागलें. आज ह्या तरुणावर पूर्ण पाळत ठेऊन, तो कोण, कोठून आला आणि त्यानें काय व्यूह रचला आहे, इत्यादि सर्व गोष्टींचा पूर्ण शहानिशा करण्याचा त्यानें निश्चय केला.

वसंतविजयानें निश्चय केल्याप्रमाणें तो यशोधरेच्या पाळतीवर राहिला. आपल्या हालचालीवर कोणाचें लक्ष असेल असा यशोधरेला किंचित्हि संशय आला नाहीं. ती राजमहालांतून उद्यानांत गेली, तेथून देवीच्या मंदिरांत गेली. नंतर जवळच असलेल्या पुष्करणीजवळ जाऊन ती एका शिलातलावर

बसली. तिला आतां एकांत स्थलाची आवश्यकता होती. ती सायंकाळची वेळ असल्यामुळें त्या प्रशांत समयीं ती शांत चित्तानें आपला भावी कार्यक्रम ठरवीत बराच वेळ तेथें बसून राहिली. पुष्कळ वेळ स्वगत विचार केल्यावर तिचा एक बेत कायम ठरला. त्या बेताप्रमाणें वागण्याचा निश्चय करून ती शिलातलावरून उठली. आणि हळुहळू परत आपल्या ठिकाणीं आली. वृद्ध चारण स्वस्थपणें एका सुखासनावर बसला होता. परंतु यशोधरेला पाहतांच तो एकदम उठला आणि किंचित् रागाच्या स्वरानें म्हणाला, " यशोधरे, तूं सकाळपासून आहेस कुठें ? मी दोनदां प्रासादांतून जाऊन आलों. पण तूं तेथें असशील तर ना मला भेटणार ! ह्या नामधारी वेषांत तर तूं हा राजप्रासाद उलट सुलट करून टाकला आहेस परंतु खरोखरीच जर तूं विलाससेन असतीस तर काय प्रताप गाजविले असतेस ? "

यशोधरेनें किंचित् स्मित करून उत्तर दिलें, " काय केलें असतें आणि काय केलें नसतें हे भविष्य वर्तविण्यांत काय अर्थ ? पण चारणा, तूं माझ्या शोधाकरितां प्रासादांत का गेला होतास ? मला आतां ह्या पुढें किती जोखमाची कामगिरी करावयाची आहे, ती तूं विसरलास वाटतं ? "

" पोरी, कसली घेऊन बसली आहेस कामगिरी ! आपल्या ताईमहाराजाचें काम झालें. आतां चल कशी मुकाट्यानें ! मरूं दे त्या राणीला आणि अमात्याला ! करील तो आपण होऊन भरील ! "

" असं कसं म्हणतोस चारणा ? ह्या दुष्टांना जर आपण असेंच सोडून गेलों, तर ते पुढें युवराजांना आणि पर्यायें आपल्या ताईमहाराजांना जाचक नाहीं का होणार ? तें कांहीं नाहीं ! ह्या चांडाळांना त्यांच्या पापाचें योग्य प्रायश्चित्त देण्याची मी प्रतिज्ञा केली आहे. "

" तें खरं ! पण येथें मी संकटांत पडतों याचा कांहीं विचार ? मी मोठा धन्वंतरी म्हणून माझ्या नांवाची दवंडी पिटलीस आणि तूं झालीस मोकळी. पण आज दुपारपासून येथें नागरिकांची कोण भयंकर गर्दी जमली होती, याची तुला कांहीं कल्पना ? "

" खरं कीं काय ! मग मी आतां इतक्यांत त्याचा बंदोबस्त करतें. आतां मला अमात्याकडे जावयाचें आहे. त्याला भेटून सर्व कांहीं ठरवितें. म्हणजे कोणीहि तुला त्रास द्यावयास येणार नाहीं. " यशोधरा म्हणाली, " पण चारणा, महाराजांनीं युवराजाविषयीं कांहीं कडक हुकूम सोडले आहेत, असें

मला आज राजप्रासादांत कळलं. परंतु ते हुकूम कोठल्या स्वरूपाचे आहेत तें मात्र मला कळलं नाहीं. म्हणून मी मुद्दाम अमात्याकडे जात आहे." असें म्हणून यशोधरेनें आपल्या डोक्याला व्यवस्थेनें गुंडाळलेला पटका सोडला. त्याबरोबर तिचे काळेभोर मृदु केश बाहेर पडून ते खांद्यावरून तिच्या उच्च उरोभागावर लोंबूं लागले. ते केश हातानें झटकीत ती पुढें म्हणाली, " मी आतां आंत जाऊन वेष बदलून अमात्याकडे जातें. तूं स्वस्थ ऐस."

यशोधरा आंतल्या दालनांत गेली. हा सर्व प्रकार दरवाजाआड असलेल्या वसंतविजयानें पाहिला. त्यांच्या आंत चाललेल्या भाषणावरून विलाससेन हा तरुण नसून तरुणी आहे, हें त्यानें जाणलें. क्षणभर तो अगदीं गोंधळून गेला. परंतु तत्काळ मनाचा निग्रह करून खरा प्रकार काय आहे तो प्रत्यक्ष समजून घेण्याच्या उद्देशानें तो दरवाजांतून आंत आला. इतक्यांत आपला पुरुषवेष काढून यशोधरा आंतल्या दालनांतून हंसगतीनें बाहेर आली. परस्परांना पाहतांच दोघेंहि आश्चर्यचकित झाली.

" हे तरुणी, तूं कोण आहेस? आणि अशा छद्मवेषांत तूं येथें कां आलीस?" जोरानें वसंतानें विचारलें.

" पण प्रथम आपण कोण तें मला कळेल काय ?"

" संकेतस्थळीं व संकेतवेळीं युवराजांना कंकण देण्याकरितां तूं ज्याला भेटली होतीस तोच मी !"

" अस्सं का ? मग महाराज, आपणापासून मला भीति बाळगण्याचें व कोठलीहि गोष्ट लपवून ठेवण्याचें कारण नाहीं. आपणास त्यावेळीं माझा संशय आला होता, पण आतां मी आपली पूर्ण खात्री करून देतें."

" पण तूं ह्या अमात्याच्या कारस्थानांत कशी ?"

" नाहीं. मी त्यांच्या कारस्थानांत नाहीं. उलट त्यांच्या कारस्थानाचा महाराजांजवळ स्फोट करून त्यांच्या कृष्णकृत्याबद्दल त्यांना प्रायश्चित देण्याची माझी प्रतिज्ञा आहे."

" असेल ! पण तुझी प्रतिज्ञा खरी कशावरून ? तुझ्या आतांपर्यंतच्या वर्तनावरून मला तुझा संशय येतो. इतकेंच नव्हे तर अमात्याच्या आणि दामिनी राणीच्या कृष्ण कारस्थानांत तुझी मुख्य भूमिका आहे अशी माझी खात्री झाली आहे."

" अशी जर आपली खात्री असेल तर त्यांत मला आनंद आहे. कारण मी घेतलेली भूमिका चांगल्या प्रकारें वठत आहे, असें स्पष्ट होतें. तथापि सत्यसंरक्षण हें माझं ध्येय आहे, ही आपली खात्री असूं द्या—पण ह्या कामीं आपण मला सहाय्य व्हाल काय ? "

" तरुणी, सत्यसंरक्षणाकरितांच हा माझा देह आहे !—पण तुझ्या ध्येयाची मला खात्री कशी पटावी ? "

## प्रायश्चित्त ८

त्या अल्प काळच्या परिचयांत परस्परांबरोबर भाषण करतांना दोघांच्याही हृदयांत अनिर्वचनीय वृत्ति उचंबळूं लागल्या. संकेतस्थळीं कंकण देतांना हस्तस्पर्शामुळें यशोधरा आणि वसंतविजय यांना ज्या चमत्कारिक भावना झाल्या, त्यांना ह्या अल्पकाळच्या सहवासांत मूर्त स्वरूप येऊन त्या दृढ होऊं लागल्या. असो. शेवटीं वसंतविजयाची खात्री करण्याकरितां आपली सर्व हकीकत सांगून झाल्यावर यशोधरा सप्रेम दृष्टीनें त्याच्याकडे पहात म्हणाली, " आपलें मला सहाय्य असल्यावर ह्या दुष्टांच्या पापाचा भूमातेला अधिक भार सहन करण्यास कां लावावा ? "

" माझीही तीच इच्छा आहे. पण आतां तूं पुढें काय करण्याचें योजिलें आहेस ? "

" थोड्या वेळापूर्वी मी निराळाच बेत केला होता. आतां अमात्याकडे जाऊन महाराजांकडून त्याला काय हुकूम मिळाला आहे, तो समजून घ्यावा अशी माझी इच्छा होती. पण आतां तो बेत मी रहित केला. आता त्यांच्या प्रायश्चित्ताचीच मला तयारी केली पाहिजे. चला—" असें म्हणून यशोधरा आणि वसंतविजय महालाच्या गुप्त द्वाराजवळ आले. वसंतविजयाला तेथेंच थांबण्यास सांगून ती दुसऱ्या महालांत गेली. तेथें पहाऱ्यावर अंतक होता. त्याच्याकडून तिनें अमात्य अनंगसेनाला निरोप पाठविला. आज अमात्याची स्वारी विशेष आनंदांत होती. आज त्याला आपल्या प्रतिस्पर्ध्याला—युवराजाला पकडून कडक शिक्षा देण्याचा हुकूम मिळाला होता. त्या हुकुमांत

थोडा फेरफार करून नुकताच त्यानें अत्यंत कडक हुकूम फर्माविला होता. युवराजाचा शोध करून त्याचा खून करणारास अमात्यानें पांच हजार मोहरांचें बक्षीस ठेविलें होतें. त्या बक्षिसाच्या आशेनें दोन नीच माणसें थोड्यावेळांपूर्वी त्याची आज्ञा घेऊन गेलीं होतीं. आणि ह्या एकाच गोष्टीमुळें त्याला आनंद झाला होता. आपल्या मार्गांतील युवराजाचा काटा दूर होतांच आपण अगदीं निर्भय झालों. असें त्याला वाटत होतें. वृद्ध राण्याला लवकरच समाधी देण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता, हें वाचकांच्या स्मरणांत आहे. राहतां राहिली राणी. परंतु विलासवतीला पाहिल्यापासून व तिनें वश झाल्याचीं चिन्हें दाखविल्यापासून आपण राज्यारूढ झाल्यावर राणीला बाजूला सारून विलासवतीबरोबर विवाह करावयाचा असें त्याचें मनोराज्य सुरू होतें. तो ह्याच विचारांत गर्क होता. इतक्यांत अंतकानें आंत येऊन यशोधरेचा त्याला निरोप कळविला.

मोठ्या उल्हासानें आपल्या पेहरावात फरक करून अमात्य निघाला. यशोधरा त्याची वाटच पहात बसली होती. तो येतांच त्याला उत्थापन देऊन यशोधरा स्मित वदन करून म्हणाली, " अमात्यराज, आपण मजवर सोंपविलेली कामगिरी मी बहुतेक पार पाडली आहे. पण आपण मला आश्वासन दिलें आहे त्याच काय ? "

" माझ्या आश्वासनाबद्दल तुला शंका घेण्याचें कारण नाहीं. पण तूं कामगिरी पार पाडलीस ती कोणती ? उलट महाराजांची प्रकृति जास्त सतेज आणि निकोप दिसते. "

" होय. हीं पूर्व चिन्हें आहेत. " असें म्हणून यशोधरेनें त्याच्याकडे प्रेमपूर्ण दृष्टीनें पाहिलें आणि ती पुढें म्हणाली, " अमात्यराज, आतां तुम्ही असं समजा कीं, राणी ह्या ठिकाणीं आली तर तुम्ही काय कराल ? तिला झिडकारून टाकाल काय ?—छे. माझ्या प्रेमप्राप्तीकरितां तुम्ही तिला आत्तांच झिडकाराल तर ती उलट नागिणीप्रमाणें तुम्हाला दंश करण्यास कमी करणार नाहीं. आणि असें झालें म्हणजे तुमचीं सर्व मनोराज्यें आजच जमिनदोस्त होतील. खरं ना ?—अमात्यराज, विचार कसला करतां ? तुम्ही स्तःला मुत्सद्दी म्हणवितां, सर्व राज्याचे तुम्ही अमात्य मग असे विचारांत काय पडलां ? "

यशोधरेनें त्याला उत्तर देण्यास जागाच ठेविली नाहीं. तो विचारांत पडला. तेव्हां त्याची गोंधळलेली स्थिति पाहून यशोधरा पुढें म्हणाली,

" अमात्यराज, तुम्हाला स्वतःच्या अनुभवावरून असें कळेल कीं, सर्व राज्यावर सत्ता गाजविणें सोपें आहे पण एका स्त्रीवर अमंल बसविणें फार कठीण आहे. म्हणून मी म्हणतें कीं, राज्याचीं सूत्रें हातीं धरणाऱ्या जबाबदार मनुष्याला माझ्या सारख्या मुत्सद्दी, धोरणी आणि कारस्थानी स्त्रीचीच जोड मिळाली पाहिजे. "

" विलासवती, तूं म्हणतेस त्यात पूर्णांशानें सत्यांश आहे खरा ! पण आतां आपल्या भावी सुखाकरितां आपणास काय केलं पाहिजे असं तुला वाटतं ? "

" त्याचा विचार आपण पुढें करूं. पण आज तुम्ही एक गोष्ट करा. आज राजमहालांत तुम्ही महाराजांजवळ असतांना मी तेथें आलें, त्यावेळीं राणीनें मजकडे पाहून हास्य केलें, तें तुम्ही पाहून भृकुटी वक्र केल्या व राणीबरोबर न बोलतां किंवा तिला प्रणाम न करतां निघून गेलां, त्यामुळें आमचा संशय येऊन तुम्ही असें वर्तन केलें असा राणीचा ग्रह झाला आहे. राणीचा असा ग्रह होणें आपणास फार बाधक आहे. कारण आपणास राणीची अद्यापि पुष्कळ मदत घ्यावयाची आहे. म्हणून तुम्ही आतां तिच्याकडे जा आणि पूर्वीप्रमाणें आपलें वर्तन ठेवा. "

अमात्याला सर्व भाषण पटलें. यशोधरेवर त्याचा पूर्ण विश्वास बसला. थोड्या वेळानें तिनें घाई करून त्याला राणीच्या महालांत जाण्याकरितां उठविलें. तो गेल्यानंतर यशोधरा गुप्तद्वारानें वसंतविजयाजवळ आली. तिला पाहतांच वसंतविजय क्षणभर तिच्या मुखाकडे पहात राहिला. तिच्या धाष्टर्याचें त्याला कौतुक वाटलें. थोड्या वेळानें तो म्हणाला, " यशोधरे, शाबास ! आमच्या नगरींत ह्या अमात्याची सत्ता चालू होतांच त्यानें आपल्या कारस्थानानें आम्हांला निस्तेज करून टाकलं होतं परंतु तूं दोन दिवसांतच त्याला एखाद्या निर्जीव बाहुल्याप्रमाणें नाचवीत आहेस, हें पाहून तुझ्या चातुर्याचें जितकें कौतुक करावें तितकें थोडेंच आहे. "

यशोधरेनें त्याला उत्तर दिलें नाहीं. फक्त तिनें तिर्यग्दृष्टि करून स्मितमुखानें त्याच्याकडे पाहिलें. नंतर ती वसंतविजयाला घेऊन हळुहळू राजप्रासादांत आली. महाराज शय्येवर स्वस्थ पडले होते, परंतु आंत येणाऱ्या त्या दोन व्यक्तींकडे त्यांची दृष्टि जातांच आश्चर्य आणि राग हे विकार त्यांच्या चर्येवर स्पष्ट दृग्गोचर होऊं लागले. युवराज बिघडण्यास त्याचे मित्रमंडळ, त्यांतल्यात्यांत सरदारपुत्र वसंतविजय हाच कारण आहे,

असा महाराजांचा वाईट ग्रह अमात्यानें केला होता. त्यामुळें तो आंत येतांच महाराजांची चर्या रागीट दिसूं लागली. परंतु त्याना आश्चर्य वाटण्याचें कारण इतकेंच कीं, त्यानें आपल्याबरोबर एक स्त्री आणली.

" वसंतविजया, मूर्खा, तुला माझ्यापुढें येण्याचें धैर्य कसें झालें ? जा—चालता हो. माझ्या दृष्टिपथांतून दूर हो ! तूं आणि तो चांडाळ पितृद्रोही तुझा मित्र अमरसिंह माझ्या विरुद्ध बंड करण्यास प्रवृत्त झालांत काय ?

" महाराज, शांत व्हा ! " यशोधरा पुढें होऊन म्हणाली. " आपला कोप अनाठायीं होत आहे—"

" तूं कोण आहेस ? "

" महाराजांनीं मला ओळखलें नाहीं काय ? पुरुषवेष धारण करून धन्वंतऱ्याबरोबर आलेली मी एक अबला आहें. "

" काय ? विलाससेन हें नांव धारण केलेली ती तूंच ? "

" होय सरकार. पण महाराजांनीं त्या माझ्या धारिष्टाबद्दल मला क्षमा करावी. " असें म्हणून तिनें मोठ्या नम्रतेनें प्रणिपात केला. " काल मी स्वतःची ओळख आणि राजप्रसादांत चाललेल्या कारस्थानाची ओळख करून देण्याचें महाराजांना अभिवचन दिलें होतें, ती ओळख करून देण्याचा अनुकूल समय आतां प्राप्त झाला आहे. परंतु प्रथम महाराजांचा गैरसमज दूर केला पाहिजे. महाराज, आपण समजतां त्याप्रमाणें युवराज पितृद्रोही नसून ते कायावाचा—मनानें पितृभक्तच आहेत. आणि ज्यांनीं आपला हा विपरित ग्रह केला तो नीच अमात्य स्वामिद्रोही असून राणीही पतिद्रोही आहे. "

" काय ? तरुणी ! तूं हें मला काय सांगत आहेस, याचा विचार केला आहेस काय ? "

" महाराजांना, ह्या गोष्टीची सत्यता दाखविण्याकरितांच मी आतां आलें आहे. चला—महाराज, आपण प्रत्यक्ष डोळ्यानें पहा आणि आपली खात्री करा. "

महाराज एकदम उठले.

यशोधरेनें महाराजांना त्या गुप्तद्वाराजवळ आणून उभें केलें. नंतर ती हात जोडून पुनः हलक्या स्वरानें म्हणाली, " महाराज, आतां मी आपणांस जो एक प्रकार दाखविणार आहे, तो आपण शांत चित्तानें अवलोकन करा. आणि त्याचा नीट विचार करून आपली चांगली खात्री करून घ्या. आपली

राणी आणि अमात्य हीं दोषी आहेत अशी आपली खात्री झाली म्हणजे मग आपणास योग्य दिसेल तें करून त्या दोघांना त्यांच्या पापाचें प्रायश्चित्त द्या, इतकीच माझी आपणास हात जोडून विनंति आहे. ”

“ ठीक आहे, त्या दुष्टांना कोणतें प्रायश्चित्त द्यावयाचें त्याचा मी विचार केला आहे. चल दाखीव मला तीं दोघेंजण—” हातांतील तरवार म्यानरहीत करून महाराज म्हणाले.

“ तें काम माझें ! ” असें म्हणून यशोधरेनें वसंतविजयाच्या सहाय्यानें तें गुप्तद्वार हळूच उघडलें. त्याबरोबर आंतील प्रकार दिसूं लागला. राणी दामिनी मंचकावर बसली होती आणि अमात्य अनंगसेन तिच्या बाजूला उभा होता.

“ मला खरी गोष्ट कळल्याशिवाय मी मुळींच तुमच्याशीं बोलणार नाहीं.” राणी म्हणाली.

“ अशा आनंदाच्या वेळीं त्या गोष्टी कशाला ? ” अमात्य म्हणाला. “ आतां तुझी इच्छाच आहे तर सांगतों. आज प्रातःकाळीं युवराज सर्व सैन्यासह नगर सोडून गेला ही बातमी कळतांच मला मोठा विचार पडला. त्याचे अलीकडे काय बेत चालू होते, ते मला कळलेच नाहींत. परंतु तितक्यांत मी महाराजांना भेटून ‘ युवराज बंडास प्रवृत्त झाला आहे ’ असें त्यांना भासविलें आणि युवराजास पकडण्याचा हुकूम मिळविला. परंतु त्या थेरड्याला आपलें कारस्थान काय माहित ! मला हुकूम मिळतांच मी दोन मनुष्यें तयार केलीं आणि त्यांना पांच हजार मोहोरांचें बक्षीस देऊं करून युवराज मिळेल तेथें त्याचा खून करण्याचा हुकूम दिला. ”

“ पण खरं का हें ? वाः मग तर आतां आपल्या मार्गांतील एक मोठाच कांटा दूर झाला म्हणायचा ! ” हर्षयुक्त स्वरानें राणी म्हणाली.

“ मग ह्या कामगिरीबद्दल आम्हाला काय बक्षीस ? ”

“ मी मुळीं आपलीच आहें ! मी काय आपणास बक्षीस देणार ! ” असें म्हणून राणीनें एकदम अमात्याच्या गळयाला मिठी मारिली.

अरेरे ! पण हें काय ?

दरवाजा धाडकन् उघडला आणि क्रोधानें संतप्त झालेला राजा एकदम आंत आला. त्याचें मुखमंडळ क्रोधातिरेकानें अगदीं लालबुंद होऊन गेलें होतें. त्याचे नेत्र जणूं काय अग्निस्फुलिंगाचा वर्षाव करीत आहेत असा भास

होऊं लागला. त्याच्या हातांतील नग्न तरवार थरथरत होती. आंत येतांच महाराज कर्कश क्रोधकंपित स्वरानें गर्जना करीत म्हणाले, " दुष्टानों ! भोगा आपल्या कर्माचीं फळं ! "

परस्परांना आलिंगन देतांना क्षणभर एकत्र झालेलीं, अमात्य आणि राणी यांचीं शिरकमळें महाराजांच्या वारामुळें धडापासून वेगळीं होऊन धडाधड जमिनीवर पडलीं !

* * * *

इतक्यांत महालाचा मुख्य दरवाजा उघडून एक तरुण आंत आला. परंतु आंतील तो भयंकर देखावा पाहून तो तरुण जागच्या जागीं थबकला ! वाचकहो, तो तरुण कोण असावा, असें आपणास वाटतें ? पण थांबा—ती पहा यशोधरेला ओळख पटली ! "

" कोण विनोददादा ? "

" काय यशोधराताई ? "

त्या बहिणभावंडांच्या मुखांतून एकाच वेळीं उद्गार बाहेर पडले. हा प्रकार पाहून महाराजांनाहि आश्चर्य वाटलें. त्यांचा राग आतां पुष्कळ शांत झाला होता. ते आपणाकडे पहात आहेत असे पाहून विनोद पुढें झाला. व अत्यंत नम्रतेनें प्रणिपात करून म्हणाला, " महाराज येथील हा भयंकर प्रकार पाहून मी येथें अयोग्य वेळीं आलों असें मला वाटतें. परंतु माझें कार्य फारच महत्त्वाचें आहे, तेव्हां काळवेळाचा विचार न करतां आपली कामगिरी बजावणें, हें माझें कर्तव्य आहे. मी कोठून आलों आहें, हें ही बहुमूल्य मुद्रिका महाराजांस सांगेल. " असें म्हणून त्यानें आपल्या मस्तकावर धारण केलेल्या फेट्यांतून एक मुद्रिका काढली आणि ती महाराजांच्या पुढें केली.

" माझा बालमित्र मयुराधिपति भद्रसेन याची ही मुद्रिका ! "

" होय. त्यांचीच ही मुद्रिका. सांप्रत आमच्यावर परचक्र आलें आहे. महाराणा धुंडपाळ यानें आपल्या बाहुबलावर राजनंदिनी सुहासिनी आपल्या नाटक शाळेंत नेण्याचा निश्चय केला आहे. परंतु राजबाला आपल्या युवराजावर अनुरक्त असल्यामुळें ही मुद्रिका देऊन आमच्या महाराजांनीं मला आपणाकडे पाठविलें आहे आणि अशी विनंति केली आहे कीं, राजकुमारीचा आपल्या युवराजाकरितां स्वीकार करावा आणि आपला पुरातन स्नेहसंबंध जागृत करून हा नवीन व्याहीसंबंध जोडावा."

" पण युवराज कुठें आहे ? तो नगर सोडून—"

" राजकन्या सुहासिनी हिची संकटांतून मुक्तता करण्याकरितांच गेले आहेत. " यशोधरेनें महाराजाचें निराशयुक्त वाक्य आशाजनक शब्दांनीं पूर्ण केलें.

" काय ?—युवराज तिची मुक्तता करण्याकरितां गेला आहे ?—पण हें शक्य नाहीं. तो बंड करण्याच्या उद्देशानें—"

" छे छे ! महाराज, हें सर्व अमात्याचें कारस्थान आहे. आतां थोड्याच वेळापूर्वी आपण त्यांच्याच तोंडचीं वाक्यें ऐकलीं आहेत. अद्यापि आपल्या शंकेचें निरसन झालें नाहीं काय ? "

" होय, आतां आलें माझ्या लक्षांत ! " असें म्हणून स्वतःच्या रक्तांत लोळत पडलेल्या अमात्याच्या शवाकडे महाराजांनीं क्रोधानं पाहिलें. "चांडाळा, माझा सर्वस्वी घात करूं पहात होतास काय ? अरेरे ! जग हें किती दुष्ट आहे पहा ! ही चांडाळीण—प्रत्यक्ष आपल्या पतीला—"

" महाराज, आतां त्या गोष्टीची पुनः पुनः आठवण करण्यांत काय अर्थ आहे ! जग दुष्ट असलें तरी ईश्वर न्यायी आहे, हा सत्य सिद्धान्त आपल्या प्रत्ययास आला ना ? मग आतां उगाच दुःख करण्यांत काय अर्थ आहे ! " यशोधरेनें आपल्या कोमल भाषणानें महाराजांचा राग शांत केला.

राणी आणि अमात्य यांच्या शवांची नीट व्यवस्था लावल्यावर ती सर्व मंडळी पुनः राजप्रासादांत आली. महाराजांचें मन अगदीं उदास झालें होतें. तथापि यशोधरेनें आपली सर्व हकीकत सांगून मित्रकार्य करण्यास महाराजांचें मन तयार केलें.

# ३

## प्रथम दर्शन  १

आनंद कुंजांत ही प्रतिभाशालिनी कोण बरें ? तिनें साधें वस्त्र परिधान केलें असलें, किंवा मोजके अलंकार घातले असले, तरी तिच्या सौंदर्यराशी-वरून तिची सहज ओळख पटण्यासारखी आहे. ती राजबाला सुहासिनी होती. पुढल्या आशेवर आज अज्ञातवासांत ती ह्या ठिकाणीं दिवस कंठीत होती. त्यावेळीं सायंकाळ झाला होती. सुहासिनी आपल्या वस्त्रांत सुवासिक नवप्रस्फुटित पुष्पकलिका घेऊन एकाग्र मनानें पुष्पहार गुंफित बसली होती. फुलांच्या मधुर सुवासानें सर्व आनंदकुंज दरवळून गेलें होतें. पुष्पहार गुंफित असतांना तिच्या हातांतील कंकणाचा मंजुळ किंकिणध्वनि होत होता. ती आपल्या उद्योगात निमग्न असतांना तिची सखी हळु हळु मागून आली. आणि तिची थट्टा करण्याच्या उद्देशानें मागेंच उभी राहिली. थोड्या वेळानें हार तयार होतांच उंच हात करून सुहासिनी म्हणाली, " हे इच्छितवरदायिनी चंडीमाते ! हा हार जीवितेश्वराच्या कठांत घालण्याचा सुदिन केव्हां उगवेल ? "

मागें उभी असलेली सखी तो हार वरच्यावर तिच्या हातातून काढून घेणार इतक्यांत दूर चरत असलेलें हरिणबालक एकाएकीं भयाभीत होऊन वायुगतीनें पळत त्यांच्याजवळ आलें.

" कां बरं हें हरिण दचकलें ? " सुहासिनीनें मागें वळून पाहिलें तों कोकिळा उभी ! " कोकिळे, कांहीं तरी विनोद करण्याच्या हेतूनें तूं उभी होतीस वाटतं ? "

कोकिळेनें फक्त हास्यवदन केलें. आणि हरिणाच्या पाठीवरून हात फिरवीत ती म्हणाली—

" ताईमहाराज, पहा पहा, ह्या स्वेच्छाचारी हरिणबाळाचें हृदय किती धड धड उडत आहे तें ! मला वाटतं तें चरतांना भ्यालं असेल. "

" खरंच गडे ! कां बरं हें इतकं भ्यालं ? चल, कोकिळे, आपण तेथें जाऊन पाहूं या. "

" नको. ताईमहाराज, कदाचित् एखादं हिंस्र श्वापद तेथें आलं असेल आणि त्याला पाहून हरिणबाळ भ्यालं असेल."

" मग तर उत्तमच! अनायासें शिकार मिळाली म्हणायची! जा कुंजांतून विनोदाचं धनुष्य घेऊन ये."

कोकिळा कुंजांत जाऊन क्षणभरानें धनुष्य घेऊन आली. तेव्हां त्या दोघी मैत्रिणी हळुहळू हरिण पळत आलें त्या दिशेला जाऊं लागल्या. त्या वेळीं आनंदकुंजांतील मंद सुगंधशीतल वायूनें हिल्लोलित होणाऱ्या कुंजकलिका त्या गजगामिनी सुहासिनीच्या परम मनोरम लावण्यसंपन्नतेकडे पाहून लज्जित झालेल्या—वांकलेल्या दिसूं लागल्या. सुहासिनी आपल्या हातांतील धनुष्य सज्ज करीत समोरचा प्रदेश निरीक्षण करीत गजगतीनें चालत होती. अद्यापि तिच्या हातांत नुकताच गुंफलेला पुष्पहार होता. ती पुढें पहात असतां दूर अंतरावर एक अश्व पडला असून त्याच्यामागें लहानशी पताका फडकत आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. अश्व स्वाररहित असून जमिनीवर निचेष्टित पडला होता. तेव्हां तो काय प्रकार असावा याची त्यांना कल्पना होईना. सुहासिनी लवकर लवकर चालूं लागली. जवळ जातांच एक हृदयद्रावक देखावा तिच्या दृष्टीस पडला! ती जागच्या जागीं अडखळली! तिच्या अंतःकरणास दारुण यातना होऊं लागल्या. भय आणि विस्मय या विकारांनीं तिचें हृदय कल्लोलित होऊन निमिषार्धांत कितीतरी कुतर्क तिच्या मनांत येऊन गेले. वाचकहो, आमच्या नायिकेची अशी भीतिव्याकुळ स्थिति होण्याचें काय बरें कारण असेल? आसनीं शयनीं जी चिरसुंदरमूर्ति तिच्या हृदयात वास करीत होती, तीच तिच्या हृदयेश्वराची अनंत रूपशेखर मूर्ति, चैतन्यहीन होऊन पडलेल्या अश्वाजवळ धरणीवक्षावर रक्तानें नखशिखान्त नाहलेली पडली होती! तिचें मुखकमल तत्क्षणीं कोमेजून गेलें. ती हळुहळू पुढें झाली आणि अश्रुयुक्त नेत्रांनीं वांकून पाहूं लागली. तोंच तिच्या हातांतील पुष्पहार गळून खालीं निचेष्टित पडलेल्या स्वाराच्या शोणितस्रावानें लाल झालेल्या कंठांत मेजका जाऊन पडला. परंतु तें तिच्या लक्षांत आलें नाहीं तिनें वर मान करून आपल्या मस्तकावर असलेल्या अनंत विस्तृत नीलाकाशाकडे अश्रुपूर्ण नयनांनीं पाहिलें आणि हात जोडून रुद्धकंठानें कातर स्वरांत ती म्हणाली, " हे दयामय, अनंतशक्तिमान् प्रभो! मी हें काय पहात आहें—"

" ताई महाराज ! आपला पुष्पहार ह्या चलनरहित तरुणाच्या गळ्यांत पडला. पहा—" मध्येंच कोकिळा म्हणाली.

" काय ! "

सुहासिनी दचकली ! तिनें पुनः खालीं वांकून पाहिलें, आणि ती क्षीण स्वरानें पुढें म्हणाली, " कोकिळे, शेवटीं पुष्पहारानें आपलें स्थान मिळविलें पण मी अभागिनी—"

" काय—काय म्हणतां ताईमहाराज ? हे युवराज अमरसिंह ? पण पहा—थांबा—थांबा—त्यांना चेतना होऊं लागल्या—"

तत्काळ सुहासिनीनें खालीं बसून युवराजाच्या हृदयाला स्पर्श केला. तोंच वसंतवायुची झुळूक येऊन ज्याप्रमाणें माधवी–लता कंपित व्हावी, त्याप्रमाणें राजनंदिनीची तनुलतिका कंपायमान झाली. तिनें दोन्ही हात पुढें करून युवराजाचें मस्तक वर उचललें. परंतु शांत तरंगानीं सरोवरांतील थरथरणाऱ्या मृणालिनीप्रमाणें राजकुमारीचें बाहुयुगुल थरथर कापूं लागलें. तिनें राजपुत्राचें मस्तक आपल्या मांडीवर ठेविलें.

" जा—जा कोकिळे, पळत जा. आणि कुंजांतून पाणी घेऊन ये. "

युवराजाच्या उजव्या बाहूंत एक तीर घुसला होता. दुसरा तीर अश्वाच्या मानेंत शिरला होता. दोन्हीं तीर एकाच वेळीं उजव्या बाजूनें आले होते. पहिल्या तीरानें अश्व गतप्राण होऊन पडला आणि दुसऱ्या तीरानें स्वाराला भयंकर जखमी करून खालीं पाडलें. कोकिळा पाणी आणण्याकरिता जातांच सुहासिनीनें मोठ्या कौशल्यानें युवराजाच्या बाहूंतील तीर बाहेर काढला, तरी त्यांतून थोडा थोडा रक्तस्राव होऊं लागला तेव्हां तिनें तात्काळ आपला पदर फाडून त्याच्या लांब फडक्यानें ती जखम बांधून टाकिली. नंतर ती हळुहळू पदरानें वारा घालूं लागली. बराच वेळ तिचा हा क्रम चालू होता. वारा घालीत असतां ती आपल्या हृदयेश्वराचें भुवननिधान रूप एकाग्रचित्तानें पहात होती. आज तिला हें हृदयवल्लभाचें प्रत्यक्ष दर्शन होत होतें ह्यापूर्वी तिनें फक्त युवराजाची तसबीर पाहिली होती. परंतु ती मूर्ति तिनें आपल्या हृत्पटलावर कायमची खोदून ठेविली होती, अशा त्या सर्वतोपरि सुखदायक मूर्तीचें प्रत्यक्ष सौंदर्य नेत्रांनीं अवलोकन करीत असतां क्षणोक्षणीं तिचें अंतःकरण आनंदानें उचंबळून येत होतें. त्यावेळीं तिच्या मनांत कोठले बरे विचार येत होते ?

थोड्या वेळानें युवराज शुद्धीवर आला. त्यानें हळूच आपलें नेत्र उघडले. परस्परांची प्रथम दृष्टिभेट झाली. परंतु त्या भेटींत सुहासिनीची काय स्थिति झाली ! आनंदातिशयानें व आशेनें तिचें सर्व शरीर रोमांचित होऊन तिच्या हृदयाला कंप सुटला. लज्जेनें तिनें एकदम आपली मान खालीं घातली.

राजपुत्र आश्चर्यातिरेकानें विस्मित झाला. चित्ताकर्षक करणाऱ्या एका चारुगात्रीचे लज्जावनत, चंचल, विशाल असे तेजपूर्ण नेत्र, तिच्या मुखावर विलसणारें रुचिर सारल्य आणि तिनें अधोवदन करतांना फेंकलेला हृदयभेदी कटाक्ष पाहून अशा अमृतमयी किशोरी रूपवतीच्या मांडीवर आपण आराम घेत आहोंत, हा देखावा सत्यसृष्टींतील कीं, स्वप्नसृष्टींतील आहे, याची त्याला भ्रांति पडली ! त्यानें पुनः एकदां त्या सौंदर्यशालिनीच्या मुखाकडे पाहिलें, त्यावेळीं सुहासिनीच्या मुखमंडलावर अतुल स्वर्गीय प्रभा विलसत होती. तिच्या अधरावर सुधामधुर मृदु स्मित शोभत होतें. हा दृश्य प्रकार पाहून ही निसर्गसुंदर तरुणी कोणी देवांगना आहे, किंवा अप्सरा आहे, अथवा किन्नरी आहे, असा साहजिक प्रश्न त्याच्या मनांत उद्भवला. ती आश्चर्यजनक मायाविनी कोणी जरी असली तरी आपण तिच्या मांडीवर सहज निद्रासुख अनुभवित आहोंत, हा काय प्रकार आहे, हें त्याच्या लक्षांत येईना. त्यानें आपले नेत्र पुनः मिटून घेतले. व आपण येथें कसे आलों याचा तो विचार करूं लागला. ह्या विचाराची जागृति होतांच त्याला एक भयंकर वेदना झाली. नंतर त्याच्या उजव्या बाहूंतून हळुहळू असह्य वेदनेचे वेग येऊं लागले. त्याबरोबर सर्व गोष्टी तात्काळ त्याच्या लक्षांत आल्या. त्यानें पुनः नेत्र उघडले. आणि आपल्या हाताकडे पाहिलें. तेव्हा आपला सर्व हात आणि कपडे रक्तानें लाल झाले असून बाहूला फडका गुंडाळला आहे असें त्याला दिसून आलें. इतक्यांत कोकिळा पाणी घेऊन आली. तेव्हा उठण्याचा प्रयत्न करीत युवराज म्हणाला, " हे परोपकारी तरुणीनों, तुम्हीं कोण आहांत ? आणि येथें अशा निर्जन वनांत कशा आलांत ? "

" महाराज, आम्हीं येथें तृणपर्णाच्छादित पर्णकुटिकेंत राहणाऱ्या वनबाला आहोंत, येथें कुंजांत वनक्रीडा करीत असतांना आमचें हें हरिणबालक भयभीत होऊन पळत आले. तें एकाएकीं इतकें भ्यालें कां, तें पाहण्याकरितां आम्ही येथें आलों तों आपण असहाय स्थितींत पडलेले होतां. " कोकिळा पुढें होऊन म्हणाली.

क्षणभरानें युवराज बसला आणि त्यानें प्रथम पाण्याचा एक घोट घेतला. आतां त्याला बरीच हुशारी वाटूं लागली. तो आतां पुढें बोलणार तोंच घोड्याच्या पावलांचा आवाज ऐकूं येऊं लागला. ते सर्वजण त्या दिशेला पाहूं लागले. इतक्यात वायुगतीनें घोडे पिटाळीत वीस स्वारांची एक तुकडी त्यांच्याजवळ आली. युवराज दृष्टीस पडतांच तात्काळ सर्वांनीं आपले घोडे थांबविले. आणि त्यांतील पुढें असलेल्या स्वारानें अश्वावरून उडी टाकिली.

"युवराज, आम्ही हें काय पहात आहोंत ?" प्रणाम करीत तो स्वार म्हणाला, "आपणास ह्या जखमा कशा झाल्या ? ह्या तरुणी कोण ?"

"सेनानायक, हा काय प्रकार झाला, हें मला देखील नीट कळलें नाहीं. तुम्हाला सोडून मी एकटाच पुढें येत असतां एकाएकी दोन तीर आले आणि हा प्रकार झाला. दंडांत तीर घुसतांच मी शुद्धिरहित अश्वावरून खालीं पडलों आणि इतक्यांत ह्या परोपकारी तरुणींच्या सहाय्यानें देहभानावर आलों."

सेनानायकानें संशयी मुद्रेनें सुहासिनी आणि कोकिळा यांच्याकडे पाहिलें. नंतर त्यानें आपली दृष्टि त्या प्रशांत प्रदेशांत चोहोंकडे फिरविली. परंतु संशयास्पद असें त्याला कांहींच दिसलें नाहीं. फक्त दूर एक प्रचंड सेना समूह येत होता. क्षणभर तो त्या दिशेकडे पहात राहिला. तितक्या अवधींत त्याला एक निराळीच शंका आली. तो म्हणाला, "युवराज, हे तीर कोठून आले, व कोणी फेंकले याचा मी आतांच तपास सुरू करतों. आपली सेना अगदीं जवळ आली आहे. तेव्हां प्रत्येक योद्ध्याकडून हें वन मी शोधायला लावतों. पण मला असें वाटतें कीं, ह्या गोष्टीच्या मुळाशीं आपल्या अमात्याचें कारस्थान असेल."

"होय. मलाहि तीच शंका येते." हे शब्द उच्चारित असतां युवराजास जखमेच्या अत्यंत वेदना होत होत्या असें त्याच्या शब्दोच्चारावरून दिसलें.

"महाराजांनीं अशा उघड्या जागेंत न राहतां येथून जवळच आमची पर्णकुटिका आहे तेथें चलावें, अशी माझ्या सखीची इच्छा आहे." कोकिळा आपल्या स्वामिनीच्या इच्छेप्रमाणें पुढें होऊन नम्रपणानें बोलली. "आम्हीं रानावनांत राहणाऱ्या वेडगळ वनबाला आहोंत. महाराज थोर आहेत, त्याचें आदरातिथ्य कसें करावें, हें आम्हांला कळणार नाहीं, तथापि त्याकडे लक्ष न देतां आमचा वेडावांकडा पाहुणचार स्वीकारून महाराज आमची सेवा गोड करून घेतील, अशी माझ्या सखीची खात्री आहे.

महाराज आमच्या पर्णकुटिकेंत आल्यावर आम्हांला महाराजांच्या जखमेला योग्य औषधोपचार करतां येईल. ”

युवराजास जखमेच्या जरी अत्यंत वेदना होत होत्या, तरी तो कोकिळेचें भाषण मोठ्या कौतुकानें ऐकत होता.

“ आपली पर्णकुटिका येथून किती लांब आहे ? ” सेनानायकानें मध्येंच विचारलें.

“ येथून जवळच आहे. तो पहा—कुंज दिसतो, तेथेंच आमची पर्णकुटिका आहे. ”

थोड्या वेळांत सेनानायकानें युवराजास पर्णकुटिकेंत नेण्याची तयारी केली.

---

## आनंदकुंजवासिनी २

सेनानायकानें इतर सैनिकांच्या सहाय्यानें युवराजास हळूच उचलून आनंदकुंजांत आणलें. अतिशय रक्तस्राव झाल्यामुळें युवराजास फारच अशक्तता वाटूं लागली. वाटेनें येत असतां सुहासिनी आणि कोकिळा पुढें काय करावयाचें याचा बेत करीत होत्या. आपण कोण हें युवराजास इतक्यांतच कळूं द्यावयाचें नाहीं असा त्यांनीं विचार ठरविला. आणि मंडळीच्या पूर्वी येऊन आपल्या पर्णकुटिकेंत युवराजास उठण्याबसण्याची एका प्रशस्त जागीं व्यवस्था केली. हळुहळू सर्वजण कुंजांत आले. आतां सर्व आनंदकुंज गजबजलेलें दिसूं लागलें. युवराजाची पर्णकुटिकेंत व्यवस्था लावल्यावर सेनानायकानें आपल्या तरुण स्वामीवर मागून हल्ला झाल्याची हकीकत सर्व योध्यांस कळविली. आणि पुढें काय करावयाचें तें सांगितलें. आपल्या युवराजास कोणी दुष्टानें मागून तीर फेंकून जखमी केलें, असें कळतांच प्रत्येक योध्यानें त्या वनाचा प्रत्येक कोना कोपरा शोधला. परंतु त्यांच्या दृष्टीस कोणीच पडलें नाहीं.

इकडे सुहासिनीनें आपल्या सखीच्या मदतीनें युवराजाची जखम स्वच्छ धुवून त्यावर औषधोपचार केला. आणि श्रमपरिहार्य थोडें दूध आणि फळफळावळ आणून त्याच्यापुढें ठेविलें. तेव्हां युवराज म्हणाला, “ हे सुंदरी, आज तूं माझे प्राण रक्षण करून मला जन्मभर ऋणी करून ठेविलें आहेस.

मला तुझें पवित्र नांव कळेल तर तें ईशनाम स्मरणाप्रमाणें मी आपल्या हृत्पटलावर अक्षयीचें कोरून ठेवीन."

"मला आनंदकुंजवासिनी असें म्हणतात." सुहासिनी म्हणाली, "आणि ही माझी सखी कोकिळा."

सुहासिनीनें उत्तर दिलें परंतु उत्तर देतांना तिच्या मनाची काय स्थिती झाली होती? आपल्या प्राणेश्वराच्या निकट सान्निध्यामुळें तिच्या हृदयांत आनंदोर्मि उचंबळत होत्या. 'मला आनंदकुंजवासिनी म्हणतात,' हें वाक्य मुखांतून बाहेर पडतांना, मी आपली हृदयवासिनी आहें' हें वाक्य तिच्या मनांत घोळत होतें. आणि चंचल कटाक्ष बाण फेंकणारे तिचे नयनयुगुल प्रत्येक फेंकीला आपली अनुरक्तता व्यक्त करीत होते. युवराज इतका दुःखी होता, तरी ते मंजुळ वीणाझणत्कारासारखे सुहासिनीच्या कोमल कंठांतून बाहेर पडलेले शब्द ऐकून क्षणभर दुःखभानरहित झाला. तो तिच्या सौंदर्य राशीपरिपूर्ण मुखमंडळाकडे तटस्थ पहात राहिला. इतक्यांत सेनानायक पुढें होऊन म्हणाला, "युवराज, आपण ज्या पवित्र कार्याकरितां इतक्या तांतडीनें निघालों, त्या कार्यात् प्रस्तुत हे एक मोठें विघ्न आलें."

"होय. परंतु आतां मला देखील त्या पवित्र कार्याविषयीं संशय येऊं लागला आहे. कारण मला राजकुमारीचा कंकणसंदेश देतांना त्या तरुणानें संकटग्रस्त मयुरनगरीविषयीं जें कांहीं सांगितलें, त्यांतील कांहींच प्रकार येथें दिसून येत नाहीं. कारण आपण आतां मयूरनगरीच्या अगदीं जवळ आलों आहोंत."

"जवळ म्हणजे सांप्रत आपण मयूरनगरीच्या सरहद्दींतच आहोंत!"

"होय. म्हणूनच तर मला जास्त आश्चर्य वाटतं"! पुनः युवराज म्हणाला, "कारण कंकणसंदेश देणाऱ्या त्या तरुणाच्या सांगण्याप्रमाणें मयूरनगरीवर परचक्र आलें असतें, तर नगरीच्या आसमंतांतील हें वन इतकें शात कसें राहिलें असतें! आणि शत्रूनें ह्या सुंदर वनाची ही सुन्दरता येथें कशी टिकूं दिली असती?" असें म्हणून युवराजानें आपणाकडे सलज्ज पहात असलेल्या सुहासिनीकडे पाहिलें. युवराजाच्या भाषणाचा गूढार्थ तिच्या लक्षांत आला. इतकेंच नव्हे तर तिच्या चाणाक्ष सखीच्या—कोकिळेच्याहि तो आला. तेव्हां ती पुढें होऊन विनयानें म्हणाली, "महाराज कुठलें पवित्र कार्य अंगिकारून ह्या प्रदेशांत आले आहेत, हें जरी मला माहिती नाहीं, तरी त्यांना येथें येण्यापूर्वी कळलेली हकीकत सत्य आहे. मयूर नगरीवर परचक्र

येऊन गेलें. आणि महाराजांस कल्पना होणार नाहीं अशी अमानुषरीतीनें शत्रूनें नगरीची विटंबना करून नगरीचे स्वामी चतुर्भुज करून नेले आहेत. आतां महाराज म्हणतात त्याप्रमाणें ह्या सुन्दर वनाची सुंदरता शत्रूला हरण करतां आली नाहीं, याचें कारण ही सुंदरता ह्या वनाला परचक्रानंतर प्राप्त झाली आहे. "

" मग सांप्रत जरी तुम्ही वनवासिनी असलांत तरी पूर्वीं नगरवासिनीच होतां म्हणायच्या ! "

" होय. आपण केलेला तर्क बरोबर आहे. आम्ही दुर्दैवी मयूरनगरवासिनी असून शत्रूकडून होणारी विटंबना टाळण्याकरितांच हा वनवास स्वीकारला."

" मग हे परोपकारी तरुणींनो ! मयूरनगरीविषयीं कांहीं जास्त माहिती तुम्ही मला देऊं शकाल काय ? " राजपुत्रानें विचारलें.

स्वतःविषयीं युवराजास आतां सांगावें असा विचार प्रथम सुहासिनीच्या मनांत आला. परंतु तत्काल तिचें मन बदललें. आपण पाठविलेल्या कंकण-संदेशाप्रमाणें संकटकाळीं आपल्या सहाय्यार्थ युवराज आले, ते केवळ कर्तव्य म्हणून आले किंवा त्या कर्तव्यांत कांहीं प्रेम आहे, याची शहानिशा करण्याचा तिनें निश्चय केला. आपण पाठविलेलें कंकण युवराजानें कुठें ठेविलें आहे, हें अद्यापि तिला कळलें नव्हतें. आणि तें जर तिला त्यावेळीं कळलें असतें, तर कदाचित् तिनें नुकताच केलेला निश्चय डळमळला असता. कारण युवराजानें तें कंकण प्रतिज्ञा करून आपल्या हातांत घातलें होतें, तें अद्यापि वरील वस्त्रामुळें तिच्या दृष्टीस पडलें नव्हतें. सुहासिनी कांहीं बोलत नाहीं असें पाहून कोकिळा म्हणाली, " महाराज, मयूरनगरीविषयीं जास्त माहिती ती आम्हाला काय असणार ? धुंडपाळमहाराण्यानें आमच्या महाराजांना पराजित करून सर्व नगरीचा उध्वस्त केला. परंतु त्याचें इच्छित-कार्य साध्य झालें नाहीं असें वाटतें. "

" त्याचें इच्छित कार्य कोणतें ? "

" आमच्या रूपशालिनी सुहासिनीताईमहाराज. त्यांची अपेक्षा धरून तो तेथें आला होता परंतु त्या त्याच्या हातीं लागल्या नाहींत असें वाटतें. कारण युद्धसमाप्तीनंतर त्यानें ताईमहाराजांकरितां सर्व नगरीचा कोनाकोंपरा देखील धुंडाळून पाहिला. "

ही हकीगत कळतांच राजपुत्राचें मन अस्वस्थ झालें. कारण आपण

प्रतिज्ञा करून निघालों असतांहि आपण येण्यापूर्वीच शत्रूनें आपला कार्यभाग साधला असें त्याला वाटलें. युवराजाची खिन्न मुद्रा पाहून प्रीतिप्रफुल्ल नेत्रांनीं त्याच्याकडे पहात त्याला पुनः उत्साही करण्याच्या हेतूनें सुहासिनी आपली स्निग्ध व प्रेममय दृष्टि त्याच्या मुखकमलाकडे रोंखून म्हणाली, " युवराज-महाराजांची स्वारी स्वसैन्य आमच्या सहाय्यार्थ आली होती, असें दिसतें. परंतु उशीरां आल्यामुळें येथें जो होऊं नये तो प्रकार झाला. तथापि अद्यापि कांहीं वेळ गेली नाहीं. शत्रूवर चाल करून आमच्या महाराजांची मुक्तता केल्यास आमच्या महाराजांना सहाय्य केलें असेंच होणार आहे. "

" होय. प—ण—"

युवराज अडखळला आणि सुहासिनीनेंहि पुढें कांहींच प्रश्न केला नाहीं. कारण युवराजाच्या भाषणांत ' पण ' कां आला हें तिनें जाणलें. फक्त ती राजपुत्राच्या वदनमंडळाकडे प्रेमपूर्ण दृष्टिनें पहात राहिली.

जवळ जवळ दोन आठवडे लोटले. सुहासिनीच्या सात्विक पण मुग्ध प्रेमचेष्टांनीं युवराजाला पूर्णपणें अंकित करून टाकलें. त्याची जखम आतां साफ बरी झाली होती परंतु त्याचें मन मात्र निरोगी नव्हतें. त्याला राहून राहून आपल्या प्रतिज्ञेची स्मृति होई. ' कंकण धारण करणारा हात आपल्या विजयी हातांत धरून पितृदर्शनाकरितां येईन, नाहीं तर देह धारातीर्थी ठेवीन. ' ह्या प्रतिज्ञेच्या स्मृतिबरोबर त्याचें अंतःकरण विव्हळ होई. केवळ आपल्या अविचारामुळें आपण एका तरुणीला बांधले गेलों असें आतां त्याला वाटूं लागलें. आणि त्यामुळेंच त्याला सुहासिनीच्या प्रणयपूर्ण दृष्टीला आपली दृष्टि देतां येत नव्हती.

---

## सत्त्वपरीक्षा ३

जिच्याकरितां आपण इतकी घोर प्रतिज्ञा केली, ती राजबाला कशी आहे, याची अमरसिंह राजकुमाराला कांहींच कल्पना होईना. त्यानें आपल्या सेनानायकाकडून मयूरनगरीच्या राजकुमारीचा पुष्कळ शोध केला. परंतु ह्या वेळपर्यंत तिचा त्यांना कांहींच पत्ता लागला नाहीं. रोज त्याचीं सेनानायका-बरोबर गुप्त खलबतें होत. सुहासिनी आणि कोकिला हा सर्व प्रकार मोठ्या कौतुकानें अवलोकन करीत होत्या. युवराज आपल्या घट्ट प्रेमपाशांत बद्ध

झाला असतां उघड कबूली अद्याप कां देत नाहीं, याचें कारण सुहासिनीच्या केव्हांच लक्षांत आलें, कारण राजपुत्र एकटाच असतांना प्रतिज्ञेनें हातात घातलेल्या कंकणाकडे पाहून दुःखपूर्ण सुस्कारे सोडतांना तिनें कैकवेळा पाहिलें. त्याला ओळख द्यावी असेंहि तिच्या मनांत पुष्कळदां आलें. आणि ओळख द्यावयाची असती तर तिला ती शब्दानें देखील देण्याची आवश्यकता नव्हती. फक्त राजपुत्राच्या हातांत असलेल्या कंकणाच्या जोडीचें कंकण आपल्या हातांत घालून तें तिनें त्याच्या दृष्टीस पाडलें असतें, म्हणजे सहजीं शंका उद्भवून ओळख पटली असती.

परंतु तसें करण्याचा राजकुमारीचा विचार नव्हता. आपला पूज्य पिता शत्रूच्या कारागृहांत आहे, त्याबद्दल जरी तिला क्षणोक्षणीं असह्य दुःख होत होतें. आणि त्याच्या मुक्ततेकरितां जरी तिची गुप्त रीतीनें तयारी चालू होती, तरी युवराजाजवळ असता तिनें आपल्या हास्य आणि प्रणयपूर्ण दृष्टींत अंतःकरणांतील दुःखाचा स्फोट होऊं दिला नाहीं. जिचें कंकण आपण धारण केलें आहे, तीच आपण, असे राजपुत्राला कळतांच तो स्वाभाविकच आपल्या पित्याच्या मुक्ततेकरितां धांवून जाईल; परंतु जिचें कंकण आपण धारण केलें आहे, त्या राजबालेचा शोध लागत नाहीं तेव्हां निराश होऊन राजपुत्र कर्तव्यच्युत होतो कीं काय ? हेंच तिला पहावयाचें होतें. आणि म्हणूनच ती योग्य संधी मिळतांच त्याच्यावर प्रेमाचे दृढपाश टाकीत होती.

हळूहळू दिवस संपून संध्याकाळ झाला. आकाशांतील नक्षत्रांची ज्योति अधिकाधिक उज्ज्वल होऊं लागली. आनंदकुंजाला विशेष नयनमनोहरत्व प्राप्त होऊं लागलें. लतातरूंवरील उमलणाऱ्या सुगंधित पुष्पलिकांच्या मधुर सुवासानें दशदिशा दरवळून गेल्या होत्या. अशावेळीं आनंदकुंजांत दोन ठिकाणीं गुप्त मसलती सुरू होत्या. युवराज आपल्या सेनानायकाबरोबर उद्यानांत एका प्रशांत जागीं बसून, आणि सुहासिनी आपल्या सखीबरोबर पर्णकुटिकेंत बसून पुढले बेत करीत होती. आज ह्या गोष्टीचा शेवट लावावा, ह्या उद्देशानेंच सेनानायक आपल्या तरुण स्वामीजवळ बोलत होता. बराच वेळ झाल्यावर युवराज म्हणाला, " सेनानायक, आपण माझें हृद्गत जाणलें, हें मी कबूल करतों. परंतु त्याबरोबर आपण आपला खोटा समज करून घेऊं नका. आपण ज्याकरितां येथें आलों, त्या कार्याबद्दल आतां आपणास कांहींच कर्तव्य उरलें नाहीं, असें आपण समजतां, कीं काय ! ज्या राजबालेच्या

मुक्ततेकरितां मी प्रतिज्ञा करून निघालों तिचा आपणास शोध लागत नाहीं. म्हणून तिच्या पित्याची शत्रूच्या कारागृहांतून मुक्तता न करतां अकल्पित रीतीनें ह्या आनंदकुंजवासिनीचा स्नेहसंबंध झाला, तो दृढ करून तिलाच आपल्या नगरींत घेऊन जावें, हा आपला विचार मला पसंत नाहीं."

"पण महाराज, ही आनंदकुंजाची देवता सर्वगुणसंपन्न असून आपल्या स्वामिनी होण्यास—"

"होय. पण ह्या रमणीच्या प्रेमाकरितां मी केलेल्या प्रतिज्ञेला हरताळ लावावा, असा आपण सल्ला देतां काय ?"

"यांत सल्ला तो काय द्यावयाचा ? कारण सर्व गोष्टी अगदीं उघड आहेत. ज्या राजकुमारीच्या संदेशाप्रमाणें आपण हें कंकण हातीं घातलें आहे, तिचाच जर पत्ता नाहीं, तर तिच्या प्रित्यर्थ केलेल्या प्रतिज्ञेला महत्त्व तें काय राहिलं ?"

"कां बरं ? असं म्हणूं नका ! अशानें रजपुतांच्या प्रतिज्ञेला मान राहणार नाहीं. माझा तर असा निश्चय झाला आहे, नव्हे मी पुनः प्रतिज्ञा करतों कीं, ह्या आनंदकुञ्जवासिनी सुंदरीला आपल्या प्रेमाची ओळख न देतां, ठरल्याप्रमाणें मयूरनगरीच्या महाराजांची शत्रूच्या कारागृहांतून मुक्तता करून आजन्म ब्रह्मचर्य व्रतानें रहावयाचें !"

युवराजाची ही नवीन प्रतिज्ञा ऐकून सेनानायक अगदीं स्तंभित होऊन गेला. आपल्या स्वामीचें मन वळविण्याचा त्यानें शक्य तितका प्रयत्न केला. परंतु त्या प्रयत्नांचा कांहीं एक उपयोग न होतां उलट वस्तुस्थितीचा विपर्यास मात्र झाला. तो काहीं बोलत नाहीं असें पाहून राजपुत्र म्हणाला, "आतां ही एक गोष्ट निश्चयात्मक तर ठरलीच ! आतां आपणास पुढल्या उद्योगाला लागलं पाहिजे. तुम्ही काल म्हणालां होतां, त्याप्रमाणें मयूरनगरवासीजन आपल्या स्वामीला सोडविण्याकरितां खरोखरीच काहीं प्रयत्न करीत असतील तर ठीकच आहे. त्यांना आपणाबरोबर घेऊन संघशक्तीनें शत्रूला तोंड देण्यास आपणास ठीक पडेल. नाहीं तर उद्यां शत्रूस्थानाचा भेद काढून आणण्याची व्यवस्था करा. आतां येथें जास्त दिवस राहणें माझ्या कर्तव्याला आड येणार आहे."

त्याच वेळीं पर्णकुटिकेंत सुहासिनीच्या कोकिळेबरोबर चाललेल्या गोष्टी तितक्याच महत्त्वाच्या होत्या. आपल्या सखीनें युवराजास 'आपण कोण ?'

याची ओळख द्यावी, अशी कोकिळेची इच्छा होती, आणि त्याप्रमाणें ती सुहासिनीचें मन वळवीत होती. परंतु सुहासिनीचा निश्चय फिरला नाहीं. ती म्हणाली, " असं कसं म्हणतेस कोकिळे ? युवराजावर माझं निस्सीम दृढ प्रेम आहे, हें जरी खरें. तथापि माझ्या प्रेमाचा मोबदला म्हणून त्याचें भ्याडप्रेम मला नको आहे. मी कोण हें कळल्यावर त्यांनीं पिताजींच्या मुक्ततेकरितां अस्तन्या सारल्या तर त्यांत विशेष महत्त्व नाहीं. पण मी कोणी तरी निराळीच प्रणयिनी आहे आणि माझ्यावर त्यांचें प्रेम दृढ होत असतां केवळ स्वतःच्या प्रतिज्ञापूर्तीकरितां माझं प्रेम तुडवून जर ते पिताजीच्या मुक्ततेकरितां जातील, तर मला किती आनंद होईल बरें ? मला त्यांच्याविषयीं किती अभिमान वाटेल बरें ? "

" एकंदरीनें अशा बिकट समयीं तुम्ही युवराज महाराजांची सत्त्वपरीक्षाच करणार तर ? "

" होय तसेंच कां म्हणेनास ! "

" आणि ताईमहाराज, कदाचित्—कदाचित्—"

" सखे, तुझी शंका बरोबर आहे. मी योजिल्याप्रमाणें जर गोष्टी घडून न आल्या तर मजसारखी हतदैवी मीच ! "

अशा रीतीनें एकाच गोष्टीचा विरोधभावानें दोन्हीं ठिकाणीं एकाच वेळीं खल चालला होता. शेवटीं बरीच रात्र झाली, असें पाहून कोकिळा म्हणाली, " मग ताईमहाराज, आपल्या अमात्यास काय निरोप कळवायचा ? उद्यां त्यांना आपला कोणता तरी एक निश्चयात्मक निरोप कळलाच पाहिजे. "

" ठीक आहे. त्याची नको तुला काळजी ! आतां मी कसेंहि करून युवराजांच निश्चयात्मक मत काढून घेईन. "

रात्रीचा फलाहार होण्यापूर्वी नित्यनियमाप्रमाणें युवराजानें आपल्या सर्व सैनिकांना भेटून त्यांचें कुशलवृत्त विचारलें. आणि तो आपल्या हृदयमंदिरांत दृढस्थान करूं पाहणाऱ्या देवतेच्या कोमल हस्तांतून फलाहार स्वीकार करण्याकरितां पर्णकुटिकेंत आला. इतक्यांत सेनासमूहांत कांहीं गडबड झाली. सेनानायक आणि युवराज बाहेर काय गडबड आहे ती, पाहण्याकरितां परत फिरले, तों कांहीं सैनिकांनीं चतुर्भुज केलेला एक वृद्ध मनुष्य त्यांच्या दृष्टीस पडला. आपणापुढें विजयपूरचा राजपुत्र उभा आहे, असें पाहून तो वृद्ध मनुष्य आश्चर्यचकित झाला. परंतु लगेच त्यानें आपली

गोंधळलेली वृत्ति स्थिर करून मोठ्या विनयानें प्रणिपात केला. आणि आतां तो कांहीं बोलणार इतक्यांत युवराजांच्या मागें दरवाजाजवळ उभी असलेल्या कोकिळेनें त्याला गप्प राहण्याविषयीं खूण केली आणि स्वतः पुढें होऊन ती म्हणाली, "महाराज! हे माझे वडील असून मयूरनगरीच्या राजदरबारीं यांना एक मोठा हुद्दा होता. परंतु जेव्हां शत्रूनें आमची दाणादाण केली, त्यावेळीं पिताजीनें मला आणि ह्या माझ्या सखीला, शत्रूकडून आमचा उपमर्द होऊं नये म्हणून गुप्त रीतीनें ह्या आनंदकुंजांत ह्या सुरक्षित ठिकाणीं आणून ठेविलें. आणि मधून मधून ते आमचा शोधसमाचार घेण्याकरितां येत असतात. त्याप्रमाणें आजहि आले आहेत."

कोकिळेनें इतका खुलासा करतांच सैनिकांनीं त्यांना बंधमुक्त केलें. तेव्हां युवराज म्हणाला, "माझ्या सैनिकांना न समजतां आपला हा असा अपमान केला, त्याबद्दल आपण मला क्षमा करा. आपल्या कन्येनें आणि तिच्या ह्या परोपकारी सखीनें—आनंदकुंजवासिनीनें—मजवर अगणित उपकार केले आहेत. आतां आपण आला आहांत, हें पाहून मला फार आनंद झाला. आपल्यासारख्या वृद्ध अनुभवी आणि मयूरनगरीचा अभिमान असलेल्या मनुष्याची मला फार जरूरी होती. आतां आपल्या सहाय्यानें आणि सल्ला-मसलतीनें मला माझें अंगीकृत कार्य करतां येईल अशी खात्री आहे."

"ह्या दासाचा जर कांहीं आपणास उपयोग झाला, तर मी स्वतःला धन्य समजेन."

"ठीक आहे. आत फलाहार झाल्यावर आपण त्या गोष्टीचा खल करूं." असें म्हणून युवराज आंत गेला. ती संधी साधून कोकिळेनें आपल्या पित्याला—कनक अमात्याला—सुहासिनीनें योजलेल्या सर्व गोष्टी थोडक्यांत निवेदन केल्या.

## हृदयशोधन ४

"प्रथम आम्हाला एक गोष्ट कळावी अशी आमची फार इच्छा आहे." फलाहार होऊन पुनः सर्व मंडळी प्रफुल्ल चंद्रप्रकाशांत आनंदकुंजांत येऊन

बसल्यावर आपल्या तरुण स्वामीच्या सूचनेवरून सेनानायक कनक अमात्याला म्हणाला, " आणि ती गोष्ट म्हणजे आपली राजनंदिनी सुहासिनी होय. तिच्या सहाय्यार्थ आमचे युवराज येथें आले, परंतु आम्ही येण्यापूर्वी शत्रूनें आपला कार्यभाग आटोपून घेतला. आतां आम्ही आपल्या महाराजांच्या मुक्ततेकरितां शत्रूच्या शमीनगरावर चाल करून जाणार आहोंत. परंतु त्यापूर्वी आपल्या राजकुमारीचा शोध लागल्यास फार चांगलें ! "

" आमची राजबाला कुठेंहि असली तरी ती सुरक्षित ठिकाणीं असावी अशी माझी मनोदेवता मला सांगते. " अमात्य म्हणाला. " इतकेंच नव्हे तर ती आपल्या पूज्य पित्याच्या मुक्ततेकरितां कांहीं तरी दांडगी खटपट करीत असावी, असा माझा दृढ समज आहे. आणि आपला हेतु तिला कळल्यास ती स्वतः आपल्या मदतीस येईल असेंहि मला वाटतें. "

" मग तिचें वास्तव्य कुठें आहे, तें आपणास अवगत आहे तर ? " मध्येंच युवराजानें विचारलें.

" नाहीं. तिचें गुप्त वास्तव्य स्थान जरी मला माहित नसलें, तरी राजकन्येचा स्वभाव मला पूर्णपणें माहित आहे. "

" मग ती आपल्या पित्याच्या मुक्ततेकरितां आम्हांला येऊन मिळेल अशी आपली खात्री आहे तर ? " युवराजानें विचारलें. " बरं तर ! आपल्यासारख्या इतर स्वामीभक्तांनीं शत्रू पारिपत्याविषयीं काय योजना केली आहे ? "

" आज जवळ जवळ एक सहस्र वीर शत्रुनाशाकरिता तयार आहेत. आपणहि स्वसैन्य सहाय्यार्थ आलां आहांत, असें त्यांस कळतांच त्यांना नवीन जोम येणार आहे. आणि ते आपलें सेनानायकत्व कबूल करून आपल्या स्वामीकरितां वाटेल तें साहस करण्यास तयार होतील, अशी माझी खात्री आहे. आपण सांगाल तेव्हां आणि आपली इच्छा असेल त्या ठिकाणीं हे सहस्र वीर आपणास येऊन मिळतील, अशी मी आतां जाऊन व्यवस्था करून येतों. "

" येथपर्यंत जर आपली तयारी असेल, तर मला मोठा आनंद आहे. मी परवां येथून निघण्याचा विचार केला आहे. तर आपण त्याप्रमाणें ताबडतोब व्यवस्थेला लागावें असें मला वाटतें. "

ह्या विचार ठरतांच अमात्य आपल्या कन्येजवळ आला. आतां राजकन्येनें आपलें नांव प्रगट करावें, असें त्यांला वाटूं लागलें. आपल्या मताप्रमाणेंच

आपल्या पित्याचें मत आहे, असें पाहून कोकिळा आपल्या सखीजवळ आली आणि म्हणाली, " ताईमहाराज, आपण युवराजमहाराजांची सत्त्वपरीक्षा करण्याचा विचार केला होता, त्याप्रमाणें ते आपल्या कसोटीला चांगलेच उतरले आहेत. तेव्हां आतां आपण कोण हें त्यांना सांगून आपण त्यांचें स्वागत करावें म्हणजे नवीन कार्याला त्यांना मोठा उत्साह येईल, असें पिताजीचें मत आहे."

सुहासिनी विचारांत पडली. इतके दिवस आपण आपल्या हृदयेश्वराबरोबर प्रतारणा केली, त्याबद्दल आतां तिला वाईट वाटूं लागलें. तथापि इतक्यांतच आपण प्रकट होऊन रहस्यभेद करण्यापेक्षां कार्याची पूर्तता होईपर्यंत असेंच अज्ञात रहावें, असाच शेवटीं तिनें निश्चय केला आणि त्याप्रमाणें आपल्या हितचिंतक अमात्याला कळविलें. पुढें कांहीं काळ त्यांनीं पुढचा विचार ठरवून पुढल्या कामाच्या तयारीकरितां अमात्यानें युवराजाचा निरोप घेतला.

आपल्या सहाय्यार्थ विजयपूरचे युवराज आपल्या निवडक योध्यांसह आले आहेत, अशी बातमी कळतांच मयूरनगरींतील प्रत्येक वीराला नवीन ईर्षा उत्पन्न झाली. सर्व नगरीला पुनः चेतना प्राप्त झाली. प्रत्येक वीर आपल्या आयुधानिशीं सज्ज होऊन अमात्याच्या सांगण्याप्रमाणें सूर्योदयाबरोबर चंडीमातेच्या भव्य पटांगणांत जमूं लागला. सर्व पटांगण वीरमंडलानें सजीव दिसूं लागलें. सर्व वीरांचा तो नवीन उत्साह पाहून अमात्याला अत्यानंद झाला. तो पुढें होऊन म्हणाला, " आपण न बोलावितां केवळ ताईमहाराजांचें सतीत्व रक्षण करणें, हें प्रत्येक रजपूत वीराचें कर्तव्य आहे, असें समजून अमरसिंह युवराज आपल्या मदतीकरितां येथें आले आहेत. तेव्हां असा राजवंशीय सेनानायक मिळाल्याबद्दल तुम्हांला आनंद झाला पाहिजे. शत्रूच्या विटंबनेला भिवून ताईमहाराज आजपर्यंत अज्ञातवासांत दिवस कंठीत होत्या. अलीकडे त्यांच्या अस्तित्वाविषयींहि शंका घेतलेली माझ्या कानीं आली होती. परंतु काळ वेळ प्रतिकूल असल्यामुळें मीहि ती शंका निरसन करण्याच्या भानगडींत पडलों नाहीं. आतां योग्य वेळ आली आहे. आज मी आपणास पहिली आनंदाची गोष्ट सांगतों, ती ही कीं, आनंदकुंजांत सुहासिनी ताईमहाराज सुखरूप असून त्यांनींच प्रथम युवराजाचें स्वागत केलें."

आपली तरुण स्वामिनी सुखरूप आहे असें कळतांच सर्व सैनिकांनीं तिच्या

नांवाचा मोठयानें जयजयकार केला. ताबडतोब प्रत्येक वीरानें गर्दी करून चंडीमातेचें दर्शन घेतलें आणि स्वामीच्या मुक्ततेकरितां आपण किती उत्सुक झालों आहोंत हें दाखविलें.

ठरल्यावेळीं सर्व सैन्य आनंदकुंजांत येऊन दाखल झालें. युवराजानें त्या सर्वांचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. परंतु त्याच्या चित्ताला कांहीं स्वास्थ्य नव्हतें. मयूरनगरीच्या सैनिकवीरानीं राजपुत्राच्या नांवाबरोबर ताईमहाराजांच्या नांवाचा पुनः पुनः जयजयकार केला. तेव्हां त्याचें मन विशेष गोंधळून गेलें. आपण ज्या राजकुमारीच्या कंकण संदेशाप्रमाणें येथें आलों, ती राजबाला स्वरूपानें आणि गुणांनीं कशी आहे, हे माहित नसतांहि केवळ रजपूताच्या प्रतिज्ञा पूर्तीकरितां समरकुंडांत स्वदेहाहुति देण्यास तयार झालों आहोंत; पण जिनें संकटसमयीं आपले प्राण वांचविले, असहाय्य स्थितींत आपल्या प्रेमळ शुश्रूषेनें, सहवासानें आणि वर्तनानें आपणास कायमचें ऋणी करून ठेविलें, आणि सर्वांचा कडेलोट म्हणजे सात्विक प्रेमानें आपल्या हृदयाचें हरण करून घेतलें, त्या सर्वांचा मोबदला आपणांस तिला कांहींच देतां येऊं नये. इतकेंच नव्हे तर तिच्या बरोबर उघड मनानें एखादा प्रेमाचा शब्दहि बोलतां येऊं नये, याबद्दल त्याच्या मनाला सारखी तळमळ लागली होती. गेले चार सहा दिवस सुहासिनीच्या सान्निध्यांत त्याला अत्यानंद होत असतांहि केवळ ह्या वरील कारणामुळेंच तो होतां होईल तितकें करून तिला प्रोत्साहन देत नव्हता. आणि युवराजाची ही द्विधा स्थिति लक्षांत येऊनच्च कोकिळा आपल्या सखीच्या मागें, तिनें राजपुत्रास ओळख द्यावी म्हणून लागली होती. परंतु अशाहि परिस्थितींत रहस्याचें कौतुक वाटून आशेनें पुढल्या सुखकर परिणामाकडे दृष्टि देऊन ती होती.

प्रखर उन्हाची वेळ टळून शांत समयीं युवराज उद्यानांतील लताकुंजांत एकटाच बसून पवित्रहृदया आनंदकुंजवासिनीच्या अतुल रूपराशीचें कल्पनाचक्षूंनीं निरिक्षण करित होता. ह्या निरीक्षणांत त्याची एकतानता झाली होती. तोंच त्याच्या उजव्या हाताला पलीकडे ठेवलेल्या विजयी तरवारीचा धक्का लागून ‘ कणूण् ’ असा मंजुळ ध्वनि झाला. त्याबरोबर आपल्या कल्पना सृष्टींतून एकदम जागे होऊन युवराजानें आपल्या हाताकडे पाहिलें, तों त्याला प्रतिज्ञेनें बद्ध करणारें रत्नजडित कंकण त्याच्या दृष्टीस पडलें. तत्काळ त्याचे विचार बदलले, आपला कंकण धारण केलेला उजवा

हात पुढें करून तो उद्भ्रान्त चित्तानें स्वगत म्हणाला, " मला चमत्कारिक परिस्थितींत लोटणाऱ्या कंकणा ! तूं पवित्र आहेस, तुझी स्वामिनी पवित्र आहे, ती राजबाला आहे, दुःखपीडित आहे, तथापि तिनें मला सांप्रत मोठ्या संकटांत टाकिलें आहे. तुझ्या स्वामिनीच्या पाणिग्रहणाची मी प्रतिज्ञा केली परंतु आतां मला पश्चात्ताप होत आहे. मी उतावीळपणें केलेली प्रतिज्ञा अविचाराची आहे, असें त्याचवेळीं माझ्या परमप्रिय मित्रानें वसंत-विजयानें मला सांगितलें. परंतु पुनः त्याकडे दुर्लक्ष करून मी अनेक दृश्य-अदृश्य देवतांना साक्षी ठेवून त्या प्रतिज्ञेचा पुनरुच्चार केला. आणि स्वतःला आमरण बंधन करून घेतलें ! ' अविचारें जो प्रतिज्ञा करी ! तो बुडे या भवसागरीं ! ' हें अगदीं अक्षरशः खरें आहे. पण आतां मागून पश्चात्ताप होऊन काय उपयोग ! मी भग्नहृदयी झालों; तुझी अज्ञानवासांत असलेली स्वामिनी भग्नहृदयी झाली आणि माझ्यावर अनुरक्त झालेली ती सरलहृदया, निष्पाप, निष्कलंक अशी सौंदर्यखनी आनंदकुंजवासिनीहि आतां मजकरितां भग्नहृदयी बनणार ! अरेरे ! काय हा मजवर दारुण प्रसंग ! ह्या दुःसह विचारांनीं आणि ह्या मर्मांतक पीडेनें मी खास वेडा होणार ! हे वनवासिनी देवी, हे पवित्र आनंदकुंजवासिनी—"

इतक्यात पलीकडील लताकुंजांत मधुर वीणारवाप्रमाणें ओळखीचा असा कंठस्वर त्याच्या कर्णरंध्रात गुणगुणत गेला. त्याबरोबर त्याची दृष्टि आणि कान त्या दिशेकडे वळले. परंतु दृष्टीची मात्र तृप्ति झाली नाहीं. फक्त कानावर पुढील एक चरण पडला—

रति सुखसारे गतमभिसारे मदन मनोहर वेषम्
न कुरु नितंबिनि गमनविलंबनमनुसरतं हृदयेशम् ॥
धीर समीरे यमुनातीरे वसति वने वनमाली
गोपीपीनपयोधरमर्दन चंचलकरयुगशाली ॥ धृ० ॥

हा चरण कानीं पडतांच युवराजाची चमत्कारिक स्थिति झाली. आपण कुंजांत एकटेच बसलों आहोंत, असें पाहून आनंदकुंजवासिनी राधाविलासांतील एक चुटका आपल्या परिस्थितीला अनुसरून गात आहे, असें त्याला वाटलें. तो चरण ऐकून त्याच्या हृदयाची स्थिरता आतां नष्ट झाली. इतक्यांत देवांगनेप्रमाणें तो मंजुळ स्वर बंद होऊन कंकणाचा उमटलेला कोमल ध्वनि युवराजास अगदीं जवळ ऐकूं आला. त्यानें बाजूला वळून पाहिलें तों

बलात्कारानें त्याच्या हृदयांत स्थान पटकावणारी सुहासिनी हास्य मुद्रा करून उभी !

" माझ्या गीतानादानें युवराजमहाराजांच्या एकांताचा भंग झाला असं मला वाटतं ! महाराजांनीं ह्या अविचारी दासीला क्षमा करावी. "

" आनंदकुंजवासिनी ! तुला क्षमा मागण्याचें कांहीं कारण नाहीं. उलट मी येथें असल्यामुळें तुला स्वतःच्या करमणुकीकरितां मनसोक्त गायन करण्यास प्रतिबंध होत आहे, म्हणून मीच उलट तुझी क्षमा मागितली पाहिजे."

" महाराज असें उलट बोलूं लागले म्हणजे मग मी केलेल्या अपराधाची क्षमाच मागूं नये, असा स्पष्ट अर्थ झाला. पण महाराज अलीकडे असे एकांतांत बसून कसला गहन विचार करीत असतात ? मला वाटतं आमच्या पाहुणचारांत कांहीं न्यूनता दृष्टोत्पत्तीस येऊन महाराज आम्हांला कंटाळून येथून जाण्याचा विचार करीत आहेत ! "

" छे ! तूं उगाच आपल्या मनाची भलतीच कल्पना करून घेऊं नकोस ! मी तुमच्या पाहुणचारामुळे प्रसन्न आहें. "

" होय. पाहुणचारामुळें महाराज प्रसन्न असतील पण ह्या ठिकाणीं त्याचें चित्त मात्र प्रसन्न नाहीं. "

" ही तुझी भ्रामक कल्पना आहे. "

" असेलहि ! " प्रेममय तीक्ष्ण दृष्टीनें रापुत्राकडे पहात सुहासिनी हास्यवदन करून किंचित् धिटाईनें पुढें म्हणाली, " महाराजांना मला एक शंका विचारावयाची आहे. "

युवराज गोंधळून जास्त चौकस दृष्टीनें तिच्या सुरम्य मुखमंडलाकडे क्षणभर पहात राहिला. परंतु त्याकडे मुद्दामच दुर्लक्ष करून ती म्हणाली, " महाराज हातांतील लपवून ठेवलेल्या कंकणाकडे पाहून एकांतात असतांना दीर्घ श्वास कां सोडतात ? "

राजकन्येचा हा प्रश्न ऐकून एखाद्या स्फटिक पुतळ्याप्रमाणें युवराज स्तब्ध झाला. त्यानें आपल्या हातांतील कंकण कोणाच्या—विशेषतः सुहासिनी आणि कोकिळा यांच्या दृष्टीस पडूं नये म्हणून फार काळजी घेतली होती. परंतु काय !—सुहासिनीनें तें कंकण पाहिलें ! इतकेंच नव्हे तर त्यामुळें आपल्या मनाची झालेली चमत्कारिक स्थितिहि तिच्या लक्षांत आली, असें पाहून त्याची अशी स्थिति झाली, यांत मोठेंसें आश्चर्य नाहीं ! तो कांहींच

उत्तर देत नाहीं, असें पाहून सुहासिनी पुढें म्हणाली, " युवराजमहाराजांच्या हातांत हें कंकण पाहून मला आणि माझ्या सखीला मोठें आश्चर्य वाटलें. हें कंकण एका स्त्रीनें दिलें आहे किंवा एखाद्या नवसाप्रीत्यर्थ महराजांनीं हातांत घातलें आहे, इतकें कळलें म्हणजे आमची जिज्ञासा तृप्त होईल. "

" ह्या कंकणाचा इतिहास फार मोठा आहे. आणि तो इतिहास, मी अंगिकारिलेलें हें कार्य शेवटास गेल्याशिवाय मला कोणालाच सांगतां येणार नाहीं."

" म्हणजे! ह्या प्रस्तुत कार्याचा—आमच्या परम पूज्य महाराजाच्या मुक्ततेचा आणि ह्या आपल्या हातांतील स्त्रीकंकणाचा कांहीं संबंध आहे कीं काय?" मुद्दाम आश्चर्याचा आर्विभाव दाखवून सुहासिनीनें विचारलें.

तिला काय उत्तर द्यावें, ह्या विचारांत असतांना जणुं काय त्याचा संकट-भार कमी करण्याकरितांच कोकिळा त्या ठिकाणीं आली, आणि हंसत हंसत आपल्या सखीला उद्देशून म्हणाली, " तुला एकटीला जरी महाराजांनीं परवानगी दिली, तरी मी कांहीं तुला एकटीला जाऊं द्यावयाची नाहीं. तुझी जाण्याचीच इच्छा असेल, तर मलाहि घेऊन चल."

" कुठें जाण्याचा तुमचा बेत ठरला आहे?" आश्चर्यानें मध्येंच युव-राजानें विचारलें.

" महाराजांना नाहीं का माहीत? मी समजलें कीं, एवढा वेळ माझी प्रिय सखी महाराजांजवळ बसून परवानगीच मागत होती!"

" कसलीग परवानगी?—आणि मी एवढा वेळ महाराजांजवळ का होतें? असें रोषयुक्त स्वरानें विचारीत सुहासिनी लताकुंजाच्या आड झाली.

आपल्या विनोदाचा आपल्या सखीला राग आला असें पाहून कोकिळा तिची समजूत करण्याच्या उद्देशानें पुढें झाली. परंतु सुहासिनी तेथें उभी न राहतां पर्णकुटिकेंत वळली.

---

## अकल्पित जय ५

दोघीहि निघून गेल्यावर राजपुत्राला पुन: एकांत मिळाला. वनबालेचा कुठें तरी जाण्याचा विचार ठरला असून ती आपणास परवानगी विचारण्या-

करितां आली होती, असें आतां त्याला वाटूं लागलें. परंतु ती जर जाण्याकरितां उत्सुक असेल तर तिनें थोड्या वेळापूर्वी आपल्या अंतःकरणाची चळवळ उडवून देणारें गीत गाऊन आपलें मन अस्थिर करून सोडलें नसतें, असे विचार त्याच्या मनांत येऊन तो तेथेंच बसला. थोड्या वेळानें पलीकडील कुंजांत त्याला सेनानायकाचा शब्द ऐकूं आला.

आपल्या कांहीं प्रमुख सैनिकांसह सेनानायक दुसऱ्या दिवसाच्या कार्याची मांडणी करीत होता, तें पाहून युवराजाचें प्रणयविषयक विचारांतून मन उडालें आणि कर्तव्याकडे वळलें. तो उठला आणि पुढें झाला. तेव्हां त्याला पाहून प्रत्येक वीरानें त्यास मोठ्या आदरानें प्रणिपात केला.

"स्वामिन्—" कनक अमात्य राजपुत्रापुढें होऊन विनयानें म्हणाला, "काल ठरल्याप्रमाणें आपला गुप्त हेर शत्रुनगरींतून सूक्ष्म निरीक्षण करून नुकताच परत आला. त्याच्या सांगण्यावरून शत्रूला आपल्या तयारीची बातमी लागली असून आमच्या राजनंदिनीचें वसतिस्थानहि त्यास कळलें आहे असें वाटतें."

"मोठी आश्चर्याची गोष्ट आहे!" युवराज म्हणाला, "तुमची तरुण स्वामिनी कुठें आहे हें तुम्हाला न कळतां शत्रूला त्याचा तपास लागावा हें आश्चर्य नव्हे काय?—बरं मग पुढें काय हकीकत आहे."

"त्यांची स्वारीची तयारी जारीनें चालू आहे."

"असं आहे तर प्रथम आपला शह बसला पाहिजे. काय श्रुतसेन, आपला काय विचार ठरतो?—मला वाटतं, आपल्या वीरांचा तळ आजच येथून हालवावा!"

"मीहि तोच विचार केला असून आपल्या इच्छेप्रमाणें करण्याचें योजिलें आहे."

"ठीक आहे. तयारीला सुरवात करा. आणि रात्रीच्या पहिल्या प्रहराला आपण येथून निघूं!"

सेनानायकानें प्रणिपात करून तो जाऊं लागला. त्याच्या मागून कनकअमात्यहि जाऊं लागला. तेव्हां त्याला हांक मारून युवराज म्हणाला, "तुमची राजबाला आपल्या प्रिय पित्याच्या मुक्ततेकरितां आमच्या स्वारीबरोबर येणार आहे, असें तुम्ही म्हणालां होतां, तें खरें आहे काय? तिचें गुप्त वसतिस्थान तुम्हाला माहित आहे काय? तिची आणि तुमची भेट झाली होती काय?"

युवराजाला सुहासिनीच्या प्रत्यक्ष दर्शनाची किती उत्कट इच्छा झाली आहे, हें त्याच्या एका मागून एक विचारलेल्या ह्या प्रश्नावरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. त्याचे प्रश्न ऐकून अमात्याला क्षणभर कौतुक वाटलें, आणि त्याचवेळीं सुहासिनी कोण हें त्याला स्पष्ट सांगावें, असेंहि त्याच्या मनांत आलें. परंतु सुहासिनीच्या आज्ञेमुळें त्याला त्यावेळीं गप्प रहावें लागलें.

" सुहासिनी राजकन्या आपल्या पित्याच्या मुक्ततेकरितां आपणाबरोबरच येणार आहे. आणि पुरुषवेषांत आपणाजवळच राहण्याचा तिचा विचार आहे. " अमात्यानें सार्थ उत्तर दिलें.

" राजनंदिनीनें पुरुषवेषांत रणक्षेत्रांत येणें म्हणजे एक प्रकारचें धाडसच आहे ! "

" महाराजांचे हे उद्गार ऐकून महाराज आम्हाला तरी परवानगी देतात किंवा नाहीं, ही एक शंकाच आहे ! " लताकुंजाच्या आड असलेली सुहासिनी हास्य वदन करून पुढें झाली आणि म्हणाली.

" तुम्ही मजजवळ मघांपासून कोठल्या गोष्टींविषयीं परवानगी मागतां, त्याचाच मला अद्यापि उलगडा होत नाहीं. "

" रणक्षेत्रावर येण्याची ! आम्हा नगरवासिनी स्त्रियांचें भूषण—आमच्या सुहासिनी ताईमहाराज यांना स्वतःच्या सत्तेनें धुंद झालेल्या महाराण्यानें बाहुबलावर आपल्या अंतर्गृहांत नेण्याची प्रतिज्ञा केली आहे, हें महाराजांना अवगत असेलच ! हा त्याचा दर्प चूर्ण करण्याकरितां रणक्षेत्रावर आपल्याबरोबर येण्याची महाराजांनीं आम्हाला परवानगी द्यावी. "

" रजपूतकुमारीची रणांत येण्याची इच्छा मला अमान्य कशी करवेल ? " राजबालेच्या सुधांशु—वदनाकडे सूक्ष्मपणें निरखून पहात युवराज म्हणाला.

फक्त परवानगीच मिळण्याची खोटी होती ! सुहासिनीनें अमात्य आणि कोकिळा यांच्या बरोबर पुढले सर्व बेत रचून ठेविले होते. त्याप्रमाणें ती तात्काळ पुढल्या तयारीला लागली. रात्रीं युवराजाचा फलाहार होऊन सर्व सैन्याची निघण्याची तयारी झाली, तथापि सुहासिनी किंवा कोकिळा, कोणीहि राजपुत्राच्या दृष्टीस पडली नाहीं. त्यामुळें अमरसिंहाचें मन चलबिचल झालें. जातांना आनंदकुंजवासिनीचें आपणास एकवेळ दर्शन घडावें असें त्याला वाटूं लागलें. कुंजाच्या बाहेर सेनानायक आपल्या स्वामीचा अश्व धरून उभा होता. त्याच्याच बाजूला तितकाच उमदा अश्व दुसऱ्या एका सेवकानें

धरला होता. तो अश्व कोणाचा आहे असें विचारावें ह्या उद्देशानें श्रुतसेन सेनापतीनें त्या सेवकाला हांक मारिली. इतक्यांत राजपुत्र बाहेर आला आणि खिन्न स्वरानें म्हणाला, " सेनानायक, येथील दोघीही बालिका गेल्या तरी कुठें? त्यांनीं संकटसमयीं केलेल्या उपकारांची मजकडून कांहींच फेड झाली नाहीं. तथापि निदान निघतांना तरी त्यांचे शब्दानें आभार मानून त्यांचा निरोप घेतला असता—"

" एकूण महाराजांनीं फक्त शब्दावरच आमची संपादणी करण्याचा विचार केला आहे तर!" हास्यवदन करीत सुहासिनी पर्णकुटिकेच्या बाजूनें पुढें होऊन राजपुत्राच्या पुढें उभी राहिली.

युवराज गोंधळला! आज तीन प्रसंग असे आले कीं, प्रत्येक वेळीं सुहासिनीच्या परोक्ष त्यानें उच्चारलेल्या वाक्यांना तिनें उत्तर देऊन त्याला निरुत्तर केलें होतें. परंतु त्या सर्वांचा आतां मात्र कडेलोट झाला. कारण त्याच्या उपकारकर्त्रीनें त्याला त्याच्याच शब्दांनीं पकडलें होतें. आतां सुहासिनीनें एकदम पुढें होऊन दिलेल्या उत्तरानें तो इतका गोंधळला होता कीं, बराच वेळ सुहासिनीच्या वेषांतराकडे त्याचें लक्षच गेलें नाहीं.

" महाराजांनीं माझे फक्त शब्दानेंच आभार मानावे, अशी मजकडून काय कामगिरी झाली आहे? वास्तविक आमच्या पूज्य स्वामींच्या मुक्ततेकरितां महाराज एवढे श्रम सोसून येथें आले आहेत, त्याबद्दलच आम्ही सर्व मयूरनगरवासी जन महाराजांचे जन्माचे ऋणी आहोंत."

" हें तर माझें कर्तव्यच आहे."

" तर मग मी देखील महाराजांवर कांहीं उपकार केले आहेत असें महाराजांना वाटत असेल, तर तेंहि माझें कर्तव्यच होय!"

" प—ण—"

" 'पण' म्हणून जर महाराजांना कांहीं शंका वाट असेल तर त्याचा विचार आपण प्रस्तुत कर्तव्यांतून मुक्त झाल्यावर करूं!" असें म्हणून बरोबर आणलेली पुष्पमाला तिनें चटकन युवराजाच्या गळयांत घालून ती पुढें म्हणाली, " ह्या अंगीकृत कार्यांत युवराज महाराजांचा जयजयकार व्हावा म्हणून मयूरनगरवासीजनाच्या वतीनें मी ही विजयमाला आपणास अर्पण करतें. युवराज महाराजांचा जयजयकार असो!

तात्काल सर्व सैनिकांनीं सुहासिनीच्या ' युवराज महाराजांचा जयजयकार

असो !' ह्या वाक्याचा प्रतिध्वनि उमटवून रात्रीच्या प्रशांत समयाचा भंग केला ! राजपुत्र अविचलित दृष्टीनें वेषांतर केलें असतांनाहि चंद्रप्रकाशानें तेजोमय दिसणाऱ्या सुहासिनीच्या सुधांशुवदनाकडे पहात राहिला. रजनी-नाथाच्या रजतसदृश्य किरणसमूहांत तिचा मुखचंद्र तळपत होता. हळुहळू राजपुत्राचें निरीक्षण सुरू झालें. आनंदकुंजवासिनीचे जे काळेभोर आणि मृदु केश नेहमीं तिच्या सुंदर चंद्रवदनाचें चुंबन घेत, ते आतां बहुमूल्य अस्मानी पटक्यांत घट्ट बांधले होते. कंचुकीनें भूषविलेल्या उच्च उरोभागावर रुळणारा मुक्ताहार आतां लोहकवचानें झाकून गेला होता. तिच्या नितंबावर सदोदित दिसणारी सुवर्णमेखला जाऊन त्याऐवजीं आता कटिबंधाला लटकाविलेल्या तरवारीचें रत्नजडित म्यान दिसत होतें. त्याचप्रमाणें गज-गतीनें चालतांना रुणझुण रुणझुण करणारे नूपुर जाऊन चरणांत चर्मपादुका घातलेल्या होत्या. ह्याप्रमाणें त्याचें निरीक्षण चाललें असतां सुहासिनी मोठ्या कौशल्यानें अश्वारूढ झाली. त्याबरोबर युवराज शुद्धीवर आला. ती त्या अफाट सैनिकांच्या पुढें जाऊन उभी राहतांच प्रथम अमात्यानें तिला प्रणिपात केला. नंतर त्यांच्या सर्व सैनिकांनीं मोठ्या विनयानें आपलीं शिरें नमवून आपल्या तरुण स्वामिनीविषयीं मनांत वसत असलेलें आपलें प्रेम व्यक्त केलें. ह्या सर्व प्रकारावरून 'ती कोण आहे ?' याची सहज कल्पना होण्यासारखी होती. परंतु युवराज त्या वेळीं तिच्याकडे दुसऱ्याच दृष्टीनें पहात होता. तो ज्ञानशून्य होऊन त्या चारुमूर्ति सुंदरीकडे वेड्यासारखा पुनः पहात राहिला.

असो. निरभ्रनील आकाशांतील नक्षत्रांची ज्योति क्षीण होत चालली. उषःकालीन शीतल वायू जोरानें वाहूं लागला. पूर्व दिशा अधिकाधिक उज्ज्वल दिसूं लागली. वृक्षकोटरांमधून पक्ष्यांचा किलकिलाट सुरू झाला. लतातरूंवरील उमटणाऱ्या सुगंधित पुष्पकलिकांच्या मधुर सुवासानें दशदिशा दरवळून गेल्या. अद्यापि सैनिकजन आपला मार्ग क्रमण करीत होता. शत्रूच्या शमी नगराजवळ ती मंडळी आली होती. आतां जवळच्या पुष्करणीवर प्रातर्विधि आटोपून नव्या दमानें एकदम शत्रूनगरीवर चाल करून जावें, असा विचार करून युवराजानें त्याप्रमाणें हुकूम सोडला. परंतु त्याची दृष्टि चंचल झालेली दिसत होती. पुष्करणीच्या एका बाजूला एकांतांत अमात्यानें आपल्या शिबिरांत आपल्या स्वामिनीला प्रातर्विधि आटोपण्या-

करितां एक तंबू उभारला. त्या बाजूला राजपुत्राची दृष्टि वरचेवर वळूं लागली. आपल्या स्वारीबरोबर राजकन्या सुहासिनी येणार आहे, असें त्याला अमात्यानें सांगितलें होतें. परंतु अद्यापि ती त्याच्या दृष्टीस पडली नव्हती. आणि ती एकदां प्रत्यक्ष पहावी म्हणूनच त्याच्या मनाची तळमळ चालली होती. पुनः एकदा तिच्याविषयीं चौकशी करावी असें त्याच्या मनांत आलें. परंतु एकाच गोष्टीची सारखी चौकशी केली असतां आपल्या आश्रित मंडळींच्या मनाचा आपणाविषयीं निराळा ग्रह होण्याचा संभव आहे, असें वाटून तो स्तब्ध होता.

शेवटीं राजबाला आपल्या स्वारींत नाहीं, असेंच त्याला वाटूं लागलें. तेव्हां त्याची फार निराशा झाली. ती दृष्टीस पडली असती म्हणजे एकदांचा सोक्षमोक्ष लागून आपल्या मनाची तळमळ शांत झाली असती, अशी त्याची खात्री होती. पण तसें कोठून होणार ? सुहासिनीनें आपल्या जीवितेश्वराच्या प्रेमाची पूर्ण अंशानें कसोटी पाहण्याचा निश्चय केला होता, असें दिसतें !

असो. एक प्रहर लोटला. सर्व सैनिकांचे प्रातर्विधि आटोपून कूच करण्याची त्यांची तयारी चालू होती. इतक्यांत शत्रुनगरीजवळ एकाएकीं वावटळ सुटल्याप्रमाणें आकाशांत धुरळा उडूं लागला. तात्काळ सर्व मंडळीचें लक्ष तिकडे वेधलें. सेनानायकानें पुष्करणीच्या जवळ असलेल्या एका उंच वृक्षावर एका सेवकास चढवून तो काय प्रकार आहे, तो अवलोकन करण्यास सांगितलें. थोड्या वेळानें सेवक खालीं उतरला आणि पांचशें स्वारांची एक सेना आपल्या दिशेनें येत आहे, असें त्यानें सांगितलें.

“ धुंडपाळ महाराण्याचीच ही सेना असली पाहिजे. ” कनक अमात्य पुढें होऊन म्हणाला, “ गुप्तहेराकडून कळलेली बातमी खरी आहे, असें ह्यावरून सिद्ध होतें. आमच्या राजनंदिनीच्या गुप्त स्थानावर हल्ला करून तिला हस्तगत करण्याकरितांच ही सेना निघाली असावी. ”

“ पण तुमची राजबाला ह्या स्वारीबरोबर आहे ना ? ” राजपुत्रानें मनांत दोन अर्थ योजून हा एकच प्रश्न, केवळ स्वाभाविक तऱ्हेनें विचारतो, असा विचारला. परंतु त्याच्या प्रत्येक कृतीचें आणि शब्दाचें अत्यंत सूक्ष्म परीक्षण करणाऱ्या चाणाक्ष सुहासिनीच्या लक्षांत त्याच्या प्रश्नाचा अंतर्भूत अर्थ लक्षांत येऊन तिनें चट्कन् उत्तर दिलें, “ आमच्या स्वामिनी ह्या स्वारीबरोबर येणार, असं मला थोड्यावेळा पूर्वीच कळलं, आणि मी चौकशी करूं लागलें.

तेव्हां मला कळलं कीं, शत्रूला आपल्या गुप्त आश्रयस्थानाची माहिती झाल्यामुळें तिनें एका पराक्रमशाली पुरुषाचा आश्रय केला आहे." इतकें बोलून ती युवराजाच्या चेहऱ्याकडे टक लावून पाहूं लागली. परंतु त्याच्या चर्येत होणारा फेरबदल स्पष्ट रीतीनें दृग्गोचर झाला नाहीं. कारण त्याचवेळीं शत्रूसैन्य अगदीं जवळ आलें, करितां सेनानायकानें तयारीची सूचना देणारा भेरीनाद केला.

तात्काळ सेनानायकाच्या सहाय्यानें युवराजानें आपल्या सैन्याची व्यूह-रचना केली. त्या पुष्करणीजवळ तीन बाजूनें गर्द झाडी असल्यामुळें तें सर्व सैन्य त्या झाडींत अदृश्य झालें. अशा रीतीनें आपल्या सैन्याची व्यवस्था लावल्यानंतर युवराज अमात्याला म्हणाला, " सकाळचा प्रहर असल्यामुळें बहुतकरून हें सैन्य ह्या पुष्करणीवरच येईल, असा माझा तर्क आहे. तर आपण प्रथम तें सैन्य शत्रुपक्षाचें आहे काय याचा शहानिशा करून मग त्यावर हल्ला करण्याचा विचार ठरवूं."

अमात्य आणि सेनानायक यांना युवराजाचा विचार पसंत पडला. ते शांत चित्ताने पण तयारीनें पुढून येणाऱ्या सैन्याची मार्गप्रतिक्षा करीत राहिले. थोडा वेळ झाला. तें सैन्य पुढें पुढें येऊं लागलें. त्यांची पताका स्पष्ट दिसताच तें शत्रूसैन्य आहे, अशा अर्थाची अमात्यानें युवराजाला खूण केली. आणि खरोखरच तें महाराणा धुंडपाळाचें निवडक सैन्य होतें. कनक अमात्याला गुप्त हेराकडून कळल्याप्रमाणें महाराण्याला सुहासिनीच्या निवांत-स्थानाचा शोध लागून तो तेथें गुप्तरीतीनें छापा घालण्याच्याच उद्देशानें आज स्वतः निघाला होता. आपण प्रतिज्ञेप्रमाणें आज सुहासिनीला हस्तगत करून आपल्या नाटकशाळेंत आणणार अशी त्याला खात्री होती. परंतु—?

पुष्करणीवर आपल्या चक्रव्यूहांत शत्रुसैन्य येतांच चारी बाजूंनीं एकदम रणभेरीचा कडकडाट सुरू झाला. क्षणांत तेथें स्थित्यंतर होऊन थोड्या वेळापूर्वी दिसणाऱ्या प्रकृतिदेवीच्या त्या रम्य स्थलावर समरभूमीचा भयंकर देखावा दिसूं लागला. हा अकल्पित प्रकार पाहून शत्रुसैन्य आश्चर्यचकित जागच्या जागीं उभें राहिलें. तोंच त्याच्यावर पावसाच्या मुसळधारेप्रमाणें शस्त्रवृष्टीला सुरवात झाली. अशा रीतीनें शत्रुसैन्याला भयचकित केल्यावर युवराजानें आपल्या सैनिकांना झाडींतून बाहेर येण्याचा हुकूम केला. दोन्हीं सैन्यें एकत्र होतांच वीरांच्या भीषण गर्जनांना सुरवात झाली. अश्वांचें कर्कश

किंकाळणें, शस्त्रांचा आघात प्रत्याघातांचा प्रचंड ध्वनि आणि योद्धयांचा भीम हुंकार यांनीं सर्व दिशा दुमदुमून गेल्या. प्रत्येक वीर उत्साहानें, धैर्यानें आणि अभिमानानें शत्रुसैन्यावर तुटून पडत होता. इतक्यांत प्रलयकालच्या मेघांच्या घर्षणानें उत्पन्न झालेल्या सौदामिनीप्रमाणें आपली विजयी तलवार चमकावित युवराज महाराण्यापुढें येऊन उभा राहिला, आणि आपला प्रतिज्ञेनें कंकण धारण केलेला हात त्याच्या पुढें करून तो गर्जना करीत म्हणाला, " महाराण्या, ज्या राजकुमारीला हरण करून तिचें कौमार्य भ्रष्ट करण्याची तूं प्रतिज्ञा केली आहेस, त्याच राजबालेचें रक्षण करून तिचें पाणिग्रहण करण्याची मी प्रतिज्ञा केली असून त्याची साक्ष हें तिचें कंकण पहा—! तूं शूरवीर आहेस असें जाणूनच मी तुला ह्या रणांगणांत दोन हात करण्यास आव्हान करीत आहें. चल पुढें हो—"

ते वीरद्वय निर्भय हृदयानें, अलौकिक धैर्यानें आणि अमानुष साहसानें परस्परांवर तुटून पडले ! हळुहळू त्या रणक्षेत्रावर मृत देहाचा ढीग पडून जिकडे तिकडे रक्तांच्या नद्या वाहूं लागल्या. बराच वेळ त्या दोन योद्धयाचें द्वंद्व चालूं होतें. इतका वेळ युवराजानें आपल्या प्रतिस्पर्ध्याला दाद दिली नाहीं. परंतु त्या कसलेल्या योद्धयापुढें तो शेवटीं दमला. इतक्यात रणांगणाच्या मागील भागांतून एक वीर्यमय असा गंभीर कंठस्वर ऐकूं आला. आणि एखाद्या चपलेप्रमाणें सुहासिनी त्या दोन थकलेल्या योद्धयांच्या मध्यें येऊन उभी राहिली. महाराण्यानें युवराजावर मारण्याकरितां उगारलेला शेवटचा वार चुकविण्याकरितां सुहासिनीनें आपल्या प्रयत्नाची शिकस्त केली परंतु तो वार युवराजाला ओझरता लागलाच ! तें पाहतांच देहभानरहित होऊन सुहासिनीनें ' चांडाळा ! हें तूं काय केलेंस ? ' असें गर्जून आपल्या सुकुमार हातानें महाराण्याच्या लोहमय मानेवर वज्राघात केला. त्याबरोबर त्याचें शिर धडापासून वेगळें होऊन तें चैतन्यशून्य शरीर धाडकन् समरभूमीवर पडलें !

" शाबास—आनंदकुंजवासिनी शाबास—! " बोलतां बोलतां बाहूवर झालेल्या भयंकर जखमेमुळें प्रबळ मूर्च्छा येऊन युवराज घोड्यावरून खालीं पडला !

---

# अंतर्मिलन ६

युद्ध संपलें ! महाराणा समरांगणावर पडतांच त्याच्या सैन्यांत सर्वत्र हाहाःकार उडाला. शत्रुसैन्य आपापलीं शस्त्रास्त्रें टाकून वाट फुटेल तिकडे पळत सुटलें. इकडे सुहासिनी आपल्या मूर्च्छित प्राणेश्वराला मांडीवर घेऊन त्या रक्तमय भूमीवर बसून त्याला शुद्धीवर आणण्याचा प्रयत्न करीत होती. कोकिळा जवळच तिच्या मदतीला उभी होती. धुंडपाळ महाराण्यानें रणक्षेत्रावर देह ठेवण्यापूर्वी युवराजावर केलेला वार भयंकर स्वरूपाचा होता. त्याचा उजवा हात बराच जायबंदी होऊन त्यांतून एकसारखा रक्तश्राव चालू होता. सुहासिनीनें आपला पटका सोडून कोकिळेजवळ दिला आणि तो पुष्करणीच्या पाण्यानें भिजवून ती आपल्या प्रियकराची जखम धुवून स्वच्छ करीत होती. तिनें एक दोनदां त्याच्या तोंडांत पाणी घालतांच युवराजानें आपले विशाल नेत्र उघडले. आणि क्षणभरच तो आपल्या हृदयवासिनीच्या सुरम्य मुखाकडे पहात राहिला. नंतर विस्मयाकुल हृदयानें तो चोहोंकडे निरखून पाहूं लागला. आजुबाजूला प्रेताचा ढीग पडला होता. त्यांतच महाराण्याचा जडदेह पडला होता.

" महाराजांचा विजय झाला ! " पटका सोडल्यामुळें आपल्या सुंदर चंद्रवदनावरून खालीं उच्च उरोभागावर लोळणारे घनकृष्ण केश मागें सारीत सुहासिनी म्हणाली.

" आनंदकुंजवासिनी, तूं मला आमरण ऋणी करून ठेविलं आहेस ! तुझे हे असंख्य उपकार ह्या जन्मीं माझ्या हातून फिटणें शक्य नाहीं. तुला मी शेवटीं भग्नहृदयी करणार—" बोलतां बोलतां युवराजाला पुनः प्रबळ मूर्च्छा आली.

इतक्यांत सेनानायक आणि अमात्य रणात पडलेल्या आपल्या स्वामिभक्त वीरांची व्यवस्था लावून तेथें आले. त्यांना पाहून सुहासिनी म्हणाली, " महाराज नुकतेच शुद्धीवर आले होते. परंतु पुनः त्यांना मूर्च्छा आली आहे. आतां त्यांना फारच सांभाळून नगरींत नेण्याची व्यवस्था केली पाहिजे. परंतु महाराजांना घेऊन आम्ही तेथें येण्यापूर्वी तुम्ही पुढें जाऊन राज-प्रासादावर युवराज महाराजांची विजय पताका लावा आणि सर्व नगरींत

त्यांच्याच नांवाची द्वाही फिरवून पिताजींची सूटका करा. म्हणजे मग तेथील मुत्सद्दीमंडळाचा दरबार भरविण्याची ते सर्व व्यवस्था करतील. पिताजींना ही सर्व हकीकत सांगा इतक्यात आम्ही युवराजांना घेऊन नगर प्रवेश करण्याकरितां येतों."

आज्ञेप्रमाणे सेनानायक आणि अमात्य युवराजाच्या रक्षणार्थ थोडें सैन्य ठेऊन पुढें निघाले. इकडे सुहासिनी सैनिकांच्या मदतीनें युवराजास मेण्यांत घालून नेण्याच्या व्यवस्थेला लागली. आपल्या शत्रूचा संहार होऊन आपणास विजय प्राप्त झाला, याबद्दल झालेला आनंद तिच्या मुखावर किंचित्‌हि दिसत नव्हता. उलट आपणाकरिता केलेल्या प्रतिज्ञेसाठीं युवराजाची ती हताश स्थिति पाहून तिचें सुंदर मुखकमल कोमेजून गेलें होतें. ती आपल्या स्निग्ध आणि प्रेममय दृष्टीनें वरचेवर मेण्यांत डोकावून आपल्या जीवितेश्वराच्या मुखमंडलाकडे पाही, मधून मधून तिच्या मनातील विचाराचा जसा ओघ बदलत होता, तसें तिचे हृदय भरून येऊन तिच्या नेत्रयुग्मात अश्रु दिसूं लागत.

शर्मी नगरींत एकच गडबड उडाली होती. नवीन राजाच्या नगरप्रवेशा करितां कनक अमात्यानें चालविलेल्या तयारीला प्रजाजन मोठ्या उत्साहानें हातभार लावीत होते, त्यावरून धुंडपाळ महाराण्याच्या जुलमी कारकीर्दीला अखिल प्रजा किती कंटाळली होती, याची सहज कल्पना होण्यासारखी आहे. त्यावेळीं नगर श्रृंगारून, रस्त्यावर कमानी लावून, ठिकठिकाणीं तोरणें उभारून सर्व नगरवासी उत्तम पोषाख करून युवराजाचें स्वागत करण्यास तयार झाले होते. हळुहळूं युवराजाचा मेणा प्रवेशद्वाराजवळ आला. त्यावेळीं सर्वत्र मंगलवाद्यांचा गजर सुरू झाला. मयुराधिपतिनें आपली कारागृहांतून मुक्तता करून आपणांस स्वातंत्र्य देणाऱ्या आपल्या भावी जामाताचें मोठ्या प्रेमानें प्रथम स्वागत केलें. परंतु त्यावेळीं राजपुत्र अत्यंत अस्वस्थ होता. होतो हा सर्व प्रकार केवळ स्वप्नांत होतो असेंच त्याला वाटत होतें. तो अर्धवट ग्लानींत होता. त्यामुळें राजकन्या सुहासिनी आणि भद्रसेनमहाराज याच्या भेटीचा प्रकार त्याच्या लक्षांत आला नाहीं. नाहीं तर राजनंदिनी कोण ? याचा त्याच वेळीं त्याला उलगडा होऊन त्याच्या मनाची तळमळ तात्काळ शांत झाली असती.

युवराजाच्या अस्वस्थ स्थितीकडे पाहून दरबारचा समारंभ थोडक्यांत आटोपून घ्यावा लागला. हा सर्व विधि संपल्यावर नगरांतील मोठमोठे

राजवैद्य आपल्या नूतन स्वामीच्या आरोग्यार्थ अहमहमिकेनें प्रयत्नाला लागले. एक दोन दिवसांत युवराजाला आराम पडतांच भद्रसेनमहाराज मयूरनगरींत जाण्याकरितां तयार झाले. तेथें त्यांची आतां फार आवश्यकता होती. त्यांनीं दोन दिवसांत कनक अमात्याच्या सहाय्यानें शमीनगराच्या राज्यकारभाराची व्यवस्था इतकी सरळ आणि प्रजेला हितकारी करून ठेविली, कीं प्रत्येक नागरिकास आतां रामराज्य सुरू झालें असेंच वाटूं लागलें. असो.

अहर्निश शुश्रूषेंत आनंद पावणारी सुहासिनी आपल्या नाथाच्या शय्येची व्यवस्था करण्याकरितां अंतर्गृहांत जात असतां महाराज तिच्याकडे पहात युवराजास म्हणाले, "मी उदईक येथून स्वनगरींत गेल्यावर मला आपली काळजी करण्याचें कारण नाहीं. कारण ही येथें आहेच. मजपेक्षां हिलाच आपली काळजी जास्त आहे. माझ्या लाडक्या सुहासिनीनें आपल्या चरणावर पंचप्राण वाहिलेच आहेत. तेव्हा आतां आपण पूर्ववत् आरोग्यवंत होताच आपणा उभयतांचा मंगल विवाह करून मी माझें सर्वस्व धन आपल्या स्वाधीन करीन तेव्हांच मला खरा आनंद होणार आहे."

हें भाषण ऐकून युवराजाच्या मुखावर दुःखाची छटा दिसूं लागली. राजकन्या सुहासिनी कशी आहे, याची आपणास किंचित्‌हि कल्पना नसतांना आपणास स्वतःच्या प्रतिज्ञेकरितां तिच्याबरोबर विवाह करावा लागून आजन्म दुःखी व्हावें लागणार, हे विचार त्याच्या मनांत घोळूं लागले. सुहासिनी त्याच्या सुश्रुषेंत असतांना त्यांचें प्रेम पाहून महाराजांना अत्यंत आनंद होत होता परंतु अद्यापि सुहासिनी ती हीच असें युवराजाला कळलें नाहीं, अशी कल्पना देखील महाराजांच्या मनांत आली नाहीं.

थोड्या वेळानें शय्येची व्यवस्था स्वतः करून सुहासिनी त्या भव्य दिवाणखान्यांत परत आली. त्यावेळीं दिव्याचा स्वच्छ प्रकाश तिच्या मुखेंदूवर पडल्यामुळें तें अतिशय उज्वल आणि मनोरम दिसत होतें. तिनें शुभ्र पातळ वस्त्र परिधान केल्यामुळें तिची मधुर अंगकांति त्यावेळीं शरद्‌ऋतूंतील पौर्णिमेच्या शुभ्र विमल कौमुदीप्रमाणें दिसत होती. ती आंत आल्यावर थोड्या वेळानें महाराज युवराजाचा निरोप घेऊन निद्रासुख अनुभवण्याकरितां शय्यागृहांत गेले. तेव्हां तें प्रणयीयुग्म पुनः एकत्र राहिलें. सुहासिनी जवळ असावी अशी युवराजाची मनापासून इच्छा ! ती जरा

दृष्टिआड झाली म्हणजे त्याच्या मनाची तळमळ सुरू होई. आणि ती जवळ आली म्हणजे तिच्याजवळ मन उघडें करतां येत नसल्यामुळें त्याचें मन दुःखी होत असे, अशा चमत्कारिक परिस्थितींत तो सांपडला होता.

" महाराजांना एक प्रश्न विचारावयाचा आहे." क्षणभरानें प्रेमपूर्ण दृष्टीनें एकवार युवराजाकडे पाहून सुहासिनीनें विचारलें.

तिचा प्रश्न ऐकतांच युवराजाच्या अंतःकरणांत खळबळ उडाली. ती आपणास आतां काय विचारणार आहे, हें त्यानें तात्काळ जाणलें. अशा प्रकारचा प्रश्न तिनें विचारूं नये म्हणून त्यानें आजवर तिच्याजवळ निरनिराळे विषय काढावे. परंतु आजचा वेळ मात्र तसा नव्हता. कारण सुहासिनी आज तयारीनेंच आत आली होती.

" आनंदकुंजवासिनी ! तुझा प्रश्न मी समजलों. आजवर तूं मजवर केलेल्या अनंत उपकारांच्या असह्य दडपणाखालीं मी चेपलों आहे. मला तुझी कोणतीहि इच्छा अमान्य करण्याचें सामर्थ्य नाहीं. पण आनंदकुंजवासिनी, मला तूं क्षमा कर—तूं आज मला जो प्रश्न विचारणार आहेस तो विचारूं नकोस.—अरेरे ! अशा सरलहृदयी देवीची शेवटीं मला आशा भंगच करावी लागणार ना ?"

" म्हणजे !—महाराज, हें काय बोलतां ? कोठल्या सरलहृदयी देवीचा आशाभंग ?" आश्चर्याचा आविर्भाव दाखवून युवराजाच्या दुःखपूर्ण मुखमंडलाकडे आपल्या प्रणयी मुद्रेने टक लावून पहात सुहासिनीनें विचारलें.

" देवी—आनंदकुंजवासिनी ! मी आता उघड बोलूं का ? मला तुझ्या सात्विक प्रेमानें ओतप्रोत भरलेल्या अंतःकरणाचें संशोधन झालें नाहीं असें तुला वाटतें का ? पण मी काय करूं ? मी वचनबद्ध आहें !"

" कोणाला ?" असें म्हणून युवराजानें निराशेनें आपल्या विशाल भालप्रदेशावर ठेवलेला कंकणबद्ध हात आपल्या कोमल हातांत धरून तिनें विचारलें. तिचा हस्तस्पर्श होतांच युवराजाच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. त्यानें एकदांच तिच्या सुरम्य मुखाकडे पाहिलें. आणि भानरहित होऊन, तिच्या कोमल स्कंधावर त्यानें आपली मान टाकिली !

# संशयनिवृत्ती ७

राजपुत्र क्षणभरच त्या स्थितींत होता. परस्परांचीं धडाडणारीं अंतःकरणें एकमेकांस आपापली साक्ष पटवीत होतीं, इतक्यांत युवराजानें चटकन् आपली मान वर उचलली, आणि सुहासिनीला किंचित् दूर करून तो म्हणाला, “ हे पवित्र बालिके ! मी तुझा महान् अपराधी आहे. तूं मजवर केलेल्या अनंत उपकाराची मजकडून फेड होणें दूरच राहूं दे पण उलट मी हतभागी तुझ्या दुःखाला मात्र कारण होणार आहें. विकारवश होऊन नुकताच मी तुझ्या पवित्र देहाला स्पर्श करून तुला दुःखाचा दंश मात्र केला ! देवी, मला क्षमा कर.”

“ महाराज, प्रसंगानुरोधानें प्रकट होत असलेल्या आपल्या अंतःकरणाचा असा अवरोध कां करतां ? ” युवराजाच्या दुःखित मुद्रेकडे पहात सुहासिनीनें धिटाईनें एकदम प्रश्न केला.

“ मी मनाचा अवरोध कां करतों ?—अरेरे ! आनंदकुंजवासिनी ! तुझ्या ह्या प्रश्नाचें उत्तर मी काय देऊं ? ”

“ समजलें ! महाराज मी समजलें ! मी एक गरीब वनवासी बाला, आणि आपण—”

“ छे ! छे ! ! हे पवित्र देवी, उच्च आणि नीच हा येथें भेद नाहीं. तुझी योग्यता मजपेक्षां सहस्रपटीनें जास्त आहे. तथापि मी वचनबद्ध असल्यामुळें नाइलाजास्तव मला माझ्या मनाचा असा अवरोध करावा लागतो. ”

“ महाराज कोणाला वचनबद्ध झाले आहेत तेवढें कळेल काय ? ” सुहासिनी अधोवदन करून दुःखित स्वरानें म्हणाली.

“ नको !—हे देवी, आतां मला कांहीच विचारूं नको. तूं मला ज्या दृष्टीने पाहतेस, तसा मी स्वतंत्र नाही—” मोठ्या दुःखानें तोंड फिरवून राजपुत्र म्हणाला.

“ माझ्या ह्या प्रश्नापासून महाराजाना दुःख होईल, असें मला प्रथम कळतें तर मी असा प्रश्नच विचारला नसता. पण युद्ध संपल्यानंतर महाराज त्या कंकणाविषयीं मला सांगणार—”

“ थांब—” एकदम राजपुत्र म्हणाला, “ आनंदकुंजवासिनी, तुझें अंतःकरण निर्मल आहे. तूं मला हे साधे दिसणारे प्रश्न मोठ्या जिज्ञासेनें विचारतेस पण त्यापासून माझी फार चमत्कारिक स्थिति होत आहे. तथापि

दृष्टिआड झाली म्हणजे त्याच्या मनाची तळमळ सुरू होई. आणि ती जवळ आली म्हणजे तिच्याजवळ मन उघडें करतां येत नसल्यामुळें त्याचें मन दु:खी होत असे, अशा चमत्कारिक परिस्थितींत तो सांपडला होता.

" महाराजांना एक प्रश्न विचारावयाचा आहे." क्षणभरानें प्रेमपूर्ण दृष्टीनें एकवार युवराजाकडे पाहून सुहासिनीनें विचारलें.

तिचा प्रश्न ऐकतांच युवराजाच्या अंतःकरणांत खळबळ उडाली. ती आपणास आतां काय विचारणार आहे, हें त्यानें तात्काळ जाणलें. अशा प्रकारचा प्रश्न तिनें विचारूं नये म्हणून त्यानें आजवर तिच्याजवळ निरनिराळे विषय काढावे. परंतु आजचा वेळ मात्र तसा नव्हता. कारण सुहासिनी आज तयारीनेंच आत आली होती.

" आनंदकुंजवासिनी ! तुझा प्रश्न मी समजलों. आजवर तूं मजवर केलेल्या अनंत उपकारांच्या असह्य दडपणाखालीं मी चेपलों आहे. मला तुझी कोणतीहि इच्छा अमान्य करण्याचें सामर्थ्य नाहीं. पण आनंदकुंजवासिनी, मला तूं क्षमा कर—तूं आज मला जो प्रश्न विचारणार आहेस तो विचारूं नकोस.—अरेरे ! अशा सरलहृदयी देवीची शेवटीं मला आशा भंगच करावी लागणार ना ?"

" म्हणजे !—महाराज, हें काय बोलतां ? कोठल्या सरलहृदयी देवीचा आशाभंग ?" आश्चर्याचा आविर्भाव दाखवून युवराजाच्या दुःखपूर्ण मुखमंडलाकडे आपल्या प्रणयी मुद्रेनें टक लावून पहात सुहासिनीनें विचारलें.

" देवी—आनंदकुंजवासिनी ! मी आतां उघड बोलूं का ? मला तुझ्या सात्विक प्रेमानें ओतप्रोत भरलेल्या अंतःकरणाचें संशोधन झालें नाहीं असें तुला वाटतें का ? पण मी काय करूं ? मी वचनबद्ध आहें !"

" कोणाला ?" असें म्हणून युवराजानें निराशेनें आपल्या विशाल भालप्रदेशावर ठेवलेला कंकणबद्ध हात आपल्या कोमल हातांत धरून तिनें विचारलें. तिचा हस्तस्पर्श होतांच युवराजाच्या सर्वांगावर रोमांच उभे राहिले. त्यानें एकदांच तिच्या सुरम्य मुखाकडे पाहिलें. आणि भानरहित होऊन, तिच्या कोमल स्कंधावर त्यानें आपली मान टाकिली !

---

# संशयनिवृत्ती ७

राजपुत्र क्षणभरच त्या स्थितींत होता. परस्परांचीं धडाडणारीं अंतःकरणें एकमेकांस आपापली साक्ष पटवीत होतीं, इतक्यांत युवराजानें चटकन् आपली मान वर उचलली, आणि सुहासिनीला किंचित् दूर करून तो म्हणाला, " हे पवित्र बालिके ! मी तुझा महान् अपराधी आहे. तूं मजवर केलेल्या अनंत उपकाराची मजकडून फेड होणें दूरच राहूं दे पण उलट मी हतभागी तुझ्या दुःखाला मात्र कारण होणार आहें. विकारवश होऊन नुकताच मी तुझ्या पवित्र देहाला स्पर्श करून तुला दुःखाचा दंश मात्र केला ! देवी, मला क्षमा कर."

" महाराज, प्रसंगानुरोधानें प्रकट होत असलेल्या आपल्या अंतःकरणाचा असा अवरोध कां करतां ? " युवराजाच्या दुःखित मुद्रेकडे पहात सुहासिनीनें धिटाईनें एकदम प्रश्न केला.

" मी मनाचा अवरोध कां करतों ?—अरेरे ! आनंदकुंजवासिनी ! तुझ्या ह्या प्रश्नाचें उत्तर मी काय देऊं ? "

" समजलें ! महाराज मी समजलें ! मी एक गरीब वनवासी बाला, आणि आपण—"

" छे ! छे ! ! हे पवित्र देवी, उच्च आणि नीच हा येथें भेद नाहीं. तुझी योग्यता मजपेक्षां सहस्रपटीनें जास्त आहे. तथापि मी वचनबद्ध असल्यामुळें नाइलाजास्तव मला माझ्या मनाचा असा अवरोध करावा लागतो. "

" महाराज कोणाला वचनबद्ध झाले आहेत तेवढें कळेल काय ? " सुहासिनी अधोवदन करून दुःखित स्वरानें म्हणाली.

" नको !—हे देवी, आतां मला कांहीच विचारूं नको. तूं मला ज्या दृष्टीनें पाहतेस, तसा मी स्वतंत्र नाहीं—" मोठ्या दुःखानें तोंड फिरवून राजपुत्र म्हणाला.

" माझ्या ह्या प्रश्नापासून महाराजांना दुःख होईल, असें मला प्रथम कळतें तर मी असा प्रश्नच विचारला नसता. पण युद्ध संपल्यानंतर महाराज त्या कंकणाविषयीं मला सांगणार—"

" थांब—" एकदम राजपुत्र म्हणाला, " आनंदकुंजवासिनी, तुझें अंतःकरण निर्मल आहे. तूं मला हे साधे दिसणारे प्रश्न मोठ्या जिज्ञासेनें विचारतेस पण त्यापासून माझी फार चमत्कारिक स्थिति होत आहे. तथापि

मला त्यांचीं उत्तरें दिलींच पाहिजेत. कारण त्या उत्तरावर माझ्याबरोबर तुझेंहि सुखदुःख अवलंबून आहे."

"माझें सुखदुःख ? आणि तें कसें ?"

"तें मी तुला उद्यां—महाराज येथून मयूरनगरींत गेल्यावर सांगून—"

"नका, नका महाराज ! माझ्या प्रश्नापासून महाराजांना दुःख होत असेल तर—"

"दुःख होत असो अगर नसो ! पण ह्या गोष्टीचा मला शेवट लाविल्याशिवाय दुसरा मार्गच नाहीं !"

युवराजानें हातांत घातलेल्या कंकणाच्या जोडीचें दुसरें कंकण त्यावेळीं सुहासिनीनें आपल्या हातांत घातलें होतें. आज युवराजास आपली ओळख देण्याचा तिनें विचार केला होता. परंतु 'उद्या' सागतों, असें युवराजानें कबूल केल्यावर तिनें आपला बेत रहित केला. क्षणभरानें ती मोठ्या विनयानें म्हणाली, "महाराजांनीं सुखनिद्रा घेण्याकरितां शय्या गृहांत चलावें."

मध्यान्ह रात्र उलटून गेली होती. राजप्रासादांत सर्वत्र शांतता नांदत होती. अद्यापि सुहासिनीला झोंप आली नव्हती. आपली ओळख न पटल्यामुळें युवराजाचें मन कसें आदोलन पावत आहे याचा ती विचार करीत होती. आतां तिला आपल्या वर्तनाबद्दल वाईट वाटूं लागलें. व्यर्थ आपण इतके दिवस युवराजास अशा निराशाजनक मनस्थितींत ठेवलें, असें तिचें मन तिला आतां सांगूं लागलें. अशा रीतीनें ती स्वतःला दूषण देत शय्येवर तळमळत पडली असतां युवराज झोंपलेल्या पलीकडील शय्यागृहांत कांहीं तरी वाजल्याचा तिला भास झाला. क्षणभर तिनें त्या दिशेला आपले कान दिले, तेव्हां पुनः तसाच आवाज तिला ऐकूं आला. कदाचित् युवराज उठले असतील असें वाटून त्यांना काय पाहिजे हें विचारावें ह्या उद्देशानें ती शय्येवरून उठली. आणि आपल्या शय्यागृहाच्या दरवाजाजवळ आली. तिनें हळूच आपला दरवाजा उघडला आणि दरवाजाच्या फटींतून ती आंत पाहूं लागली. थोड्या वेळानें युवराज झोंपलेल्या शय्येच्या बाजूची खिडकी हळुहळूं उघडली आणि एक बुरखा घेतलेली व्यक्ति आंत डोकावूं लागली. आंत सर्वत्र शांतता आहे, अशा अर्थाची बाहेरच्या बाजूस असलेल्या आपल्या साथीदारास खूण करून ती व्यक्ति हळूच आंत आली. हा प्रकार पाहतांच पुढें काय गोष्टी होणार हें सुहासिनीच्या चटकन् लक्षांत आलें.

आतां पुढें काय करावें याचा ती विचार करते, तोंच आंत आलेली व्यक्ति आपल्या साथीदारास काहीं सांगण्याकरितां पुनः खिडकीजवळ गेली. त्याची पाठ फिरतांच सुहासिनी प्रसंगावधान साधून फारच सावधगिरीनें आंत गेली आणि युवराजांच्या मंचकाआड उभी राहिली. तिला त्यावेळीं हत्याराची आवश्यकता होती. परंतु युवराजाची विजयी तरवार तिच्या हाताजवळच मंचकाच्या दांडीला अडकवून ठेविलेली होती. सुहासिनीच्या हातीं तरवार येतांच तिला मोठी ईर्षा आली. इतक्यांत खिडकींतून बुरखा घेतलेली दुसरी एक व्यक्ति आंत आली. क्षणभर त्यांनीं इकडे तिकडे टेहळणी करून सर्वत्र शांतता आहे असें पाहून एकमेकांस पुनः खुणा केल्या. नंतर त्यापैकीं एक व्यक्ति पुढें झाली आणि आपल्या वस्त्रांत लपविलेला तीक्ष्ण धारेचा जंबिया बाहेर काढून ती व्यक्ति युवराजाच्या शय्येजवळ आली.

एक क्षण ! आणि तितक्यांत त्या व्यक्तीनें वर उगारलेला जंबिया युवराजाच्या विशाल छातीवर आघात करणार तोंच सुहासिनीनें अत्यंत चपळाईनें त्या व्यक्तीचा हात वरच्यावर छेदून टाकला ! हा प्रकार पाहतांच त्या दुसऱ्या व्यक्तीनें सुहासिनीवर झडप घातली. त्या गडबडीबरोबर युवराज एकदम जागा झाला. इतक्यांत बाहेरच्या उद्यानांत मोठा गलबला होऊन युवराजाच्या शय्यागृहाचा दरवाजा धाडकन् उघडला आणि हातांत नग्न तरवार घेतलेला वसंतविजय त्याच्या मागून पुरुषवेषांत यशोधरा आणि विनोद आंत आले, तोंच दुसरा दरवाजा उघडला आणि महाराज, सेनानायक आणि अमात्य ही मंडळी आंत आली.

" सुहासिनी, हा काय प्रकार आहे ? " तिच्या हातांत रक्तानें भिजलेली तरवार पाहून महाराजांनीं एकदम विचारलें.

" सुहासिनी !—कोण सुहासिनी ?—" आश्चर्यानें तिच्याकडे पहात युवराज म्हणाला, " ही आनंदकुंजवासिनी—"

" आणि सुहासिनी ताईमहाराज ह्या एकच ! " कनक अमात्यानें पुढें होऊन युवराजाचें वाक्य पुरें केलें !

" काय ?—राजनंदिनी सुहासिनी तीच ही आनंदकुंजवासिनी "

" होय. युवराज महाराजांना इतके दिवस संशयांत ठेवणारी मीच ती महान् अपराधी सुहासिनी ! " पुढें होऊन अधोवदन करून सुहासिनी म्हणाली, " महाराज क्षमाशील आहेत, तेव्हां मला माझ्या अपराधाची—"

"राजकन्ये, तुझा अपराध कोणता ? आणि तूं कोणाजवळ क्षमा मागणार ? एक दोन आणि तीन प्रसंगीं तूं ह्या जीविताचें रक्षण केलेंस. तेव्हां आतां हें जीवित कोणाचें ?"

"माझें !"

---

# सर्ववृत्त कथन ८

सेनानायकानें बुरखा घेतलेल्या मारेकऱ्यास पुढें आणतांच त्यानें आपला सर्व अपराध कबूल केला. तो म्हणाला, "आम्हाला अनंगसेन अमात्यानें मोहरांची लालूच दाखवून युवराजाचा खून करण्यास सांगितलें. त्याप्रमाणें आम्ही युवराज महाराजांच्या मागें लागून त्याना एकांतांत गांठण्याचा प्रयत्न करीत होतों. पुढें ते सैन्याला सोडून एकटेच दूर गेले असतां आम्ही त्यांच्यावर शरसंधान केलं. ते घोड्यावरून पडलेले पाहून आमचें कार्य झालें असें आम्हाला वाटलें. आणि आम्ही तेथून पळालों. परंतु दुसऱ्या दिवशीं पुनः शोध करतां युवराज आनंदकुंजांत आहेत असें आम्हाला कळलें. नंतर आम्ही त्या ठिकाणीं गुप्तपणें संचार करूं लागलों. तेव्हां एकदां अकल्पित रीतीनें कोकिळा आणि हे कनक अमात्य यांचा गुप्त संवाद आम्हाला ऐकावयास मिळाला. त्यावरून आनंदकुंजवासिनी हीच सुहासिनी राजकन्या असें आम्हांला कळलें. ही महत्त्वाची गुप्त गोष्ट कळतांच त्याचा फायदा करून घेण्याचा आम्ही विचार केला. आणि येथें—शमीनगरांत येऊन धुंडपाळ महाराण्यास भेटलों. त्यांच्याबरोबर गुप्त खलबतें करण्याकरितां आम्हाला दोनचारदां ह्या महालात यावें लागलें. म्हणूनच येथील गुप्त चोरवाटा आम्हाला माहित झाल्या, सुहासिनीच्या निवांतस्थानाची बातमी दिल्याबद्दल महाराण्यानें आम्हाला एक हजार मोहरा दिल्या. पुढें महाराणा राजकन्येला हस्तगत करून घेण्याकरिता निघाला असतां त्याचें पुढें काय झालें हें आपणास माहितच आहे. युद्धांत महाराण्याचा वध झाल्यावर आम्ही पुनः युवराजाकडे वळलों आणि आज संधी साधून येथें आलों."

मारेकऱ्यानें आपली हकीकत सांगून संपविल्यावर वसंतविजयानें यशोधरेकडे

बोट दाखवून आपली हकीकत सांगण्यास सुरवात केली. तो म्हणाला, " युवराज ह्या तरुणाची ओळख विसरले नसतील ? "

" नाहीं. मला आपल्या स्वामिनीचा—सुहासिनीचा कंकण संदेश देणाराच हा तरुण ! "

" पण तो तरुणच आहे हें कशावरून ? " हांसत हांसत सुहासिनीनें विचारलें.

" म्हणजे ? ह्या तरुणानें देखील आपल्यासारखेंच नांव बदललें आहे कीं काय ? "

" नाव बदललें असतें तर एक असो ! पण नांवाबरोबर वेष देखील बदलला आहे. ही माझी प्रियसखी यशोधरा ! "

" ही यशोधरा ! मी अद्यापि हिला ओळखले नव्हतें ! " महाराज मध्येंच म्हणाले. " वा पोरींनो ! तुम्ही पुरुषांना एका बाजूला सारून सर्व कामगिरी आपणाकडेच घेतली आहे कीं काय ? मग आतां सांग पाहूं, तूं तेथें काय काय केलेंस तें ? "

" माझ्या हातून कांहीं झालें असेल, तर त्याला कारण आपले आणि ताई महाराजांचे पुण्यप्रतापच होत. " यशोधरा म्हणाली. " ताईमहाराजांचा कंकण संदेश घेऊन मी वृद्ध चारणासह येथून निघालें. पुढें इच्छित स्थलीं पोंचण्यापूर्वी युवराज महाराजांच्या नगरींतील खरी खरी स्थिति आम्हाला वाटेंत कळली. त्यांचे महाराज मृत्युद्वारीं पडलें असून त्यांना गुण पडावा म्हणून जो येईल त्या नव्या धन्वंतऱ्याचें औषध त्यांस देतात असें आम्हांला कळताच राजवाड्यांत प्रवेश करण्याकरितां मी ह्या माहितीचा उपयोग करून घेण्याचें ठरविलें. तात्काळ वृद्ध चारणास धन्वंतरी बनवून मी त्याचा शिष्य झालें आणि वेषांतर करून नगरींत प्रवेश केला. परंतु मी स्त्री आहें ही बातमी एका गुप्तहेराच्या लक्षात येऊन त्यानें ती बातमी त्याच्या पाताळयंत्री धन्याला—अनंगसेन अमात्याला—कळविली. तेव्हां त्यानें मला आपल्या महालांत नेऊन वश करण्याचा पुष्कळ प्रयत्न केला. त्यावेळीं मी मोठ्या संकटांत पडलें. परंतु सत्याचा वाली ईश्वर ! माझी ईश्वराला करुणा येऊन त्याच वेळीं अमात्याला राणीकडून बोलावणें आलें. त्याप्रमाणें तो निघून गेल्यावर मी संकटास तोंड कसें द्यावें याचा विचार करीत तेथें बसलें असतां पलीकडच्या दालनांतून मला मंजुळ वीणानाद ऐकूं आला. साहजिक इतकें मंजुळ गायन कोण करीत आहे, तें जाणण्याची मला जिज्ञासा होऊन मी

तेथें जाऊन शोध करूं लागलें तेव्हां तेथें असलेलें गुप्तद्वार मोठ्या चमत्कारिक रीतीनें माझ्या दृष्टीस पडलें. तें उघडून मी आंत पाहूं लागलें, तेव्हां अत्यंत किळसवाणा प्रकार माझ्या दृष्टीस पडला. राणी आणि अमात्य यांचा प्रणय चालला असतां त्यांच्या भाषणावरून त्यांनीं महाराजांस विषप्रयोग केला आहे ही गोष्ट मला कळली. ”

आपल्या सापत्न मातेचें हें चरित्र ऐकून युवराजाला अत्यंत वाईट वाटलें, त्यानें एक दीर्घ निश्वास सोडून तो मुकाट्यानें यशोधरा सांगत असलेला वृत्तांत ऐकत होता. यशोधरा पुढें म्हणाली, “ अशा अकल्पित रीतीनें अमात्याची शेंडी माझ्या हातीं आली, त्यामुळें वाटेल तसा मला त्याला वळवितां आला. मग आम्ही महाराजांसमक्ष त्यांच्या राजवैद्याला बोलावून शिरच्छेद करण्याची त्याला भीति घालून विषप्रयोगाच्या खऱ्या गोष्टी त्याच्याकडून काढून घेतल्या. इतक्यांत राणीचें मजवर लक्ष जाऊन मी खरोखरीच पुरुष आहें असें समजून तिचें मजवर प्रेम जडलें. अशा रीतीनें विषयाला बळी पडलेल्या त्या राणीबद्दल मला फार वाईट वाटलें. तितक्या अवधींत मी संधी साधून युवराज महाराजांना ताईमहाराजांचा कंकण संदेश पोंचता केला. परंतु—परंतु यांना—” येथें मात्र यशोधरा अडखळली. वसंतविजयाचें नांव घ्यावयास तिला आतां अवघड वाटूं लागलें. परंतु त्यामुळें त्या परस्परांच्या प्रेमरहस्याचा स्फोट झाला. तिला अडखळलेली पाहून वसंतविजय मध्येंच म्हणाला, “ मला संशय आला त्याचें कारण त्या वेळची परिस्थितीच तशी होती. मला वाटलं कीं, युवराज महाराजांना नगरांतून काढण्याकरितां अमात्यानेंच हा व्यूह रचला आहे. ”

“ होय, पण आपणास तसें वाटल्याबद्दल मी कुठें दोष देतें ? ”

“ कसा देशील दोष ? ” मध्येंच वृद्धचारण म्हणाला, वसंतविजयाला आपला संशय आला म्हणून तो तुझ्या मागें लागला आणि म्हणूनच तुमचं हें सूत जमलं ? ”

सर्वजण हंसूं लागले. इतका वेळ वृद्ध चारण गप्प होता. परंतु अनुकूल प्रसंग येतांच त्यानें मध्यें तोंड घातलें. तो पुढें म्हणाला, “ ताईमहाराजांनीं स्वतः वरसंशोधन केलं, त्याचप्रमाणें यशोधरेनें केलं, पण मी मात्र वृद्ध ब्रह्मचारी राहणार. ” असें म्हणून तो कोकिळेकडे पहात सुहासिनीला म्हणाला, “ कंकणसंदेश नेतांना ताई महाराज म्हणाल्या होत्या—”

" काय म्हणाल्या होत्या रे चारणा ? " आपल्या भावी पत्नीकडे पाहून चारणानें केलेला विनोद न खपून विनोद रागानें म्हणाला, " इतका तूं वृद्ध झालास, आतां तुला ह्या गोष्टीशीं काय कर्तव्य ? "

" पहा ताईमहाराज, हें तिसरें प्रणयी युग्म जुळलें ! "

पुनः सर्वजण हंसूं लागले. कोकिळेनें एकदां विनोदाकडे प्रेमपूर्ण दृष्टि फेंकून अधोवधन केलें. तें पाहून महाराज म्हणाले, " एकूण तुम्हीं तिघींनींहि आपापले वर शोधून काढले म्हणावयाचे ! ठीक झालं ! बरं यशोधरे, मग पुढें काय वर्तमान झालं ? "

बराच वेळ यशोधरा कांहीं उत्तर देत नाहीं असें पाहून वसंतविजय म्हणाला, " नंतर राणी आणि अमात्य यांचें सर्व कारस्थान महाराजांना कळतांच त्यांना अनावर क्रोध आला. त्यांनीं एकदम राणी आणि अमात्य याचा स्वतः शिरच्छेद केला. अशा रीतीनें आपल्या राज्यातील पापाचें मूळ नाहींसें झालें. इतक्यांत विनोद तेथें आला आणि त्यानें मुद्रा दाखवून तेथील भयंकर वृत्त कळविलें. तें ऐकून आमच्या स्वामीस अत्यंत दुःख झालें. त्यांनीं तत्काल ससैन्य माझी येथें रवानगी केली. प्रथम मयूरनगरींत गेलों. तेथें मला आपल्या विजयाची हकीकत कळली. तेव्हां आम्ही येथें यावयास निघालों. वाटेंत आम्हाला ह्या दोघां मारेकऱ्यांचा गुप्त बेत कळला. आम्ही त्यांच्यावर नजर ठेऊन त्यांच्या मागें निघालों. पुढें ते या प्रासादाच्या उद्यानाजवळ येतांच, त्यांना येथील गुप्त वाटा माहिती असल्यामुळें आमची नजर चुकवून ते गुप्तद्वारानें आंत शिरले. तेव्हां आम्हाला मोठा विचार पडला. मग आम्ही राजमार्गानें प्रासादांत प्रवेश करण्याचा प्रयत्न केला. परंतु द्वाररक्षक आम्हाला आंत येऊं देईनात ! तथापि मोठ्या जुलुमानें आम्ही आंत आलों. परंतु आम्ही येण्यापूर्वींच युवराजांच्या जीवितरक्षणाचा विडा उचललेल्या राजकन्येनें आपलें कार्य केलें होतें. "

# समारोप

सर्व आनंदी आनंद झाला. दुसऱ्या दिवशीं ठरल्याप्रमाणें महाराज मयूरनगरींत गेले. आणि तेथें गेल्यावर त्यांनीं सुहासिनीच्या मंगलविवाहाची जारीनें तयारी चालविली, ह्या मुख्य विवाहाबरोबर सुहासिनीच्या सख्या, यशोधरा आणि कोकिळा यांचाहि विवाह व्हावयाचा होता.

युवराजाची प्रकृति फार लवकर सुधारली. त्यानें नवीन मिळविलेल्या राज्याची व्यवस्था आपला मित्र वसंतविजय याजकडे सोंपविली. आणि स्वनगरींत प्रयाण केलें. तेथें त्याच्या पित्यानें त्याचा बहुमान केला. नंतर वर पक्षाकडील तयारी सुरू झाली. पुढें लवकरच एका शुभ मुहूर्तावर युवराज अमरसिंह आणि राजनंदिनी सुहासिनी, वसंतविजय आणि यशोधरा, व विनोद आणि कोकिळा हे तीन विवाह मयूरनगरींत मोठ्या कडाक्यानें झाले.

समाप्त

# : आमचें प्रकाशन :

### नाथ माधव

| | |
|---|---|
| डॉक्टर कादंबरी | ३—८ |
| वीरधवल | ३—८ |
| सोनेरी टोळी | ३—० |
| विमलेची ग्रहदशा | २—८ |
| विहंगवृंद | २—८ |
| सांवळ्या तांडेल | १—४ |
| दोन भावडें | १—८ |
| हेमचंद्र-रोहिणी | १—८ |
| सुहासिनी | २—० |

### शरत्साहित्य

| | |
|---|---|
| चंद्रनाथ | १—४ |
| चारमिनार | १—४ |
| श्रीकांत भाग पहिला | १—४ |
| श्रीकांत भाग दुसरा | १—४ |
| श्रीकांत भाग तिसरा | १—४ |
| श्रीकांत भाग चौथा | १—४ |
| गांवगंगा | १—८ |
| भैरवी | ३—० |
| काशिनाथ | १—८ |

### श्री. काटदरे

| | |
|---|---|
| वत्सराज उदयन | १—० |

### श्री. मायनेकर

| | |
|---|---|
| झांजर | १—० |

### डॉ. सांडू

| | |
|---|---|
| आजच्या स्त्रियांचें आरोग्य | २—४ |
| आहार शास्त्र | २—० |

### पिरोज आनंदकर

| | |
|---|---|
| गृह विज्ञान | १—८ |

### श्री. पर्वते

| | |
|---|---|
| मुलाखती | १—४ |
| अर्घ्यप्रदान | १—८ |

### स-हृदय

| | |
|---|---|
| ध्रुवाचा तारा | २—० |
| सरला | १—४ |

### गीता साने

| | |
|---|---|
| धुकें दहिंवर | १—८ |

### श्री. रतनलाल शहा

| | |
|---|---|
| संध्या | १—४ |
| चंद्रकोर | ०–१२ |

### नाटकें

| | |
|---|---|
| कोरडी करामत | ०–१२ |
| बाजीरावाचा बेटा | १—० |
| कुंजविहारी | १—४ |
| सारस्वत | १—० |
| माझ्या कलेसाठीं | १—० |
| अरेबाबा जाहिरात | १—४ |

### श्री. चिंदरकर

| | |
|---|---|
| जलतरंग | ०–१० |

## नवभारत प्रकाशनसंस्था, गिरगांव, मुंबई ४

# मुलांच्या हातांत हींच पुस्तकें द्या !!!

बहुतेक पुस्तकांच्या नवीन एडिशन सुरू आहेत व कागदाच्या महर्गतेमुळें किंमतींत परवडणें शक्य नाहीं. तरी खालीलप्रमाणें नवीनची वाढ करण्यांत येत आहे.

ले. वि. स. गवाणकर

| | | |
|---|---|---|
| * महा. इति. सु. गोष्टी | | ०-३-० |
| * रामा. महा. सु. गोष्टी | | ०-३-० |
| * काळा काका ! | | ०-२-६ |
| * गमती-जमती ! | | ०-२-६ |
| * उंदीर नवरा ! | | ०-२-६ |
| * खेड्यांतील जमती ! | | ०-२-६ |
| * जगाचा जन्म | | ०-३-० |

ले. ओझरकर

| | | |
|---|---|---|
| * पंचकन्या | दु. आ. | ०-४-६ |
| * पांच बाळें | | ०-३-० |

ले. पु. बा. कुळकर्णी

| | | |
|---|---|---|
| * मुलें पळविणारी टोळी | | ०-४-० |

ले. धर्मानंद कोसंबी

| | | |
|---|---|---|
| * वेडा इवान | | ०-६-० |
| * मैत्रिणी (परचुरे) | दु. आ. | ०-४-० |

ले. ल. वा. भावे

| | | |
|---|---|---|
| सुबोध संवाद | | ०-४-० |

ले. मा. के. काटदरे

| | | |
|---|---|---|
| * डोंगरांतला काका | | ०-३-० |
| * पऱ्यांची देणगी | | ०-३-० |
| * सांजवातीच्या वेळीं | | ०-३-० |
| * गाढव जांवई | दु. आ. | ०-४-० |
| * शालिवाहनाची कथा | | ०-३-० |
| * सोनसांखळी | | ०-३-० |
| * गोड-गीत | | ०-४-० |
| * तिघे प्रवासी | दु. आ. | ०-४-० |
| * तीन रणयोद्धे | | ०-३-० |
| * तीन लढाऊ प्राणी | | ०-३-० |

लेखिका कु. अनसूया काटदरे

| | | |
|---|---|---|
| * नशिबवान् मुलगा | | ०-३-० |

लेखिका पि. आनंदकर

| | | |
|---|---|---|
| वेणीमाधव | | ०-२-६ |
| राणी | | ०-२-६ |
| नरपति | | ०-२-६ |
| श्वेतकर्ण | | ०-२-६ |

* या सर्व पुस्तकांना मुंबई व मध्यप्रांत सरकारची मंजुरी मिळाली आहे.

**मुलांच्या हातांत हींच पुस्तकें द्या अन् पहा किती 'आनंदून जातील तीं ! मुलांची करमणूक तर होईलच पण त्याचबरोबर त्यांच्या ज्ञानांतहि भर पडेल.**

## नवभारत प्रकाशनसंस्था मुंबई ४